
DOWN AND OUT IN PARIS AND LONDON
GEORGE ORWELL
भाग २
लंडन
वृषाली जोशी

# लंडन

मूळ लेखक – जॉर्ज ऑर्वेल

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# लंडन

लेखक : जॉर्ज ऑर्वेल

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237


प्रकाशन : १ एप्रिल २०२३



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# जॉर्ज ऑर्वेल



हा ब्रिटीश लेखक असून त्याचे मूळचे नाव इरीक आर्थर ब्लेअर असे होते. पण तो जॉर्ज ऑर्वेल या टोपण नावानेच प्रसिद्ध आहे. तो इंग्लिश कादंबरीकार निबंधकार, पत्रकार व टीकाकार होता. त्याने त्याचे विचार स्पष्टपणे गद्यात लिहिले आहेत. तो निरंकुश राजवटीच्या वा एकतर्फी वर्चस्वाच्या विरुद्ध होता व लोकशाही समाजवादाच्या बाजूने होता. तो २५ जून १९०३ रोजी जन्मला व २१ जानेवारी १९५० साली लंडन येथे वारला. ॲनिमल फार्म ही व्यंगात्मक प्रहसन असलेली त्याची कादंबरी प्रसिद्ध आहे.

# लंडन आणि पॅरीस

Down And Out In London And Paris

By George Orwell

बेघर, बेकार व पैशांशिवाय लंडन व पॅरीसमध्ये

ओहो, नुकसानकारक त्रास, गरीब अवस्था, कविवर्य

# लंडन



## XXIV

फ्रान्स आणि बेल्जियमच्या सीमारेषेपासून जवळ असलेल्या उत्तर फ्रान्समधील डनकिर्क गावापासून उघड्या रेल्वेने मी इंग्लंडला जाण्यासाठी तिसऱ्या वर्गाने प्रवास केला. खाडी ओलांडायचा तो सर्वांत स्वस्त व फारसा वाईट नसलेला मार्ग होता. तुम्हाला केबिन हवी असेल, तर जादा पैसे भरावे लागत. त्यामुळे मी खुल्या जागी, बऱ्याचशा तिसऱ्या वर्गाच्या उतारूंबरोबर झोपलो.

माझ्या रोजनिशीत मी अशी नोंद केली.

“सत्तावीस पुरुष व सोळा बायका झोपलेल्या खुल्या जागी मी झोपलो. आज सकाळी स्त्रियांपैकी कुणीही चेहरा धुतला नाही. बहुतेक पुरुष बाथरूममध्ये गेले, तर स्त्रियांनी त्यांची मेकपची पेटी उघडून धुळीवर पावडर थापली. प्रश्नः एक दुय्यम लैंगिक फरक?”

प्रवासात मी खूप रुमानियन तरुणांना भेटलो. ते मधुचंद्रासाठी इंग्लंडला चालले होते. त्यांनी इंग्लंडबद्दल बरेच प्रश्न विचारले आणि मी त्यांना बेमालूम खोटी उत्तरे दिली. अनेक महिने परदेशात राहिल्यावर, घरी जायचे म्हणून मी इतका खूष झालो होतो, की मला इंग्लंड म्हणजे स्वर्गच भासत होता. इंग्लंडमध्ये खरोखर तुम्हाला आनंदी बनवणाऱ्या इतक्या चांगल्या गोष्टी होत्या --- जसे की बाथरुम्स, हाताच्या खुर्चा, मिंट सॉस, नीट शिजवलेले नवीन बटाटे, ब्राऊन पाव, मार्मालेड, उसळणारी बिअर --- हे सर्व तुम्ही विकत घेऊ शकलात, तर खूप छान होते. तुमच्याकडे पैसे असतील, अर्थात घरगुती मूर्खाकडे लक्ष द्यायचे नसेल, तर इंग्लंडसारखा चांगला देश नाही. मी तर काही गरीब असणार नव्हतो. गरीब नसल्याचा विचार मला देशभक्त

बनवत होता. रुमानियन्स जितके जास्त प्रश्न विचारू लागले, तितकी मी इंग्लंडची जास्त भलावण करू लागलो.

हवा, सीनसीनेरी, कला, साहित्य, कायदे --- इंग्लंडमधील प्रत्येक गोष्ट एकदम हवी तशी होती.

इंग्लंडमधील वास्तुकला चांगली होती का, असे रुमानियन्स विचारू लागले, तेव्हा मी म्हणालो, “सुंदर! तुम्ही लंडनमधील नुसते पुतळे पहा. पॅरीस चांगल्या अभिरुचीचे नाही. अर्धे ढोंगीपणे नखऱ्याचा आभास निर्माण करणारे व अर्धे झोपड्यांनी भरलेले आहे. पण लंडन --- “

मग बोट टीलबरी धक्क्याला लागली. पाण्याच्या कडेला आम्ही पहिली इमारत पाहिली, ती म्हणजे एक मोठे हॉटेल होते. मानसिक रुग्णांसाठी असलेल्या इमारतीच्या भिंतीकडे इंग्लिश किनाऱ्यावरून, मूर्खासारखे निरखून बघत असलेली ती गुळगुळीत गिलावा केलेली, मोठी उंच टोके असलेली, इमारत होती. मी पाहिले की काही बोलण्यासाठी, रुमानियन्स फारच अवाक् झाले होते. ते डोळे फाडून हॉटेलकडे बघत होते. मी त्यांची खात्री पटवली, की ते फ्रेन्च वास्तुविशारदांनी बांधलेले आहे. आणि नंतर जेव्हा गाडी पूर्वेकडील झोपडपट्टीवरुन वळसा घेत होती, तेव्हाही मी इंग्लिश वास्तूंच्या सौदर्याचे गोडवे गात होतो. इंग्लंडबद्दल चांगले बोलायला फार मस्त वाटत होते, कारण आता मी घरी परत आलो होतो आणि आता कसल्या काळजीत नव्हतो.

मी बी च्या कार्यालयात गेलो आणि त्याच्या पहिल्या शब्दांनी सर्व काही होत्याचे नव्हते करून टाकले. तो म्हणाला, “मला माफ कर. तुला नोकरी देणारे व रोगी सर्वजण, परदेशी गेले आहेत. पण तरीही महिन्याभरात, ते परत येतील. मला वाटते, तोपर्यंत तू प्रतीक्षा करू शकशील, नाही का?” मला काही पैसे उसने घ्यावे असे वाटायच्या आत, मी रस्त्यावर आलो.

महिनाभर थांबायचे होते. माझ्या हातात फक्त एकोणीस शिलिंग आणि सहा पेन्स होते. ही बातमी ऐकून माझा श्वास कोंडला गेला. बराच वेळ मला काय करावे,  तेच समजेना. मी रस्त्यावर भटकत राहिलो. लंडनमध्ये स्वस्त झोपायची सोय कुठे होईल, याची पुसटशीही कल्पना नसल्याने, मी ‘फॅमिली’ हॉटेलमध्ये गेलो. तिथला भाव सात शिलिंग आणि सहा पेन्स होता. ते दिल्यावर माझ्याकडे फक्त दहा शिलिंग व दोन पेन्स उरले.

सकाळपर्यंत मी माझे बेत ठरवले. उशीरा किंवा लवकर मला बी कडे पैशांसाठी जावेच लागेल. पण असे करणे क्वचितच बरे दिसेल. मधला काळ मला कुठेतरी लपून छपून काढायला हवा. मागच्या अनुभवावरून, मी माझा उत्तम सूट कर्जाऊ देणे टाळले. मी सूट सोडून, माझ्या सगळ्या वस्तू स्टेशनवरील भाड्याच्या खोलीत ठेवल्या. तो सूट बदली करून मी काही स्वस्त कपडे व एक पौंड मिळवू शकलो असतो. जर मी महिनाभर तीस शिलिंगवर रहाणार असतो, तर माझे कपडे स्वस्तच हवेत. ते जितके वाईट असतील, तितके चांगले. मला कल्पना नव्हती, की तीस शिलिंग मध्ये माझा कसा काय निभाव लागणार आहे. मला पॅरीसइतके लंडन माहिती नव्हते. कदाचित मी भीक मागू शकेन. किंवा बुटांच्या लेस विकू शकेन. मी रविवारच्या वर्तमानपत्रात भिकाऱ्यांसंबंधी वाचलेले काही मला आठवले. दोन हजार पौंड पँटच्या खिशात ठेवलेले भिकारी होते. कितीही वाईट दर्जाने जगले, तरी लंडनमध्ये भुकेलेले रहाणे अशक्य होते. त्यामुळे काळजी करायची काही गरज नव्हती.

माझे कपडे विकायला मी गरीब लोक रहाणाऱ्या व खूप कपडे विकत घेण्याची दुकाने असलेल्या लॅम्बेथमध्ये गेलो. पहिल्या दुकानातील मालक नम्र होता पण मदत करायला तयार नव्हता. दुसऱ्या दुकानातील मालक उद्धट

होता. तिसऱ्या दुकानातील मालक ठार बहीरा तरी होता किंवा तसे सोंग करत होता. चौथ्या दुकानातील मालक मोठ्या सोनेरी केसांचा व डुकराच्या भाजलेल्या मासाच्या तुकड्यासारखा गुलाबी कांतीचा तरुण होता. त्याने मी घातलेल्या कपड्यांकडे पाहिले व किंमत जाणून घेण्यासाठी बोटाच्या चिमटीत धरून स्पर्शही केला. तो म्हणाला, “हे स्वस्तातले कापड आहे. फार स्वस्तातले कापड आहे. [तो चांगल्यापैकी सूट होता.] तुला हा देऊन काय हवे असू शकेल?”

मी त्याला स्पष्ट केले, की मला काही जुने कपडे व तो देऊ शकेल तेवढे पैसे हवे आहेत. त्याने मग काही चिंध्यांसारखे घाणेरडे कपडे गोळा केले व माझ्याकडे फेकले. मी एक पौंड मिळायची अपेक्षा करत म्हणालो, “पैशांचे काय?” त्याने नापसंतीदर्शक असा ओठांचा चंबू केला व एक शिलिगचे नाणे कपड्यांशेजारी ठेवले. मी काही वाद घातला नाही --- मी खरे तर वाद घालणार होतो पण मी माझे तोंड उघडताच, तो जणू काही शिलिंग परत घ्यायला निघाला. मी बघितले की मी हतबल होतो. त्याने मला मागील एका खोलीत कपडे बदलायला दिले.

एके काळी गडद तपकिरी असलेला कोट, जाड्याभरड्या सुती कापडाची पँट, मफलर आणि टोपी, असे ते कपडे होते. माझ्याकडे माझा शर्ट, मोजे व बूट होते. आणि खिशात कंगवा व रेझर होता. असे कपडे घालून कुणाच्याही मनात एक विचित्र भावना उमटली असती. मी यापूर्वीदेखील अनेकदा वाईट कपडे घातले होते पण असे नव्हे. ते फक्त घाणेरडे व गबाळेच नव्हते, तर ते --- कसे सांगावे बरे? --- काहीच डौलदारपणा नसलेले, जुन्या घाणीवर मुलामा चढलेले असे होते. फक्त गबाळेपणा शिवाय खूप वाईट रीत्या वेगळे असलेले होते.

एखाद्या भटक्याच्या किंवा बुटाची लेस विकणाऱ्या माणसाच्या अंगावर असावेत तसे ते होते. तासाभराने, लॅम्बेथमध्ये मला ओळख लपवणारा, परंतु ओळखीचा वाटणारा एक भटक्या माणूस माझ्याकडे येतांना दिसला. मी परत पाहिले तेव्हा मला कळले, की दुकानाच्या काचेत दिसणारा तो म्हणजे मीच होतो. माझा चेहरा आधीच धुळकट होता. धूळ ही व्यक्तीचा मान वाढवते. जेव्हा तुम्ही चांगल्या कपड्यात असता, तेव्हा ती तुमच्यापासून लांब पळते. पण तुमची कॉलर फाटकी असेल, तर ती तुमच्यावर सर्व दिशांनी चालून येते.

मी रात्री उशीरापर्यंत, हलायच्या बेतात रस्त्यावर रहायचो. मला पोलीस भटक्या म्हणून पकडतील, अशी भीती मला असायची. माझे बोलणे आणि कपडे यातील विरोधाभास त्याना जाणवेल, म्हणून मी कोणाशी बोलायचे धाडस करायचो नाही. [नंतर मला असा शोध लागला, की असे कधीच होत नाही.] माझ्या नव्या कपड्यांनी मला नवीन जगात स्टॅनले म्हणून स्थान दिले. प्रत्येकाचे वरवरचे वागणे बदलल्यासारखे वाटू लागले. एका फेरीवाल्याला जड झालेले ओझे उचलायला मी मदत केली. तो जिवणी फाकवत म्हणाला, “मित्रा, आभारी आहे.” माझ्या आयुष्यात यापूर्वी कोणी मला मित्रा अशी हाक मारली नव्हती --- ही कपड्यांची किमया होती. पहिल्यांदाच माझ्या लक्षात आले, की पुरुषांच्या कपड्यांवरून त्यांच्याकडे बघण्याचा स्त्रियांचा दृष्टीकोन कसा बदलतो. जेव्हा वाईट कपडे घातलेला माणूस त्यांच्या शेजारून जातो, तेव्हा त्या शहारून त्याच्यापासून लांब जातात व जणू तो मेलेले मांजर असल्यासारखी, त्यांच्या डोळ्यातील उबग सहज दिसते. कपड्यांमध्ये शक्ती असते. भटक्याच्या वेषात पहिल्या दिवशी, काही झाले तरी फार कठीण जाते. तुमचा दर्जा खालावला आहे, हे मान्य करणे कठीण जाते. तुम्हाला तुरुंगातील पहिल्या रात्री पण अशीच अविचारी लाज

वाटते. पण ती खरी असते. अकरा वाजता मी अंथरूण शोधायला सुरवात केली. मी स्वस्त लॉजबद्दल ऐकले होते. [तसेही त्याना कधीच स्वस्त लॉज म्हटले जात नसे.] मला वाटले, इथे एखाद्याला चार पेन्सच्या आसपास अंथरूण मिळत असेल. एका नेव्हीतील वा तत्सम माणसाला वॉटरलू रस्त्याच्या फुटपाथवर उभे बघून, मी विचारले, की मी कफल्लक आहे व मला अगदी स्वस्तातील अंथरूण कुठे मिळू शकेल?"

तो म्हणाला, "ओहो, तू त्या रस्त्यावरील घरापलीकडे जा. तिथे तुला 'एकट्या माणसासाठी चांगली अंथरुणे' अशी पाटी दिसेल. ती चांगली जागा आहे. मी तिथे अधून मधून जातो. ती स्वच्छ आणि स्वस्त आहे."

ती जुनीपुराणी, उंच इमारत होती. सर्व खिडक्यांमधून मंद उजेड येत होता. त्यातील काही खिडक्यांना कागद लावलेला होता. मी दगडी पॅसेजमधून आत शिरलो. एक लहानसा अशक्त, झोपाळू मुलगा तळघराकडे जाणाऱ्या दारातून आला. तळघरातून दबक्या, पुसट आवाजातील गुणगुण ऐकू येत होती. चीजच्या वासाची गरम हवा येत होती. मुलाने जांभई दिली व हात उंच करून म्हणाला, "खोली हवी आहे? ते तिथे अधिकारी आहेत, त्याना भेटा."

मी शिलिंग भरले आणि मुलाने मला काळोखी, पडझड झालेल्या जिन्याकडे व तिथून एका झोपायच्या खोलीकडे नेले. ती एक ओपिअम व कापुराच्या घाणेरड्या वासाची, घाणेरडा गालिचा अंथरलेली, खिडक्या घट्ट बंद केलेली व सुरवातीला श्वास कोंडतो आहे, असे वाटणारी खोली होती. तिथे एक मेणबत्ती जळत होती. खोली आठ पलंग असलेली, पंधरा फूट लांबीरुंदीची व आठ फूट उंचीची होती. होते. त्यातील आठ पलंग भरलेले असून, त्यावर पायात बूट तसेच असलेली, मासाचे गोळे असलेली माणसे

कशीही वेडीवाकडी पडली होती. एका कोपऱ्यात, एकजण तिटकारा वाटेल अशा रीतीने खोकत होता. जेव्हा मी अंथरुणात शिरलो, तेव्हा मला ते लाकडासारखे कडक लागले आणि उशी म्हणजे एक कडक लाकडाचा सिलेंडर होता. हे टेबलावर झोपण्यापेक्षा, वाईट होते, कारण पलंग सहा फूट लांबही नव्हता व अगदी अरुंद होता. गादी कडेने खोल गेलेली होती. त्यामुळे पडू नये म्हणून कशाला तरी धरणे भाग होते. पांघरुणे इतकी घामट वासाची होती, की मला ते नाकाजवळ आणवेना. गादीवर सुती चादर होती. ती जाड असली, तरी त्याला उब नव्हती. रात्रभर बाहेरून काही आवाज येत होते. माझ्या डावीकडील खलाशी तासातासाने मला वाटते, जागा होऊन, वाईट आवाज काढून सिगरेट पेटवत होता. मूत्राशयाचा काही आजार असलेला दुसरा एकजण, रात्रभर खोलीतील मूत्राचे भांडे निदान अर्धा डझन वेळा तरी वापरत होता. कोपऱ्यातील माणसाला दर वीस मिनिटांनी अगदी ठरवल्या सारखी खोकल्याची उबळ येत होती. कुत्रा उगीचच ओरडून, केकाटून, भुंकत असतो, तसे ते वाटत होते. हे सर्व नकोसे, उबग येणारे, बुडबुड आवाज केल्यासारखे होते, जसे काही माणसाच्या आतड्यातून गुरगुर आवाज यावेत तसे ते होते.

एकदा त्याने काडी ओढली, तेव्हा मी पाहिले, की तो खूप म्हातारा माणूस होता. त्याने त्याची पँट डोक्याला रात्रीच्या टोपीसारखी गुंडाळली होती. काही कारणाने ते बघून माझ्या अंगावर शहाराच आला. जेव्हा तो खोके किंवा दुसरा कोणी आवाज करे, तेव्हा एका अंथरुणातून आवाज येई, "गप्प बस, येशूसाठी कृपया गप्प बस."

मला रात्रभरात फक्त एक तास झोप मिळाली. सकाळी माझ्याकडे येत आहे, असे वाटणाऱ्या घाणीने भरलेल्या, मोठ्या, तपकिरी, भारतीयाच्या

पुसटशा आकृतीने मला जाग आली. मी डोळे उघडले आणि तो एका खलाशाचा पाय होता. तो त्याच्या अंथरुणाबाहेर पडून, माझ्या चेहऱ्याशी आला होता. तो घाणेरड्या भारतीयासारखा, गडद तपकिरी होता.

भिंती महारोग झाल्यासारख्या होत्या आणि चादरी निदान तीन आठवड्यात धुतल्या नव्हत्या. त्या झाडाच्या खोडासारख्या तपकिरी रंगांच्या दिसत होत्या. मी उठलो व कपडे करून खाली गेलो. तळघरात ओळीने बरीच बेसिन होती आणि दोन घसरड्या टॉवेलच्या गुंडाळ्या होत्या. माझ्या खिशात साबणाचा तुकडा होता. मी तोंड धुणार होतो तेव्हा मला प्रत्येक बेसिन तुंबलेले दिसले --- बुटाला चकाकी आणणाऱ्या काळ्या रंगाच्या पॉलिशसारख्या रंगाची चिकट, घनरूप घाण तिथे होती. मी तोंड न धुताच बाहेर आलो. जसे वर्णन केले गेलेले मी ऐकले होते, तसे काही हे ठिकाण स्वस्त व स्वच्छ नव्हते. तरीही मला नंतर सापडल्याप्रमाणे, बऱ्याच वाईट गोष्टींचे प्रतिनिधित्व करणारी अशी ती जागा होती.

मी नदी ओलांडली आणि पूर्वेला खूप वेळ चालत राहिलो. शेवटी टॉवर टेकडीवरील कॉफीच्या दुकानात गेलो. ते हजारो सर्वसामान्य दुकानांसारखे कॉफीचे दुकान होते. पण विचित्र वाटत होते. आणि पॅरीसनंतर वेगळे वाटत होते. ती थोडी कोंदट खोली होती. त्यात उंच पाठीचे फॅशनेबल बाक होते. तिथे आरशावर साबणाने चाळीस मेनू लिहिलेले होते. एक चौदा वर्षांची मुलगी खाद्यपदार्थांच्या ताटल्या आणून देत होती. नाविक दलातील लोक वर्तमानपत्रांच्या पुडक्यातून काही खात होते आणि चिनी मातीच्या मगातून चहा पित होते. एका कोपऱ्यात एक ज्यू एकटाच त्याच्या ताटलीत डोके घालून बसला होता व अधाशीपणे त्यातील भाजलेले काही खात होता.

मी त्या मुलीला म्हणालो, “मला चहा, पाव आणि लोणी मिळेल का?”

ती मला निरखून पहात आश्चर्याने म्हणाली, “लोणी नाही फक्त मार्गारीन” तिने मी मागवलेले पदार्थ परत उच्चारले. हे पॅरीसपेक्षा वेगळेपणाने आश्चर्यकारक होते. “मोठा चहा आणि दोन पाव!”

माझ्या बाकाशेजारील भिंतीवर एक नोटीस लावलेली होतीः ‘ साखरेची पाकिटे खिशात घालू नयेत. त्यात कुण्या कवी गिऱ्हाईकाने लिहिले होते,

‘जो साखर चोरेल त्याला

घाणेरडा समजले जाईल ---

पण अजून एकाने शेवटचे शब्द पुसून टाकायचे कष्ट घेतले होते. हे इंग्लंड होते. चहा आणि दोन पावांची किंमत साडेतीन पेन्स होती. माझ्याकडे आता फक्त आठ शिलिंग व दोन पेन्स राहिले.

## XXV

आठ शिलिंग मला तीन दिवस व चार रात्री पुरले. माझ्या वॉटरलू रस्त्यावरील भयानक अनुभवानंतर, मी पूर्वेकडे गेलो आणि पुढची रात्र पेनिफिल्डमधील एका लॉजमध्ये घालवली. हे लंडनमधील इतर लॉजसारखे होते. पन्नास ते शंभर माणसांची सोय करण्याची त्याची क्षमता होती. ते मालकासाठी एक अधिकारी चालवत असे. हे खूप फायदेशीर लॉज असून, ते श्रीमंत लोकांकडून चालवले जात असे. आम्ही पंधरा ते वीस पलंग असलेल्या मोठ्या हॉलमध्ये झोपलो. झोपायच्या गाद्या कडक व गार होत्या पण चादरी आठवड्यापूर्वी तरी धुतलेल्या असाव्यात. हे त्यातल्या त्यात बरे

होते. भाव नऊ पेन्स किंवा एक शिलिंग होता. एका शिलींगमध्ये हॉलमधील पलंग एकमेकांपासून चार फूटांऐवजी, सहा फूटांवर होते. अशी अट होती की तुम्ही संध्याकाळी सातपर्यंत तिथे पोचले पाहिजे. नंतर प्रवेश नाही. ही चौकस पण प्रसिद्ध गोष्ट होती, की उत्तर लंडनपेक्षा दक्षिण लंडनमध्ये ढेकूण कमी होते. काही कारणाने बऱ्याच ढेकणांनी अजून नदी ओलांडली नव्हती.

तळमजल्यावर सर्वांसाठीचे स्वयंपाकघर होते. तिथे भरपूर शेगड्या, अन्न शिजवण्याची भांडी, चहाची पत्ती आणि पाव भाजायचे चिमटे होते. तिथे दोन मोठ्या शेकोट्या होत्या. त्या वर्षभर रात्रंदिवस पेटलेल्या असत. स्वयंपाकघर पुसणे, विस्तव पेटलेला ठेवणे आणि अंथरुणे तयार करणे हे काम पाळीपाळीने लॉजमध्ये रहाणारे करत असत. एक वयाने मोठा तिथे रहाणारा, नॉर्मनसारखा दिसणारा स्टीव्ह नावाचा माणूस, होता. तो तेथील मुख्य होता. तो भांडणे सोडवे, त्रास देणाऱ्यांना व दारू पिऊन झिंगणाऱ्या हुसकून लावे. पण त्याबद्दल त्याला पगार मिळत नसे. छतापासून बांधलेल्या दोऱ्यांवर चिध्या झालेले धुतलेले कपडे लोंबत असत.

लाल माणसे, मुख्यत्वे हमाल, शेगड्यांपासून अन्न शिजवलेली भांडी घेऊन इकडे तिकडे फिरत असत. त्यातील काहीजण नग्न असत. कारण त्याचे धुऊन आलेले कपडे ओले असत व ते ते वाळायची वाट बघत असत. रात्री डुलक्यांचे, पट व सोंगट्यांचे खेळ चालत व गाणी म्हटली जात. ‘माझ्या पालकांनी काही चुकीचे केले आणि मी जन्मलो’ हे एक लोकप्रिय गाणे होते व दुसरे एक जहाज मोडले, त्यासंबंधी होते.

कधीकधी रात्री माणसे जगभर त्यांनी स्वस्त विकत घेतलेली दारू घेऊन येत आणि ती वाटत. सहसा तिथे अन्नपदार्थदेखील एकमेकात वाटले जात. साधारणपणे जो बेकार आहे, त्याचे पोट भरेल, असे बघितले जाई. एक,

सुरकुतलेला व अशक्त, डॉक्टरांनी अनेक भोके पाडलेला, तीन वेळा शस्त्रक्रिया झालेला, मरणपंथाला लागलेला, मनुष्य होता. त्याला दुसरे लोक नेमाने खायला घालत असत. तिथे रहाणारे दोघे तिघे म्हातारे पेन्शनर होते. त्यांना भेटेपर्यंत मला माहिती नव्हते, की इंग्लंडमध्ये आठवड्याला फक्त एक शिलिंग एवढे पेन्शन मिळणारे म्हातारे लोक रहातात. त्यांना उत्पन्नाचे इतर काही साधन नसते. त्यातील एकजण बडबड्या होता. तो कसा जगतो, हे मी त्याला विचारले. तो म्हणाला,

"काय आहे, नऊ पेन्स घेऊन झोपायला देणारी एक जागा आहे. म्हणजे आठवड्याला पाच शिलिंग, तीन पेन्स झाले. मग दाढीसाठी शनिवारी तीन पेन्स मी देतो --- म्हणजे पाच शिलिंग सहा पेन्स झाले. जर महिन्यातून एकदा केस कापले, तर सहा पेन्स. म्हणजे आठवड्याला अजून तीन पेन्स. त्यामुळे तुमच्याकडे अन्न आणि बेरी, द्राक्षे यासारख्या लहान फळांसाठी साधारण चार शिलिंग आणि चार पेन्स उरतात. त्याला इतर काही खर्चांची कल्पनाही करता येत नाही. त्याचे जेवण म्हणजे पाव, मार्गारीन आणि चहा!

--- आठवड्याच्या शेवटी कोरडा पाव आणि बिनदुधाचा चहा --- कदाचित त्याला कपडे कुणी देत असतील. पण तो समाधानी दिसत होता. त्याला मिळणाऱ्या झोपायच्या उबदार जागेवर तो जेवणापेक्षा खुश होता. पण आठवड्याला दहा शिलिंग इतकी आमदनी असतांना दाढीवर खर्च करणे, हे फारच चालना देणारे होते.

दिवसभर मी रस्त्यातून भटकत फिरत असे. पूर्वेला जाऊ शकेन तितके आणि पश्चिमेला व्हाईटचॅपेलपर्यंत. पॅरीसनंतर असे करणे चमत्कारिक होते. सगळीकडे स्वच्छ, शांत व तीच तीच उदासी! एखादा ट्रामच्या शिट्ट्यांवाचून, गल्ल्यांमधील गडबडीच्या जखमी आयुष्यापासून व चौकाचौकातून

असलेल्या शस्त्रधारी पोलिसांच्या खणखणाटाशिवाय, सुना सुना रहात असेल. गर्दीचे कपडे जास्त चांगले असत आणि चेहरे आकर्षक, सौम्य, एकसारखे आणि व्यक्तिगत भीती व फ्रेन्च दुष्टाव्याशिवाय असलेले दिसत. दारूबाजपणा, घाण, भांडणतंटे कमी होते व जास्त आळशीपणा होता. कोपऱ्यावर कमी खायला मिळणाऱ्या माणसांचे गट उभे असत. पण त्यांचे चहा व पावाचे दोन तुकडे खाणे, सतत चालू असे. लंडनवासी हे दर दोन तासांनी खात असतात. पॅरीसपेक्षा इथली हवा कमी उष्ण भासे. जसा पॅरीस हा बिस्ट्रो [लहानसा बार] व राबवून घेणाऱ्या कामगारांचा देश होता, तसेच लंडन हा चहाच्या किटल्यांचा व श्रमांची देवघेव करणारा देश होता.

गर्दीला न्याहाळणे, हे रुचीपूर्ण होते. पूर्व लंडनमधील स्त्रिया सुंदर असत. [कदाचित मिश्र रक्तामुळे.] तेथील वस्ती जुन्या वळणाची आणि गरिबीसाठी व घाणीसाठी प्रसिद्ध होती --- चिनी लोक, चिट्टगॉंग येथील भारतीय खलाशी, रेशमी मफलर विकणारे द्रविडीयन्स, काही शीख. हे कुठून आले कुणास ठाऊक! इकडून तिकडून रस्ते एकत्र मिळत होते. व्हाईटचॅपेलमध्ये ख्रिस्ताची शिकवण देणारा, कुणी गाणारा, तुम्हाला नरकापासून वाचवण्यासाठी अर्धा शिलिंग घेत असे. इस्ट इंडिया डॉक रस्त्यावर बचाव सेना सेवा देत होती. ते ‘प्यायलेल्या खलाशाचे काय करायचे’ या चालीवर गात होते, ‘इथे कुणी फसवणारा आहे का?’ मनोऱ्याच्या टेकडीवर दोन चर्चचे सभासद एका सभेमध्ये भाषण द्यायचा प्रयत्न करत होते. त्यांच्या मंचाभोवती ओरडून मध्येमध्ये बोलणाऱ्या लोकांची गर्दी उसळली होती. कोणीतरी एकाहून जास्त नवरे वा बायका असणाऱ्यांच्या नावे ते चुकीचे वागत असल्याबद्दल सांगत होते. एक बहुधा निरीश्वरवादी असणारा दाढीवाला लंगडा, देवाचे नाव ऐकून रागाने शिवीगाळ करत होता. तिथे उच्च रवात गोंधळलेले आवाज उमटत होते.

“माझ्या प्रिय मित्रांनो, जर तुम्ही आम्हाला जे म्हणायचे आहे ते बोलून दिले --- हं --- बरोबर आहे --- त्याना बोलू द्या. वाद घालू नका. नाही. नाही. तुम्ही मला उत्तर द्या. तुम्ही मला देव दाखवाल का? तुम्ही मला तो दाखवा. मग मी त्याच्यावर विश्वास ठेवेन. ओहो, गप्प बसा --- त्यांच्या मध्येमध्ये बोलू नका. स्वतःला गप्प करा. एकाहून जास्त नवरे वा बायका असणारे! अशा लोकांबद्दल खूप बोलण्यासारखे आहे. काही झाले तरी बायकांना उद्योगधंद्याबाहेर काढा. माझ्या प्रिय मित्रांनो, तुम्ही जरा --- नाही. नाही. तुम्ही याबाहेर पडा. तुम्ही देव पाहिला आहे का? तुम्ही त्याला स्पर्श केला आहे का? तुम्ही त्याच्याबरोबर हस्तांदोलन केले आहे का? वाद घालू नका. इत्यादी इत्यादी. मी वीस मिनिटे ऐकले. मला मॉरमोनिझम [जोसेफ स्मिथने १८३० मध्ये सुरु केलेला नवा धर्म] बद्दल जाणून घ्यायची उत्सुकता होती. पण सभेत नुसता गोंधळच चालू होता. रस्त्यावरील सभांचे बहुधा असेच होते. मिडलसेक्स रस्त्यावर बाजारातील गर्दीत, एका बाईला दंडाला धरून फरफटत चिखलात तुडवले गेले. तिने एक टीनचे भांडे तिच्या बचावासाठी उगारले. ती जोराने किंचाळत होती.

आई ओरडली, “तू छान वाटून घे. ‘तुला काय वाटते, मी तुला कशासाठी वाढवले? तुला कर्णा आणि काहीबाही कशासाठी आणून दिला? तुला मी मारायला हवे आहे का? अग वस्ताद लहानगे, तुझी मजा चालू आहे.”

कर्ण्यामधून, थुकीचे काही थेंब उडाले. जोरजोराने रडत, आई आणि मुलगी अदृष्य झाल्या. हे पॅरीसपेक्षा फारच वेगळे आणि विचित्र होते.

मी पेनीफिल्डमधील लॉजमध्ये असतांना शेवटच्या रात्री, तिथे रहाणाऱ्या दोघात भांडण झाले. ते फार वाईट दृष्य होते. एक सत्तरीचा, कपडे

धुवायला गेलेला, कंबरेपर्यंत उघडा म्हातारा पेन्शनर आक्रमकपणे एका शेकोटीकडे पाठ करून उभ्या असलेल्या जाड, बुटक्या हमालाला शिव्या देत होता. मला शेकोटीच्या उजेडात त्याचा रागावलेला, जवळजवळ रडायला आलेला चेहरा दिसत होता. नक्कीच काही गंभीर झाले होते.

म्हातारा पेन्शनरः तू --- !

हमालः तुझे तोंड बंद ठेव. तू मोठा जमीनदार असशील. पण मी ठरवून, हे करतो आहे.

म्हातारा पेन्शनरः तू हा विनोद करूनच दाखव --- मी तुझ्यापेक्षा तीस वर्षांनी मोठा आहे. पण तुला एक दणका देऊन, बादलीभर मुतायला लावणे, मला काही अवघड नाही.

हमालः आहा, आणि नंतर कदाचित मी तुझी खांडोळी करेन. तू म्हातारडा!

असे पाच मिनिटे चालले होते. आसपासचे लोक भांडणाकडे हताश होऊन बघत बसले होते. हमाल रागावलेला दिसत होता. पण म्हातारा अजून अजून चिडत चालला होता. भिंतीवरील मांजरासारखा थोड्या अंतरावरून, शिव्या देण्यात अगदी टोकाला जात, हमालाच्या अंगावर धाऊन जात होता. त्याच्या अंगावर थुकत होता. तो गुद्दे मारायला बघत होता. पण त्यात यशस्वी होत नव्हता. शेवटी तो ओरडला, "ए --- तू तसलाच आहेस. ---त्याचा चिकट घास करून, तो गिळ. तू --- मी तुला चिरडून टाकेन --- तू तसलाच आहेस. वेश्येचा मुलगा! तू ते चाट. मी तुझ्याबद्दल असाच विचार करतो --- तू --- तू --- तू --- घाणेरडा काळा भिकारडा!"

तो अचानक एका बाकावर कोसळला. त्याने चेहरा हातात झाकला व रडू लागला. लोकांचे मत त्याच्याविरुद्ध जात असल्याचे पाहून, दुसरा माणूस निघून गेला.

नंतर मी स्टीव्हला भांडणाचे कारण स्पष्ट करतांना ऐकले. हे सर्व एक शिलिंग किमतीच्या अन्नासाठी चालले होते. काही कारणाने म्हाताऱ्याचा पाव व मार्गारीन हरवले होते. त्यामुळे पुढचे तीन दिवस त्याला कोणी दया येऊन काही दिल्याशिवाय, खायला मिळणार नव्हते.

हमाल काम करत होता व भरपूर खात होता. त्याने म्हाताऱ्याला टोमणे मारल्याने भांडण सुरु झाले.

जेव्हा माझ्याकडे फक्त एक शिलिंग आणि चार पेन्स राहिले, तेव्हा मी आठ पेन्स असा भाव असलेल्या बोमधील लॉजमध्ये झोपायला गेलो.

एखादा अरुंद बोळातून दहा फुटांचा चौरस असलेल्या तळघरात गेलो, तर तिथे बहुधा बांधकाम मजूर असलेले दहाजण शेकोटीच्या भीतीदायक ज्वाळांशेजारी बसलेले होते. ती मध्यरात्र होती. पण अशक्त, चिकट पाच वर्षांचा म्होरक्याचा मुलगा त्याच्या गुडघ्यांवर खेळत होता. एक म्हातारा आयरिश मनुष्य छोट्या पिंजऱ्यातील लहानशी, जाड चोच आणि गडद पंख असलेल्या आंधळ्या गाणाऱ्या पक्षाला शीळ घालत होता. तिथे गाणारे इतर लहानसे, मंद पक्षीदेखील होते. त्या लोकांनी त्यांचे सर्व आयुष्य जमिनीखाली काढले होते. तिथे रहाणाऱ्या त्या लोकांनी सवयीने अनेक संकटे झेलली होती. आणि अशा तऱ्हेने यार्डभर अंतर ओलांडून तेथील शौचालयात जाणे टाळले होते. मी टेबलाशी बसलेलो असतांना माझ्या पायाशी काही भुळभुळले. खाली पाहिल्यावर दिसले, की जमिनीवर एक काळी वस्तू हळू चालत होती. ते काळे टोळ होते.

तेथील हॉलमध्ये सहा पलंग होते आणि चादरींवर मोठ्या अक्षरात असे लिहिले होते, '--- क्रमांकाच्या रस्त्यावरून चोरलेले.' त्यांना उबग येईल, असा वास येत होता. माझ्याशेजारील पलंगावर एक खूप म्हातारा फुटपाथ बनवणारा कलाकार माणूस झोपला होता. त्याच्या कण्याचा बाक काही विचित्र होता. त्यामुळे तो पलंगामधून जवळजवळ बाहेरच पडला होता आणि त्याची पाठ माझ्या चेहऱ्यापासून एक दोन फुटांवर होती. ती उघडी व मळाच्या सुरकुत्यांनी भरलेली होती. रात्री एक प्यायलेला आजारी मनुष्य आला व जमिनीवर माझ्या पलंगाजवळ झोपला. तिथेही ढेकूण होते, पण पॅरीसइतके नसले, तरी एखाद्याची झोपमोड करण्याइतके होते. ती घाणेरडी जागा होती. तरी अधिकारी व त्याची बायको हे चांगले मित्रत्वाने वागणारे लोक होते. ते रात्रंदिवस कधीही कुणासाठी एखादा कप चहा करायला तयार असत.

## XXVI

सकाळी नेहमीच्या चहाचे व दोन पावाच्या तुकड्यांचे पैसे दिल्यावर व एक औंस तंबाखू खरेदी केल्यावर, माझ्याकडे अर्धा पेनी उरला. मी अजून तरी बी ला पैसे देण्यासंबंधी काही विचारायचे कष्ट घेतले नाहीत. पण मला जन्मतः व्यंग असलेल्या, मूर्ख लोकांच्या वॉर्डला भेट द्यायची होती. हे कसे जमवायचे, ते मला माहिती नव्हते. पण रोमटॉन येथे तसे एक असल्याचे मला माहिती होते. त्यामुळे मी तिकडे दुपारी चार वाजता पोचलो. रोमटॉनच्या बाजारातील डुकरांच्या खुराड्यातून डोकावून पाहिले, तेव्हा तिथे एक सुरकुतलेला, म्हातारा आयरिश मनुष्य दिसला. नक्कीच तो भटक्या असावा. मी त्याच्या शेजारी गेलो आणि त्याला तंबाखू देऊ केली. त्याने ती डबी

उघडून आश्चर्याने पाहिले व म्हणाला, “अरे देवा, ही तुला कुठे मिळाली? तू डे रस्त्यावर फार काळ नसावास.”

मी म्हणालो, “तुम्हाला रस्त्यावर तंबाखू विकत मिळत नाही का?”

“हो, मिळते ना. ही बघ.”

त्याने एका गंजक्या डबीतून गाईच्या मासाचे चौकोनी तुकडे दाखवले. त्यात फुटपाथवरुन जमवलेली सिगरेटची तीस थोटके होती. तो आयरिश मनुष्य म्हणाला इथे अगदी क्वचित दुसऱ्या कुठल्या प्रकारची तंबाखू मिळते. त्याने काळजीपूर्वक रीत्या पुढे  सांगितले, की लंडनच्या फूटपाथवर एका दिवसात दोन औंस तंबाखू तुम्ही गोळा करू शकता.

त्याने मला विचारले, “तू लंडनच्या बेघरांच्या लॉजमधून आला आहेस का?”

मी असा विचार करून हो म्हणालो, की त्यामुळे तो मला मित्रासारखी जवळीक वाढवून देईल. मी त्याला रोमटॉन येथील बेघरांचे लॉज कसे आहे, ते विचारले.

“तिथे दाट कोको असतो. तो टोचतो. दाट चहा, दाट कोक, ओटमील आणि पाण्यापासून बनवलेला दाट पदार्थ. रोमटॉनमध्ये तो देत नाहीत. देवाची कृपा आहे --- निदान मी तिथे होतो, तेव्हा तरी देत नव्हते. तेव्हापासून मी यॉर्क [उत्तर इंग्लंडमधील एक सुंदर शहर] आणि वेल्सच्या आसपास आहे.”

मी म्हणालो, “किती खुबीदार!”

“खुबीदार? रात्री घाणेरड्या ओटमिलबरोबर गरम पाणी देतात, तो युक्तीबाजपणा आहे. ते गिळणे नेहमीच भयंकर आहे.” आम्ही एक दोन तास बोलत बसलो. तो म्हातारा आयरीश मनुष्य मित्रत्वाने वागत होता. पण त्याला

फार घाणेरडा वास येत होता. त्याला झालेल्या रोगांची नावे ऐकल्यावर त्याचे आश्चर्य वाटायचे काही कारण नव्हते. असे दिसत होते, की [त्याने त्याला होत असलेली लक्षणे पूर्णपणे वर्णन केली.] वरपासून खालपर्यंत त्याच्यामध्ये खालील गोष्टी चुकीच्या होत्या. त्याच्या टक्कल असलेल्या कपाळावर एक्झिमा झाला होता. त्याला ऱ्हस्वदृष्टी होती आणि चष्मा नव्हता. त्याला जुना ब्रॉन्कायटीस होता. त्याला काही उपाय न केलेले पाठीचे दुखणे होते. त्याला अपचनाचा त्रास होता. त्याच्या मूत्रवाहिनीचा दाह होत होता. व्हेरिकोज व्हेन्सचे दुखणे होते. तळपाय सपाट होता. त्यामुळे अंगठ्याला सूज येत असे. इतक्या साऱ्या रोगांसकट तो गेली पंधरा वर्षे रस्ते तुडवत होता.

साधारण पाच वाजता तो म्हणाला, "तू मला एक कप चहा देशील का? ते दुकान सहापर्यंत उघडत नाही."

"मला वाटते, देऊ शकेन."

"ठीक आहे. इथे जवळ एक जागा आहे. तिथे तुम्हाला एक कप चहा आणि पाव फुकट मिळतो. तो चहा चांगला असतो. मात्र नंतर ते तुम्हाला नको इतक्या प्रार्थना म्हणायला लावतात. भिकार लोक! त्यात तुमचा खूप वेळ जातो. तू माझ्याबरोबर ये."

त्याने मला बाजूच्या रस्त्यावर एक टीनचा पत्रा असलेल्या ठिकाणी नेले. ते गावातील क्रिकेटच्या मैदानावरील स्वागतकक्षासारखे होते. सुमारे पंचवीस भटके लोक थांबले होते. त्यातील काही घाणेरडे, म्हातारे सतत फिरणारे भटके लोक होते. बरचसे चांगले दिसणारे लोक उत्तरेकडचे असून ते खाणीत किंवा कापसाच्या कारखान्यात काम करणारे होते. आता दार उघडले व निळा रेशमी ड्रेस केलेल्या, सोनेरी चष्मा व गळ्यात क्रूस घातलेल्या एका बाईने आमचे स्वागत केले. आत तीस चाळीस कडक खुर्च्या होत्या. एक

हार्मोनियम व येशूला सुळी देतानाचे रक्तपात दाखवणारे चित्र होते. आम्ही अस्वस्थतेने आमच्या टोप्या काढल्या व बसलो. त्या बाईने आम्हाला चहा दिला. आम्ही खातपित असतांना, ती पुढेमागे होत होती व दयाळूपणे धार्मिक विषयावर बोलत होती. येशू ख्रिस्ताने नेहमी आमच्यासारख्या गरीब लोकांवर, दया दाखवावी, असे म्हणत होती. चर्चमध्ये कसा वेळ गेला तेच समजले नाही. जर रस्त्यावरील माणसाने नियमितपणे प्रार्थना म्हटली, तर किती फरक पडतो, हे मला कळले.

पण आम्हाला ते आवडत नसे. आम्ही भिंतीशी बसून आमच्या टोप्या बोटाने फिरवत बसत असू. [डोक्यावरील टोपी काढली तर भटक्याला चांगले वाटत नाही.] ती बाई व्याख्यान देत असतांना, काहीतरी बोलणे आणि गुलाबी होणे, हे आम्ही करत असू. ती हे सर्व काही दयाळूपणे करत असे, यात काही संशय नाही. हातात पावांची ताटली घेतलेल्या मुलाला वर येऊन तिने विचारले, "माझ्या मुला, तू गुडघे टेकून स्वर्गातील येशूशी बोलल्याला किती वेळ झाला?"

बिचारा तो मुलगा काही बोलू शकला नाही. पण त्याचे पोट बोलले. पाव बघितल्यावर नको ते गुरगुर असे आवाज काढू लागले. त्यानंतर त्याला इतकी लाज वाटली, की त्याला पावही धड खाता येईना. फक्त एक माणूस त्या बाईला तिच्याच आविर्भावाने उत्तर देऊ शकला आणि तो म्हातारा पण चटपटीत, लाल नाकाचा व दारूबाजपणामुले त्याची नोकरी गमावलेल्या ऑफिसरसारखा दिसत होता होता. तो हे शब्द बोलू शकला,

"येशू देवा, मी बघितलेल्या कुणाहीपेक्षा कमी लाजून मी सांगतो." तो हे नक्की तुरुंगात शिकलेला असणार.

चहा संपला. भटके लोक कुणाच्या नकळत एकमेकांकडे पाहू लागले.

प्रत्येकाच्या मनात एकच विचार चालू होता --- प्रार्थना सुरु व्हायच्या आधी आपल्याला सटकता येईल का. कोणीतरी त्याची खुर्ची हलवली. खरे तर तो उठत नव्हता, पण नुसता दाराकडे कटाक्ष टाकून जणू इथून निघून जाण्याचे सुचवत होता. त्या बाईने त्याला एका नजरेने दटावले. ती नेहमीपेक्षा दयाळू आवाजात बोलली, "तुम्हाला आताच बाहेर जायचे आहे, असे मला वाटत नाही. हे दार सहा वाजेपर्यंत उघडणार नाही. आपल्याला गुडघे टेकून येशूसाठी प्रार्थना म्हणायला हवी. मला वाटते, त्यानंतर सगळ्यांना बरे वाटेल, नाही का?"

लाल नाकाचा माणूस खूप मदत करत होता. त्याने त्या जागी हार्मोनियम आणली व प्रार्थनेची पुस्तकेही तो हाताळत होता. त्याने त्याची पाठ त्या बाईकडे केल्यामुळे, तो प्रार्थनेची पुस्तकेही पत्ते असल्यासारखी हाताळून, विनोद निर्माण करत होता व असे करतांना प्रत्येक माणसाबरोबर कुजबुजत होता.

"अरे मित्रा, तू डुलकी काढू बघतो आहेस! चार एक्के आणि एक राजा!"

डोक्यावर टोपी नसलेले आम्ही चहाच्या उष्ट्या कपांमधून जात गुडघ्यात वाकलो व आम्ही न केलेल्या, पण करायला हव्या होत्या, अशा गोष्टी पुटपुटुन करू लागलो. पण आमच्यात त्राण नव्हते. ती बाई फार उत्साहाने प्रार्थना म्हणत होती. तिचे डोळे आमच्यावर नजर ठेऊन होते. आमचे प्रार्थनेत लक्ष असल्याची ती खात्री करत होती. जेव्हा ती बघत नव्हती, तेव्हा आम्ही हसत होतो, एकमेकांकडे बघत होतो आणि हे दाखवण्यासाठी लैंगिक विनोद करत होतो, की आम्हाला काही पर्वा नाही. पण असे करतांना आमच्या घशात कधीकधी आवंढा येत होता. लाल नाकवाला माणूस

आमच्या कुजबुजण्यावर  प्रतिक्रिया देण्याइतकी जाणीव असलेला असेल, असे कुणाला वाटले नव्हते. गाणे सुरु झाल्यावर आम्हाला बरे वाटले. पण भटक्या म्हाताऱ्याला ‘ख्रिश्चन सैनिकानो पुढे चला’ याची चाल माहिती नव्हती आणि तो ती चाल बिघडवत होता. प्रार्थना अर्धा तास चालली होती, आणि मग दाराला एक धक्का देऊन, आम्ही बाहेर पडलो. आम्ही बाहेर पडल्याबरोबर कुणी ऐकत नसल्याचे बघून, कुणीतरी म्हणाले, “चला त्रास संपला. मला असे वाटत होते --- की ही प्रार्थना कधी संपणारच नाही.”

दुसरा म्हणाला, “तुम्ही आणि तुमचा पाव! तुम्हाला त्याची किंमत पडणारच. त्यासाठी प्रार्थना म्हणा, असे मला तुम्हाला सांगायचे आहे. आहा, काही न देता, तुम्हाला बरेचसे मिळत नाही. तुम्ही गुडघ्यात वाकला नाहीत, तर ते तुम्हाला दोन पेनीचा चहादेखील देणार नाहीत.”

हे सर्वांना कबूल असल्याची कुजबुज झाली. म्हणजे जरी चहा छान असला, तरी त्यासाठी भटके ऋणाईत नव्हते. कॉफीच्या दुकानात मिळणाऱ्या चहापेक्षा तो वेगळा होता. बोर्डेक्स या फ्रान्समधील भागाच्या लालपांढऱ्या वाइनइतका तो छान होता. तो पिऊन आम्हाला आनंद झाला. तो आम्हाला लाजवण्याच्या उद्देशाने मुळीच दिला गेला नाही, तर चांगल्या भावनेने दिला गेला. त्यामुळे खरे तर आम्ही त्याबद्दल ऋणी असायला हवे होते. पण आम्ही तसे नव्हतो.

## XXVII

साधारण पावणेसहा वाजता, आयरिश माणसाने मला बेघर लोकांसाठी असलेल्या लॉजमध्ये नेले. ते चौकोनी, पिवळ्या विटांचे, गंभीर दिसणारे लॉज एका जमिनीवर उभे होते. त्याला गज असलेल्या लहानशा

खिडक्या होत्या. उंच भिंती होत्या आणि त्याला रस्त्यापासून अलग करणारे लोखंडी दार होते. ते बरेचसे तुरुंगासारखे दिसत होते.

तिथे आधीच चिंध्या पांघरलेल्या लोकांची रांग लागली होती. ते दार उघडायची वाट बघत होते. ते सर्व प्रकारचे व सर्व वयाचे होते. एक ताज्या चेहऱ्याचा सोळा वर्षांचा मुलगा होता आणि एक त्याच्या दुप्पट आकाराचा, दातपडका, पंच्याहत्तर वर्षांचा सर्वात म्हातारा प्रेतवत दिसणारा माणूस होता. काही पक्के भटके होते. त्यांच्या काठ्या आणि एनॅमलच्या पातेल्यांवरुन, ते लक्षात येत होते. काही कारखान्यात काम करून निवृत्त झालेले होते. काही शेतमजूर होते. एक कॉलर व टाय घातलेला कारकून होता आणि दोघे नक्की मूर्ख होते. त्या गर्दीत घुटमळणारे लोक बघणे हे उबग आणणारे दृष्य होते. काहीच आब नसलेले, खलनायकासारखे धोकादायक, केस गळलेले, खाज सुटणारे, त्वचारोग झालेले लोक असलेली, ती गर्दी होती. सर्वजण जवळजवळ स्पष्टपणे अर्धपोटी व चिंध्या पांघरलेले होते. तरीही ते मित्रत्वाने वागणारे होते आणि काही प्रश्न विचारत नव्हते. बऱ्याचजणांनी मला तंबाखू --- सिगरेटची थोटके दिली.

आम्ही भिंतीशी झुकलो व सिगरेट ओढू लागलो. अलीकडे ते ज्या लॉजमध्ये राहिले, त्याबद्दल भटक्यांनी बोलायला सुरवात केली. त्यावरून असे दिसले, की सगळी बेघरांची लॉजेस वेगवेगळी असतात. प्रत्येकात काही गुणदोष असतात आणि तुम्ही बेघर म्हणून जेव्हा रस्त्यावर फिरत असता, तेव्हा ते जाणून घेणे महत्वाचे असते. एखादा म्हातारा तुम्हाला इंग्लंडमधील प्रत्येक लॉजची वैशिष्ट्ये सांगू शकेल. उदाहरणार्थ, बेघरांचे लॉज अ मध्ये सिगरेट ओढता येते पण तिथे ढेकूण आहेत. बेघरांचे लॉज ब मध्ये पलंग चांगले आहेत पण तेथील हमाल त्रासदायक आहेत. बेघरांचे लॉज क मध्ये ते

तुम्हाला सकाळी लवकर बाहेर जाऊन देतात पण चहा अत्यंत भिकार असतो. बेघरांचे लॉज ड मध्ये जर तुमच्याकडे पैसे असले, तर ते चोरले जातात व असे सतत चालू असते. जेव्हा बेघरांची लॉज एकमेकांपासून फारशी लांब नसतात, तेव्हा त्या दोन्हीमध्ये सतत जा ये चालू असते. मला सांगण्यात आले, की बार्ने-सेंट अल्बान्स हा सर्वात चांगला रस्ता आहे आणि त्यांनी मला ताकीद दिली, की बिलेरीके, चेल्मफोर्ड व केंटमधील लडे टेकडी इथेच फक्त फिरत जा. चेल्सी हे इंग्लंडमधील सर्वात आरामदायी बेघरांचे लॉज आहे. कोणीतरी त्याची स्तुती करतांना म्हणाले, तिथले रग बेघरांच्या लॉज मधल्यापेक्षा तुरुंगातल्यासारखे होते. भटके लोक उन्हाळयात लांबलांबच्या ठिकाणी जातात. हिवाळयात ते शक्यतो मोठ्या शहरांच्या आसपास रहात. कारण तिथे जरा उबदार असे व लोक दानशूर असत. पण असा नियम असल्याने, की तुम्ही लंडनमधील एका किंवा दोन बेघरांच्या लॉजमध्ये महिन्यातून एकपेक्षा जास्त वेळा राहू शकत नाही, भटक्यांना सतत भटकत रहावे लागते. नाहीतर त्यांना आठवडाभर कुठेच आश्रय मिळत नाही.

कधीकधी संध्याकाळी सहानंतर दारे उघडली जात आणि आम्हाला ओळीने आत घेतले जाई. मोकळया जागी एक कार्यालय होते. तिथे एका नोंदपुस्तकात नाव, व्यवसाय, वय आणि आम्ही कुठून आलो व कुठे जाणार तेदेखील लिहिले जाई. भटक्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी हा शेवटचा भाग लिहिला जाई. मी माझा व्यवसाय रंगारी असा दिला. मी पाण्याचे रंग दिलेले होते, कोणी दिले नसतील? आमच्याकडे काही पैसे आहेत का, हे सुद्धा विचारले जाई आणि प्रत्येकजण म्हणे नाही. जर तुमच्याकडे आठ पेन्सपेक्षा जास्त पैसे असतील, तर तुम्ही अशा लॉजमध्ये शिरणे, हा गुन्हा ठरत असे. यापेक्षा कमी रक्कम दारावर त्यांना द्यावी लागे. पण बेकायदेशीरपणे, भटके त्यांचे पैसे कापडाच्या तुकड्यात बांधून, ते

वाजणार नाहीत, याची काळजी घेत. सहसा ते ते पैसे ढापलेल्या चहाच्या वा साखरेच्या लहान पाकिटात ठेवत. किंवा त्यांच्याकडील बायबलच्या पवित्र कागदात ठेवत, जे कधीच तपासले जात नसत.

कार्यालयात नोंद केल्यावर, आम्हाला तेथील अधिकारी [ त्याचे काम आमच्यावर लक्ष ठेवणे असे आणि तो सहसा दरिद्री कामगार असे.] एका नेमलेल्या माणसाकडून, बेघरांच्या लॉजच्या आत आम्हाला नेले जात असे. हमालाचा निळ्या गणवेषातील महाकाय, सतत अंगावर ओरडणारा आक्रमक माणूस आम्हाला गुरासारखे हाकलत नेत असे. बेघरांच्या लॉजमध्ये फक्त शौचालय व बाथरूम असे आणि बाकी म्हणजे मोकळी अंधारी, कदाचित शंभर दगडी खोल्यांची दुहेरी ओळ असे. ती उजाड, अंधारी, दगडी, पांढरा रंग दिलेली जागा असे. कशीबशी स्वच्छ ठेवलेली असे. तिथे काहीसा मऊ साबणाचा, जेयस  द्रावणाचा व मूत्राचा वास येत असे. तो थंड, धीर गळेल असा व दुसऱ्याचे चारित्र्य लक्षात येईल, असा असे.

हमाल आम्हाला हाकलत पॅसेजमध्ये आणी मग आम्हाला सहा जणांना एकत्र बाथरूममध्ये जायला सांगे. पण त्यापूर्वी आमची झडती घेतली जाई. ती पैसे व तंबाखूसाठी असे. रोमटॉन अशा बेघरांच्या लॉजपैकी एक होते, जिथे एकदा तुम्ही तुमची तंबाखू आत नेलीत, की तुम्ही धूम्रपान करू शकत होतात. पण तुम्ही असे करतांना सापडलात तर मात्र, तुम्ही पकडले जाता. जुन्या लोकांनी आम्हाला सांगितले होते, की हमाल गुडघ्याखाली कधीच तपासत नाहीत. त्यामुळे आम्ही आत जाण्यापूर्वी तंबाखू आमच्या बुटांच्या घोट्याजवळ लपवून ठेवत असू.

नंतर कपडे काढतांना, ती आम्ही उशी म्हणून वापरायच्या आमच्या कोटात ठेवत असू. तसे करायला परवानगी होती.

बाथरूममधले दृष्य असामान्यपणे शिसारी आणणारे असे. पन्नास पूर्ण नागडी माणसे, फक्त दोन बाथटब असलेल्या व दोन जाड आणि चिकट टॉवेलच्या गुंडाळया असलेल्या  वीस चौरस फुटाच्या जागेत, कोंबली जात. घाण पाऊलांचा दर्प मी कधीच विसरू शकणार नाही. अर्धे भटके तरी खरी अंघोळ करत. [मी त्यांना असे म्हणतांना ऐके, की गरम पाणी त्यांचे शरीर दुबळे करते.] पण ते सगळे त्यांचा चेहरा आणि पाय धूत असत. पायाच्या बोटांभोवती साठलेला तेलकट मळ ते काढत. फक्त पूर्ण अंघोळ करणाऱ्यानाच ताजे पाणी मिळत असे. त्यामुळे अनेकांना दुसऱ्यांनी पाय धुतलेल्या पाण्यात अंघोळ करावी लागे. हमाल आम्हाला पुढेमागे ढकले व कुणी वेळकाढूपणा करू लागले तर, तोंडाने घाण घाण शिव्या देई. जेव्हा माझी अंघोळीची पाळी आली, तेव्हा मी विचारले की तो घाणेरडा टब माझ्या अंघोळीपूर्वी मी रिकामा करू शकतो का. मला उत्तर मिळाले, “तुझे तोंड गप्प ठेव आणि झटपट अंघोळ उरक.” यावरून त्या जागेचा  सामाजिक स्तर लक्षात येतो. मी परत काही बोललो नाही. जेव्हा आमच्या अंघोळी संपल्या, तेव्हा हमालाने आमच्या कपड्यांचे गाठोडे बांधून आम्हाला तेथील संशयास्पद रीत्या स्वच्छ असलेले, रात्रीच्या गाउनसारखे आखूड --- करडे, सुती शर्ट दिले. आम्हाला लगेच खोल्यांमध्ये पाठवण्यात आले व हमाल व मेजर यांनी आमचे जेवण आणले. प्रत्येकाच्या वाट्याचे जेवण होते, अर्धा पौंड वजनाचा मार्गारीन लावलेला पाव आणि एका मगमध्ये चिमूटभर बिनसाखरेचा कोको. जमिनीवर बसून आम्ही पाच मिनिटात त्याचा फडशा पाडत असू आणि सात वाजता तेथील दारे बाहेरून सकाळी आठपर्यंत बंद केली जात.

प्रत्येक माणसाला त्याच्या मित्राबरोबर झोपायची परवानगी होती. कारण प्रत्येक खोलीत दोघांची झोपायची सोय होती. मला कुणी मित्र

नसल्याने मला कुणा एकाकी माणसाबरोबर झोपावे लागले. तो एक बारीक, ओंगळ चेहऱ्याचा, मिचमिच्या डोळ्यांनी बघणारा  माणूस होता. ती दगडी खोली आठ बाय पाचची असून आठ फूट उंच होती. तिला उंच भिंतीवर एक गज असलेली खिडकी होती. तुरुंगाच्या दाराला असते, तसे पहाणी करण्यासाठी दाराला एक भोक होते. त्यात सहा रग व एक तपेली होती व एक गरम पाण्याची नळी होती, एवढेच. त्यात काही कमी आहे, अशा भावनेने मी आजूबाजूला पाहिले, तेव्हा काय कमी होते, हे कळल्यामुळे मला आश्चर्याचा धक्का बसला आणि मी उद्गारलो,

“पण पलंग कुठे आहेत?”

दुसरा मनुष्य नवल वाटून म्हणाला, “पलंग? इथे पलंग नाहीत. तुझी काय अपेक्षा आहे? हे असे बेघरांचे लॉज आहे, की जिथे तुम्ही जमिनीवर झोपता. देवा रे, अजून तुम्हाला त्याची सवय झाली नाही का?”

बेघरांच्या लॉजमध्ये पलंग नसणे, ही अगदी सर्वसामान्य गोष्ट होती. आम्ही आमचे कोट काढून, ते गरम पाण्याच्या नळीशेजारी ठेवत असू व आम्हाला स्वतःला जितके आरामशीर करता येईल, तितके करत असू. पण ते फार त्रासदायकपणे कोंदट ठरत असे

सर्व रग खाली अंथरले, तरी उब येत नसे. आम्ही एकमेकांपासून फूटभर अंतरावर असू. आमचे श्वास एकमेकांच्या अंगावर जात व उघडे हात एकमेकांना लागत. झोप लागल्यावर आम्ही एकमेकांच्या अंगावर जात असू. कुशीवर वळतांना हातापायांची हालचाल होत असे. पण त्याने काही चांगले होत नसे. कसेही वळले, तरी कडक जमिनीमुळे, प्रथम मुंग्या आल्यासारखी व नंतर जोराने दुखल्याची भावना होत असे. एखाद्याला तिथे फक्त दहा मिनिटे झोप लागू शके.

मध्यरात्री माझ्या शेजारचा माणूस होमो असल्यासारखी शारीरिक लगट करू लागला. कुलुपबंद, काळोखी जागेत हा नकोसा अनुभव होता. तो एक अशक्त माणूस होता आणि मी त्याला सहज ढकलून देऊ शकलो. पण परत झोप लागणे अशक्य होते. उरलेली रात्र आम्ही सिगरेट ओढत व बोलत जागे होतो. त्या माणसाने मला त्याच्या आयुष्याची गोष्ट सांगितली --- तो फिटर होता. तीन वर्षे कामासाठी बाहेर होता. तो म्हणाला की त्याचे काम सुटले, तेव्हा त्याच्या बायकोने त्याला एकटे पाडले आणि तो इतका काळ बाईपासून दूर राहिला की तो बायका कशा असतात, तेच विसरून गेला. अशा लोकांमध्ये किंवा भटक्या लोकांमध्ये समलैंगिकता आढळते, असे तो म्हणाला.

आठ वाजता हमाल आला. त्याने दार उघडले व ओरडला, "सगळेजण बाहेर चालते व्हा." उघड्या दारामधून शिळा भपकारा आला. लगेच करड्या शर्टांच्या, बाथरुमला जाण्यासाठी घाई करणाऱ्या वाईट वासांच्या आकृत्यांनी, पॅसेज भरून गेला. असे दिसत होते, की सकाळी अनेकांना मिळून एक टब पाणी दिले गेले होते. मी जेव्हा तिथे आलो, तेव्हा आधीच तिथे वीस भटक्यांनी तोंड धुतले होते. मी त्या काळया पाण्याकडे एक नजर टाकली आणि तोंड वगैरे काही धुतले नाही. यानंतर आम्हाला रात्रीच्या जेवणासारखाच नाश्ता देण्यात आला. आमचे कपडे आम्हाला परत करण्यात आले आणि आम्हाला अंगणात काम करण्यासाठी पाठवण्यात आले. गरीब लोकांसाठी बटाट्यांची साले काढायचे काम होते. पण ते डॉक्टर येईपर्यंत आम्हाला गुंतवून ठेवण्यासाठीचे फक्त प्रातिनिधिक काम होते. बरेचसे भटके मोकळेपणे कामात कुचराई करत होते. दहा वाजता डॉक्टर आले. मग आम्हाला परत खोल्यांमध्ये जायला सांगण्यात आले व कपडे काढून तपासणीसाठी थांबायला सांगण्यात आले.

नागडे होऊन कुडकुडत, आम्ही पॅसेजमध्ये रांग लावून उभे राहिलो. तुम्हाला कल्पना करता येणार नाही, की त्या निर्दयी सकाळच्या वेळी, आम्ही किती नाशकारक व अनैतिक कुत्र्यसारखे दिसत होतो. भटक्याचे कपडे वाईट असतात. पण ते खूप वाईट गोष्टी लपवतात. तो खरा कसा आहे, हे समजण्यासाठी तुम्ही त्याला नागडेच पाहिले पाहिजे.

सपाट तळपाय, फुगलेली पोटे, पोकळ छाती, ओघळलेले स्नायू --- प्रत्येक प्रकारच्या शारीरिक कमतरता तिथे होत्या. बहुधा प्रत्येकजण कुपोषित होता आणि काहीजणांना स्पष्टपणे आजार झालेला होता. दोन माणसांनी आधारासाठी काही उपकरणे [पट्टा इ.] लावलेली होती. आणि प्रेतवत दिसणाऱ्या पंच्याहत्तरीच्या माणसाने कसे काय एवढे दिवस काढले, ते कळत नव्हते. आमच्या दाढी न केलेल्या व पुरेशी झोप न झालेल्या चेहऱ्यांकडे बघून, तुम्हाला असे वाटले असेल, की आम्ही सर्वजण आठवड्याभराच्या दारू पिण्यातून आता कुठे सावरत आहोत.

ही तपासणी केवळ कांजिण्या झाल्या नाहीत ना, हे बघण्यासाठी होती आणि आमच्या एकंदरीत तब्येतीबद्दल त्यांना काही देणेघेणे नव्हते. एक तृतीय वर्षाचा वैद्यकीय विद्यार्थि सिगरेट ओढत रांगेच्या कडेने आमच्याकडे वरपासून खालपर्यंत बघत, भरभर चालत गेला. पण एखादा माणूस बरा आहे वा आजारी आहे का हे त्याने विचारले नाही. जेव्हा माझ्या खोलीतील सहकाऱ्याने कपडे काढले, तेव्हा त्याची छाती लाल पुरळाने भरलेली मला दिसली. सबंध रात्र त्याच्यापासून काही इंच अंतरावर राहून, मला ही कांजिण्या होतील, की काय अशी भीती मला वाटू लागली. पण डॉक्टरांनी त्याला तपासल्यावर ते पुरळ कुपोषिततेमुळे असल्याचे सांगितले.

तपासणीनंतर आम्ही कपडे घातले आणि आम्हाला अंगणात पाठवण्यात आले. तिथे हमालाने आमची नावे पुकारली. आमचे काही सामान राहिले असल्यास आम्हाला दिले आणि जेवणाची तिकिटे वाटली. ती प्रत्येकी सहा पेन्सची होती. आदल्या दिवशी आम्ही आमच्या रस्त्यावरील कॉफीच्या दुकानांच्या दिलेल्या नावावरून खूप भटक्यांना वाचता येत नसलेले पाहून, आम्हाला मजा वाटली. मला आणि तेथील काही सुशिक्षितांना त्यांची तिकिटे वाचून दाखवावी लागली.

दारे उघडली गेली आणि लगेच आम्ही बाहेर पडलो. --- उप नगरातील मागील रस्त्यांची व बाहेरचीही हवा किती छान होती --- बंद झाल्यावरही, बेघरांच्या लॉजचा येणारा उग्र दर्प! --- बटाटे सोलताना माझी एका पॅडी जॅक्यूस नावाच्या आयरिश भटक्याबरोबर मैत्री झाली. तो एक उगीचच उदास रहाणारा, अशक्त पण स्वच्छ व नीटनेटका असणारा मनुष्य होता. तो एडबरी येथील बेघरांच्या लॉजमध्ये चालला होता. त्याने सुचवले, की आपण बरोबर जाऊ. आम्ही निघालो व तिथे दुपारी तीन वाजता पोचलो.

आम्ही बारा मैल चाललो, पण उत्तर लंडनच्या ओसाड झोपडपट्टीतून जातांना रस्ता चुकल्याने ते चौदा मैल झाले. आमची जेवायची कुपने लफोर्ड कॉफीच्या दुकानाची होती. जेव्हा आम्ही तिथे पोचलो, तेव्हा तेथील वाढणाऱ्या बटुमूर्ती बाईने आमची तिकिटे पाहिल्यावर व आम्ही भटके असल्याचे तिला समजल्यावर, तिचे डोके तुच्छतेने हलवले. खूप वेळ ती आमची काही दखलच घेईना. शेवटी तिने टेबलावर दोन मोठ्या चहाची व चार पावांची तयारी केली व थेंब सांडत सांडत ते आठ पेन्सचे जेवण आम्हाला दिले. असे दिसत होते, की ते दुकान सवयीने भटक्यांना दोन पेनीना

फसवत असे. पैशांऐवजी कुपने असल्याने, भटक्यांना इतर कुठे जाण्याचे स्वातंत्र्य नव्हते.

## XXVIII

पुढचे पंधरा दिवस पॅडी माझा मित्र राहिला आणि तो माझा पहिलाच भटक्या मित्र झाल्याने, मला त्याची चांगली ओळख झाली. ती मला तुम्हाला सांगायची आहे. मला वाटते तो खास प्रकारचा भटक्या होता आणि त्याच्यासारखे इंग्लंडमध्ये हजारो होते.

तो उंच, छान पण करडे होऊ लागलेल्या केसांचा, चष्मिस असून वयाने साधारण पस्तिशीचा होता. त्याचे डोळे निळे व पाणीदार होते. पण त्याचे गाल पाव आणि मार्गारीन खाऊन, सपाट, करडी, घाणेरडी झाक असलेले व खडबडीत झाले होते. ट्वीडचे जाकीट आणि त्यावरील रेशमी नक्षीसकट जुनी पँट घातलेल्या, त्याचे कपडे इतर भटक्यांपेक्षा बरे होते. ती रेशमी नक्षी एक मानाची गोष्ट म्हणून त्याच्या मनात रेंगाळत असावी. जेव्हा ती झिजून जाऊ लागे, तेव्हा तो ती काळजीपूर्वक परत शिवे. तो त्याच्या दिसण्याची पुरेपूर काळजी घेई. त्याच्याबरोबर त्याचा रेझर आणि बुटांचा ब्रश न विकता, तो बाळगे. तरीही त्याने त्याचा खिशातील चाकू व धार्मिक कागद फार पूर्वीच विकून टाकला होता. तथापि एखादा त्याला ठामपणे जड पाऊले भरभर टाकत चालणारा भटक्या, म्हणून ओळखत असे. वाऱ्यावर हेलकावे खात चालण्याच्या त्याच्या चालीमध्ये आणि खांदे पुढे झुकवण्याच्या पद्धतीत खास डौल व शरणागत भाव होता. त्याला चालतांना बघून असे वाटे, की तो कुणाला गुद्दा मारण्यापेक्षा स्वतःच खाईल.

तो आयर्लंडमध्ये वाढला होता. त्याने लढाईत दोन वर्षे भाग घेतला होता आणि नंतर एका धातूला चमक आणायच्या कारखान्यात काम केले होते. ते त्याचे काम दोन वर्षांपूर्वी त्याच्याकडून गेले होते. त्याला तो भटक्या असल्याची भयंकर लाज वाटत असे. पण त्याने भटक्याचे सगळे गुण आत्मसात केले होते. तो सतत फूटपाथ शोधत असे. कधीही एखादे सिगरेटचे थोटूक किंवा एखादे सिगरेटचे रिकामे पाकीटही त्याच्या हातून सुटत नसे. तो त्यातील चकचकीत कागद सिगरेटची गुंडाळी करण्यासाठी वापरत असे. एडबरीच्या वाटेत फूटपाथवर त्याने वर्तमानपत्राचे एक गाठोडे पाहिले. त्यावर त्याने झडप घातली. त्यात त्याला कडेने झिजलेली दोन मटन सँडविच दिसली. ती त्याने माझ्याबरोबर वाटून खायचा आग्रह धरला. तो कुठलेही स्वयंचलीत मशीन हलवल्याशिवाय पुढे जात नसे. त्याला असे वाटे, की ते मोडके असेल तर त्यातून नाणी बाहेर पडतील. त्याची वृत्ती गुन्हेगारी नव्हती. तरीही आम्ही जेव्हा रोमटॉनच्या बाहेर होतो, तेव्हा पॅडीला पायऱ्यांवर तिथे चुकून राहिलेली एक दुधाची बाटली दिसली. त्याने थांबून हावरट डोळयांनी ती पाहिली.

तो म्हणाला, "देवा रे, चांगली वस्तू फुकट चालली आहे. कुणीतरी ती चोरणारच. ते सोपे आहे."

मी पाहिले, की तो ती चोरायचा विचार करत होता. त्याने रस्त्यावर वरखाली पाहिले. तो रहाणाऱ्या लोकांची वस्ती असलेला भाग होता आणि कोणीही नजरेस पडले नाही. त्याचा आजारलेला चेहरा दुधासाठी तळमळत होता. मग तो बाजूला झाला व मलूलपणे म्हणाला, "ती सोडून देणेच बरे. ती चोरणे काही बरे नाही. देवाचे आभार मानतो, की मी अजून काहीही चोरलेले नाही."

हे भीतीदायक/दुःखदायक होते. भुकेची जाणीवदेखील त्याला दुर्गुणाप्रत नेऊ शकली नाही. तो चांगल्या पद्धतीने वाढवला गेला असल्याने, दुधाची तहानही त्याला चोरी करू देईना. खरे तर हे वाईट होते. त्याला दूध चोरायचे धैर्य मिळायला हवे होते. फक्त दोनतीन चांगली जेवणे पोटात गेली असती, तर त्याला तेवढे धैर्य झाले असते. त्याच्याकडे बोलायचे दोन विषय होते. त्यातील एक होता लाज. आणि दुसरा होता, भटक्या असल्यामुळे फुकट जेवण मिळण्याचा उत्तम मार्ग. आम्ही रस्त्यात भटकत असतांना, तो सुस्कारे टाकत, स्वतःशी दया येईल असे बोलत असे.

आयरिश आवाजः "असे रस्त्यावर भटकणे वाईट आहे. वाईट असलेल्या बेघरांच्या लॉजमध्ये जाण्यामुळे तुमचे हृदय विदीर्ण होते. पण माणूस दुसरे काय करणार? मला दोन महिन्यात चांगले मासाचे जेवण मिळाले नाही. माझे बूट खराब होऊ लागले आहेत. अरे देवा, एडबरीच्या वाटेत आपल्याला एक कप चहासाठी जोगीणींच्या मठात तोंड वेंगाडायची पाळी येणार की काय? बहुतेक वेळा त्या दयाळूपणे तो देतात. माणसाला धर्म नसता, तर काय झाले असते?

मी मठात, इंग्लंडच्या चर्चमध्ये व ख्रिश्चन होण्याची दीक्षा दिली जाते अशा अनेक ठिकाणी आजपर्यंत चहासाठी याचना केली आहे. मी स्वतः कॅथॉलिक आहे. म्हणजेच मला म्हणायचे आहे, की मी गेल्या सतरा वर्षात माझ्या पापांची कबुली दिलेली नाही. पण तरी माझ्यात धार्मिक भावना आहेत, समजले का? आणि एक कप चहासाठी मठ चांगला असतो" --- इत्यादि इत्यादि. "हे माझ्याकडून सतत केले जाणार."

त्याचे अज्ञान अगाध व धक्कादायक होते. उदाहरणार्थ, त्याने एकदा मला विचारले, की नेपोलियन जिझस ख्रिस्ताआधी होऊन गेला की नंतर.

नंतर एकदा जेव्हा मी पुस्तकाच्या दुकानात डोकावत होतो, तेव्हा तो उद्दीपित झाला कारण तिथे  'ख्रिस्ताचे अनुकरण' नावाचे पुस्तक होते.

पवित्र गोष्टींबद्दल नको ते बोलल्याबद्दल, त्याने ते घेतले. तो रागाने म्हणाला, "ख्रिस्ताचे अनुकरण करायची बाब ते कशी काय बोलू शकतात? तो वाचू शके. पण पुस्तकांबद्दल त्याला नावड होती. रोमटॉनपासून एड्बरीच्या वाटेत, मी लोकांसाठी असलेल्या वाचनालयात गेलो आणि जरी पॅडीला वाचायचे नसले, तरी मी त्याला आत येण्याचे सुचवले. कारण त्याच्या पायांना विश्रांती मिळाली असती. पण त्याने फुटपाथवर थांबणे पसंत केले. तो म्हणाला, "नाही. ते छापलेले काही बघितले, की मला आजारल्यासारखे होते."

बहुतेक भटक्यांसारखे काडेपेटीच्या बाबतीत तो फार भावनाशीलपणे चिक्कू होता. मी त्याला भेटलो, तेव्हा त्याच्याकडे काडेपेटी होती पण मी त्याला कधीच त्यातील एखादी काडी ओढतांना पाहिली नाही. मी जेव्हा काडी ओढत असे, तेव्हा तो मला बचत करण्याबद्दल सुनावे. एखाद्या अनोळखी माणसाकडून, तो सिगरेट पेटवून घेई. कधीकधी त्यासाठी तो काडी ओढण्याऐवजी अर्धा अर्धा तास थांबे.

स्वतःची कणव ही त्याच्या स्वभावात होती. तो क्षणभरसुद्धा स्वतःच्या दुर्दैवाबद्दल विसरत नसे. तो कशाबद्दलही न बोलण्यासाठी त्याचे खूप लांबलचक मौन सोडत असे. तो बोले, "जेव्हा सदाहरित झाडाचे फूल पाण्याच्या जोरदार प्रवाहांबरोबर वाहून जाते, तेव्हा ते वाईट असते, नाही का?" किंवा "त्या बेघरांच्या लॉजमधील चहा हा चहा नसून लघवी होती." जसे काही जगात विचार करण्यासारखे दुसरे काही नव्हतेच. त्याच्यापेक्षा बऱ्या परिस्थितीत असलेल्या कुणाबद्दलही, त्याच्यासारख्या कामगार

लोकांबद्दल त्याला क्षुद्र किड्यासारखी असूया वाटे. श्रीमंतांबद्दल नव्हे, कारण ते त्याच्या सामाजिक क्षितीजाच्या बाहेर होते. जसे कलाकाराला प्रसिद्ध व्हावेसे वाटते, तसे तो कामासाठी तरसे. जर त्याने कुणा म्हाताऱ्याला काम करतांना पाहिले, तर तो कटूपणे म्हणे, “त्या म्हाताऱ्याकडे बघा --- चांगल्या सक्षम माणसाला कामापासून वंचित ठेवले आहे आणि जर तो मुलगा असेल, तर तो म्हणे, “याला काम देऊन आपल्या तोंडचा घास काढून घेतला जातो आहे.” त्याच्यासाठी सगळे परदेशी [स्पॅनिश, इटालीयन्स व पोर्तुगीज] आक्रमक गिधाडे होती. कारण त्यांच्यामुळे आपली बेकारी वाढते, असे त्याला वाटे.

स्त्रियांकडे तो द्वेषाने व तरसल्यासारखे बघे. तरुण, सुंदर स्त्रिया त्याच्या कल्पनेच्या पातळीच्या फारच वर होत्या. पण वेश्यांना बघून त्याच्या तोंडाला पाणी सुटे. शेंदरी लिपस्टिक लावलेल्या वयस्क वेश्या त्याच्या डोळ्यासमोरून तरळून जात. मग त्याचा चेहरा गुलाबी होई आणि तो हावरटपणे त्यांच्याकडे बघत राही. लहान मुले गोड वस्तू मिळणाऱ्या दुकानाच्या खिडकीसमोर उभे राहून करतील, तसे तो पुटपुटे, “मिठाई!” तो एकदा मला म्हणाला त्याची नोकरी गेल्यापासून, गेल्या दोन वर्षात त्याने बाईशी संग केला नाही. वेश्यांपेक्षा जास्त काही मजल आपण मारू शकतो, हे तो विसरूनच गेला. तो आता पक्का भटक्या झाला.

काहीतरी अगदी वाईट, हेवा वाटेल असे, लांडग्यासारखे!

तथापि, तो एक चांगला मनुष्य होता. स्वभावाने उदार होता आणि त्याचा शेवटचा घास माझ्याबरोबर त्याने एकापेक्षा जास्त वेळा वाटून घेतलेला होता. त्याला काही महिने व्यवस्थित खायला मिळाले असते, तर तो कामदेखील करू शकला असता. पण दोन वर्ष पाव आणि मार्गारीन खाऊन,

निराशादायकपणे त्याचे जीवनमान खालावले होते. तो अशा बेकार नकली खाण्यावर जगत होता. त्यामुळे शारीरिक व मानसिक दृष्ट्या तो कमी प्रतीचा झाला होता. त्याची तब्येत कुठल्या जन्मजात दुर्गुणांमुळे नव्हे, तर अशा कुपोषणामुळे बिघडली होती.

## XXIX

एडबरीच्या वाटेवर, मी पॅडीला सांगितले, की मला माझ्या एका मित्राकडून पैसे मिळायची शाश्वती वाटते आणि अजून एक रात्र बेघरांच्या लॉजमध्ये काढण्यापेक्षा सरळ लंडनला गेलेले बरे राहील. पण पॅडी अलीकडे एडबरीच्या बेघरांच्या लॉजमध्ये राहिला नव्हता आणि भटक्यासारखे, त्याने एक रात्र फुकट रहाणे चुकवले नसते. मग आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी लंडनला जायचे ठरवले.

माझ्याकडे फक्त अर्धी पेनी शिल्लक होती. पण पॅडीकडे दोन शिलिंग होते. त्यामध्ये आम्हाला दोघांना रात्रीची वस्ती व काही कप चहा मिळाला असता. रोमटॉनमधील बेघरांच्या लॉजपेक्षा एडबरीचे बेघरांचे लॉज काही वेगळे नव्हते. सर्वात वाईट म्हणजे दारावरच सर्व तंबाखू काढून घेतली गेली आणि आम्हाला ताकीद देण्यात आली, की कुणी सिगरेट ओढतांना दिसले, तर त्याला लगेच बाहेर घालवून देण्यात येईल. बेघरपणाच्या कायद्यानुसार, भटक्यांना त्याबद्दल कोर्टात खेचले जाऊ शकत होते. खरे तर त्यांना कुठल्याही कारणावरून कोर्टात खेचणे सोपे होते. पण सहसा तेथील अधिकारी भटक्यांचा उद्धटपणा व मुजोरी पाहून, त्याना बाहेर हाकलत असत. तिथे काही काम नव्हते आणि खोल्या बऱ्यापैकी आरामशीर होत्या. आम्ही एका खोलीत दोघे होतो. एक वर एक खाली. म्हणजे एक लाकडी पलंगावर

आणि एक खाली जमिनीवर चटई घालून त्यावर झोपायचे होते आणि खूपसे घाणेरडे पण डास वगैरे नसलेले रग दिले होते. जेवण रोमटॉनमधल्यासारखेच होते. फक्त कोकोऐवजी चहा होता. तेथील अधिकारी एक मग चहाला अर्धी पेनी या भावाने तिथे चहा विकत असल्याने, तो पुन्हादेखील घेता येई. हे निःसंशय, नियम तोडल्यासारखे होते. आम्हाला प्रत्येकाला मोठा पाव आणि चीज मधल्यावेळच्या जेवणासाठी फुकट देण्यात येत असे.

जेव्हा आम्ही लंडनमध्ये आलो, आम्हाला लॉज उघडण्यापूर्वी ताटकळत, आठ तास वेळ घालवायचा होता. काही गोष्टी एखाद्याच्या लक्षात येत नसतील, तर नवल आहे. मी लंडनला खूप वेळा आलो होतो. परंतु तरीही त्या दिवसापर्यंत --- खरे तर तिथे बसायलासुद्धा पैसे पडतात, ही लंडनविषयीची सर्वात वाईट गोष्ट मला माहिती नव्हती. पॅरीसमध्ये तुमच्याकडे पैसे नसतील आणि तुम्हाला सार्वजनिक बाक सापडला नाही, तर तुम्ही फुटपाथवर बसू शकत होतात. पण असे केल्यास लंडनला काय होत होते, कुणास ठाऊक! बहुधा तुरुंगात टाकत असत. चार वाजेपर्यंत आम्ही पाच तास उभे होतो. दगड टोचून आमचे पाय लाल व गरम झाले होते. आम्हाला भूक लागली होती. कारण पहिले लॉज सोडल्याबरोबर आम्ही जेवलो होतो आणि माझ्याकडे तंबाखूही नव्हती --- पॅडीला त्याचे एवढे काही नव्हते. तो सिगरेटची थोटके उचलत होता. आम्ही दोन चर्च शोधली. पण ती बंद होती. शेवटची आशा म्हणून, पॅडीने सुचवले, की आपण रोटॉन घरी [उमराव रोटॉनने कामकरी लोकांसाठी बांधलेले भले मोठे लॉज] जाऊ. पण कायद्याप्रमाणे, ते सातशिवाय प्रवेश देत नव्हते. पण आम्ही त्यांचा डोळा चुकवून आत शिरू शकत होतो. आम्ही त्यांच्या प्रचंड दारापर्यंत चालत आलो. [रोटॉन घरे खरोखर खूप मोठी होती.] आणि तिथे नेहमी रहाणाऱ्यांसारखे आहोत असे भासवत आत शिरायला बघू लागलो. तिथे

फिरणाऱ्या एका कडक चेहऱ्याच्या, बहुधा अधिकारी दिसणाऱ्या माणसाने लगेच आम्हाला अडवले.

"तुम्ही इथे काल रात्री झोपला होतात का?"

"नाही."

"मग --- बाहेर."

आम्ही त्याचे ऐकून, अजून दोन तास बाहेर रस्त्याच्या कोपऱ्यावर उभे राहिलो. ते कष्टदायक होते. पण मी त्यातून धडा शिकलो, की 'रस्त्याच्या कोपऱ्यावरचे भटके' असे स्वतःला म्हणवून घ्यायचे नाही. सहा वाजता आम्ही प्रोटेस्टंट चर्चने धर्मार्थ चालवलेल्या बेघरांच्या [Salvation Army shelter] लॉजमध्ये गेलो. आठपर्यंत आम्हाला पलंग राखून ठेवता आले नाहीत आणि ते रिकामे असल्याची खात्री नव्हती. पण तेथील कार्यालयातील एका माणसाने आम्हाला भाऊ अशी हाक मारून, आम्ही दोन कप चहाचे पैसे भरू या अटीवर आम्हाला आत घेतले. तेथील मुख्य मोठाच्या मोठा हॉल अती स्वच्छ आणि पांढरा रंग दिलेला होता. लांब लाकडी बाकांवर जिंकून शरण आल्यासारखे दिसणारे दोनशे चांगले लोक दाटीवाटीने बसले होते. गणवेष घातलेले एक दोन अधिकारी वरखाली फिरत होते. भिंतीवर ख्रिश्चन धर्मातील चित्रे काढली होती व स्वयंपाकाला, पिण्याला, थुकायला, शपथा घ्यायला, जुगार खेळायला व भांडायला मनाई असल्याच्या सूचना लावलेल्या होत्या. या सूचनांचा नमुना म्हणून, ही एक मी शब्दशः नकलून काढली.

'कुणीही माणूस जुगार खेळतांना वा पत्ते खेळतांना दिसला, तर त्याला बाहेर हाकलून देण्यात येईल आणि कुठल्याही परिस्थितीत त्याला आत घेतले जाणार नाही. अशा लोकांची माहिती देणाऱ्याला बक्षीस दिले जाईल.'

इथे रहाणाऱ्या सर्वांना अधिकारी लोकांनी विनंती केली, की हे लॉज या जुगाराच्या अरुचीपूर्ण पापापासून दूर ठेवायला त्यांना मदत करा.

'जुगार किंवा पत्ते' ही आनंददायक गोष्ट आहे. माझ्या मते हे लॉज, इतर लॉजपेक्षा स्वच्छ असले तरी, उदास व तोचतोचपणा असणारे आहे. तिथे रहाणारे चांगले, कॉलर्स नष्ट झालेले पण तरीही कार्यालयात नोकऱ्या शोधणारे, पार मोडून गेलेले लोक आहेत. जिथे निदान स्वच्छ आहे, अशा ठिकाणी आल्यावर, मान मिळण्याची तरी काही चिन्हे आहेत का? माझ्या पुढील टेबलावर दोन चिंध्या पांघरलेले, वरवर तरी सभ्य वाटणारे, परदेशी बसले होते. ते तोंडी बुद्धिबळ खेळत होते. ते त्यांच्या खेळी लिहीतही नव्हते. त्यांच्यापैकी एकजण आंधळा होता. मी असे ऐकले, की ते अडीच शिलिंग किंमत असलेला बुद्धीबळाचा पट खरेदी करण्यासाठी खूप दिवस बचत करत होते. पण त्यांना ते कधीच जमले नाही. इथे तिथे निवृत्त झालेले अशक्त व मनस्वी कारकून दिसत होते. त्यांच्या गटातील, एक उंच, बारीक व अगदी पाप्याचे पितर असलेला तरूण मनुष्य खूप तावातावाने बोलत होता. तो त्याची मूठ टेबलावर आपटत होता व विचित्रपणे अंगात ताप असल्यासारख्या आविर्भावात बढाया मारत होता. जेव्हा अधिकारी मंडळी ऐकायच्या कक्षेबाहेर गेली, तेव्हा तो ख्रिस्ताविरुद्ध ठणाणा करू लागलाः

"मुलांनो, मी तुम्हाला सांगतो, मला उद्या काम मिळणार आहे. मी तुमच्यासारखा झुकणारा मूर्ख नाही आहे. मी माझ्याकडे लक्ष देऊ शकतो. ती तेथील सूचना बघा! म्हणे देव देईल! त्या दुष्टाने मला कधी काय दिले? तुम्ही मला देवावर विश्वास ठेवतांना पकडणार नाही. ते तुम्ही माझ्यावर सोडा. मुलांनो, मला ते काम मिळणारच आहे." इत्यादी इत्यादी.

तो रागाने, रानटीपणे कसा बेफाम होऊन बोलत होता, ते मी बघितले. तो कदाचित थोडा प्यायलेला असावा. तासाभराने मी हॉलपासून अलग असलेल्या एका लहान वाचायच्च्या खोलीत गेलो. त्यात पुस्तके वा पेपर्स नव्हते. त्यामुळे, तिथे रहाणारे काहीजण तिथे गेले. मी दार उघडले, तेव्हा तिथे मला एक तरुण कारकून एकटाच गुडघ्यांवर प्रार्थना म्हणत, बसलेला दिसला. लगेचच मला त्याच्या चेहऱ्यावरून जाणवले, की तो उपाशी आहे.

झोपायची किंमत आठ पेन्स होती. पॅडी आणि माझ्याकडे पाच पाच पेन्स उरले होते. ते आम्ही अन्न स्वस्त असणाऱ्या बारमध्ये खर्च केले. पण ते बेघरांच्या घरांइतके काही स्वस्त नव्हते. चहा, एकदा चहा करताना वापरलेल्या भुकटीचा होता. मला वाटते ती भुकटी 'सैन्य मुक्ती निवारा' ला देत असावेत. ते देखील त्याचा चहा बनवून एका कपाला साडेतीन पेनीप्रमाणे विकत असत. तो फारच भिकार लागे.

दहाच्या सुमारास अधिकाऱ्याने चक्कर मारत, शिट्टी वाजवली. ताबडतोब प्रत्येकजण उभा राहिला.

मी नवल वाटून पॅडीला विचारले, "ही कशाकरता?"

"याचा अर्थ तुम्ही अंथरूण सोडले पाहिजे आणि त्यात हयगय होता कामा नये."

ते ऐकून, दोनशे माणसे अंथरूणातून बाहेर पडली.

त्या गर्दीमुळे, ती साठ सत्तर पलंग असलेली जागा तुरुंगासारखी दिसू लागली. ती स्वच्छ व बऱ्यापैकी सहनीय पण फारच अरुंद असल्यामुळे एकाचा श्वास दुसऱ्याच्या चेहऱ्यावर जाई. दिवे मालवल्यावर तिथे कुणी बोलत नाही ना आणि धूम्रपान करत नाही ना, हे बघण्यासाठी तिथे एका खोलीत दोन अधिकारी झोपले होते. पॅडीला आणि मला घटकाभर तरी झोप

लागली की नाही, कुणास ठाऊक! कारण आमच्याजवळ एक उदासीनतेचा त्रास असलेला, बहुधा लढाईतील बाँबहल्ल्याने मानसिक रुग्ण झालेला, मनुष्य होता. तो दर काही वेळाने, ‘पीप’ असे ओरडून रडत असे. तो मोठा त्रासदायक आवाज होता. मोटारीच्या पोंग्यासारखा होता. तो कधी कानावर पडेल, याचा काही नेम नव्हता आणि त्यामुळे झोप लागणे शक्य नव्हते. त्याला इतर लोक ‘पीप’ म्हणत. तो रात्रभर चांगला झोपे पण प्रत्येक रात्री इतर दहा वीस लोकांची झोप उडवत असे. त्यामुळे अशा गर्दीच्या ठिकाणी त्या लोकांची पुरेशी झोप होत नसे.

सात वाजता दुसरी शिट्टी वाजली. जे झोपेतून उठले नाहीत, त्यांना उठवत अधिकारी मंडळी फिरू लागली. त्यानंतर मी अनेक ठिकाणी झोपलो, आणि त्यात अगदी थोडा फरक असला, तरी त्या सर्वांमध्ये सैनिकी अर्धशिस्त सारखीच असलेली आढळली. त्या जागा नक्कीच स्वस्त आहेत परंतु मला तरी कामाच्या ठिकाणासारखी वाटल्या. त्यातील काहींमध्ये आठवड्यातून एक दोन वेळा धार्मिक सेवाही अनिवार्य असते. ती तिथे रहाणाऱ्यांना करावीच लागते. नाहीतर त्यांना बाहेर हाकलले जाते. म्हणजे ‘सैन्य मुक्ती निवारा’ अशी चालवली जातात की त्या धर्मार्थ संस्था आहेत आणि रहायची लॉजसुद्धा धर्मार्थ असल्यासारखेच चालवले जाते.

दहा वाजता मी बी च्या कार्यालयात गेलो आणि त्याच्याकडे एक पौंड उसना मागितला. त्याने मला दोन पौंड दिले आणि जरूर असेल, तेव्हा परत यायला सांगितले. त्यामुळे पॅडी आणि मी निदान आठवडाभरासाठी पैशाच्या त्रासातून मुक्त झालो. आम्ही त्या दिवशी ट्रॅफलगार्ड चौकात पॅडीच्या एका मित्राला शोधत फिरलो. तो कधीच भेटला नाही. रात्री आम्ही स्ट्रँडजवळील एका लॉजमध्ये गेलो. पण ती एक अंधारी व घाण वास येणारी जागा होती.

तिथे रात्रीसाठीचा दर अकरा पेन्स होता. तिथे गे मुलांचे टोळके होते. ते पॅरीसमध्ये दिसणाऱ्या अपाची [नैऋत्य अमेरिकेतील अमेरिकन भारतीय जुन्या वंशाचे लोक] लोकांसारखे होते. फक्त त्यांचे कल्ले वेगळे होते.

खालील मजल्यावरील कोंदट व अंधारी स्वयंपाकघरात, तीन विचित्र दिसणारे चटपटीत तरुण एका बाकावर लांब लांब बसले होते. त्यांच्याकडे तिथे रहाणारे इतर लोक लक्ष देत नव्हते. मला वाटते ती गे मुले होती. आगीसमोर एक पूर्ण नागडा मनुष्य व एक पूर्ण कपडे घातलेला मनुष्य भाव करत बसले होते. ते वर्तमानपत्र विकणारे होते. कपडे घातलेला मनुष्य नागड्या माणसाला कपडे विकत होता. तो म्हणाला, "अरे, तुला हे कपडे एकदम छान बसतील. कोटाला अर्धा क्राउन, पँटदेखील अगदी  नीट बसेल. बुटांना दोन, पँटला दोन आणि मफलर व टोपीला तीन. एकूण सात शिलींग पडतील.

कपडे घातलेला मनुष्य नागडा झाला आणि तीन मिनिटात, त्यांच्या जागा बदलल्या. नागड्या मनुष्याने कपडे घातले आणि दुसऱ्याने हातात 'डेली मेल'चे पान धरून, गुडघ्यापर्यंत लांबीचा स्कर्ट घातला त्या अंधाऱ्या व बंदिस्त हॉलमध्ये पंधरा पलंग होते.

तिथे मूत्राचा इतका उग्र दर्प पसरला होता, की एखादा पूर्णपणे फुफ्फुसे न भरता वरच्यावर श्वास घेण्याचा प्रयत्न करू लागे. मी पलंगावर पडल्यावर अंधारातून एक माणूस आला आणि शिक्षित माणसासारखा,अर्धवट प्यायल्यासारख्या आवाजात मूर्खासारखे, काही न समजणारे बोलू लागला, """अरे पब्लिक शाळेतील म्हाताऱ्या मुला, कसे काय? [ त्याने मला व पॅडीला बोलतांना ऐकले होते.] जुन्या शाळेतील कुणी इथे भेटत नाहीत. मी जुना इटोनियन आहे. तुला माहिती आहे का --- वीस वर्षांपूर्वीची हवा आणि इतर

गोष्टी. तो थरथरत्या आवाजात इटॉन बोटीचे गाणे वेड्यावाकड्या चालीवर म्हणू लागलाः

आनंददायक बोटीच्या सफरीची हवा

आणि दाट गवत ---

तिथे रहाणारे खूप लोक ओरडले, “तो मूर्खपणा --- तो गोंगाट थांबव.”

तो म्हातारा इटोनियन बोलला, “हे अगदी सुमार दर्जाचे लोक आहेत. सुमार दर्जाचे. तुझ्यामाझ्यासाठी ही मोठी गमतीची जागा आहे, नाही का? तुला माहिती आहे का, की माझे मित्र मला काय म्हणतात? ते म्हणतात, ‘तू चुका घालवणारा आहेस’”

“ते खरे आहे. मी पूर्वीच्या चुका घालवणारा आहे. मी जगात आलो आहे --- त्यांच्यासारखा नव्हे. इथे यायचा प्रयत्न केला, तरी ज्याना येता येत नाही, असे लोक आपण नाही. आपण, जे लोक इथे आलो आहोत, त्यांनी एकमेकांना थोडी मदत केली पाहिजे. तुला माहिती आहे --- आपण अजून तरुण दिसतो. मी तुला पेय देऊ शकतो का?

त्याने चेरीची ब्रँडी काढली आणि त्याच वेळेस त्याचा तोल जाऊन तो माझ्या पायांवर पडला.

कपडे काढणाऱ्या पॅडीने त्याला सरळ उभे केले. “चल, तुझ्या पलंगावर जा, मूर्ख कुठला!”

तो धडपडत त्याच्या पलंगाशी चालत गेला आणि कपड्यांसकट व बुटांसकट पांघरुणात शिरला. रात्री मी त्याला अनेक वेळा गुणगुणतांना ऐकले, “तू पूर्वीच्या चुका घालवणारा आहेस.”

जसे काही त्याला ते उद्गार फार आवडले होते.

सकाळी तो पूर्ण कपड्यांनिशी हातात बाटली धरून, झोपलेला होता. तो साधारण पन्नाशीचा, चेहरा खराब झालेला पण छान कपडे केलेला माणूस होता. घाणेरड्या पलंगामधून डोकावणारे, त्याचे चकाकणारे चामड्याचे बूट बघणे विचित्र होते. चेरीची ब्रँडी निदान पंधरा दिवसांचा रहाण्याच्या खर्चाइतक्या किमतीची असणार. त्यामुळे त्याला पैशांची फार तंगी नसणार. कदाचित तो गे मुलांच्या शोधात असल्या लॉजमध्ये रहात असेल.

पलंग दोन फुटांपेक्षा जास्त अंतरावर नव्हते. मध्यरात्री मी पाहिले, की माझ्या शेजारचा माणूस माझ्या उशीखालील पैसे काढून घेण्याचा प्रयत्न करत होता. ते करतांना तो झोपलेला असल्याचे ढोंग करत होता. एखाद्या उंदरासारखा हळूवारपणे, तो उशीखाली हात घालत होता. सकाळी मी पाहिले, की त्याच्या पाठीला कुबड होते आणि हात एप माकडासारखे लांब होते. मी पॅडीला त्याच्या चोरीच्या प्रयत्नाबद्दल सांगितले, तेव्हा तो हसून बोलला, “देवा रे, तुला याची सवय करून घ्यायला पाहिजे. असली लॉजेस चोरांनी भरलेली असतात. काही ठिकाणी तर अजिबात सुरक्षित नसते. तिथे तुम्हाला डोळे उघडे ठेऊन झोपावे लागते. मी एका लंगड्याचा लाकडी पायदेखील चोरताना बघितलेला आहे. एकदा मी एका चौदा स्टोन [१९६ पौंड] माणसाला चार पौंड व दहा शिलींग घेऊन, एका लॉजमध्ये आलेले पाहिले. ते त्याने त्याच्या गादीखाली ठेवले. तो म्हणाला, “आता कोणी त्याला हात लावला, तर त्याला माझ्याशी लढावे लागेल. पण तरी त्यांनी ते चोरले. सकाळी उठून तो जमिनीवर उभा राहिला चौघांनी त्याची गादी चार कोपऱ्यात धरली आणि त्याला पिसासारखे उडवले. त्याला त्याचे पैसे परत कधीच दिसले नाहीत.”

XXX

दुसऱ्या दिवशी सकाळी, आम्ही परत बोझो नावाच्या पॅडीच्या मित्राला शोधू लागलो. तो फूटपाथ कलाकार होता. पॅडीच्या जगात कुणाचे पत्ते अस्तित्वातच नव्हते. पण त्याला पुसटशी कल्पना होती, की बोझो लँबेथमध्ये सापडेल. शेवटी नदीकिनारी असलेल्या भिंतीशी आम्ही त्याच्यामागे धावलो. वॉटरलू पुलापाशी आम्ही त्याला गाठले. तो हातात खडूची पेटी घेऊन फूटपाथवर वाकला होता व त्याच्या हातातील वहीत असलेल्या विन्स्टन चर्चिल यांच्या चित्रावरून, चित्र काढत होता. साधारण साम्य वाटत होते. बोझो लहानसा, काळा, मोठ्या नाकाचा व डोक्यावरून लोंबणाऱ्या कुरळया केसांचा माणूस होता. त्याच्या उजव्या पायात खूपच दोष होता. तो लंगडत चाले, ते बघायला भयंकर वाटे. त्याच्याकडे बघून तो ज्यू आहे, असे वाटे. पण तो ते ठामपणे नाकारे. तो त्याचे मोठे नाक रोमनांसारखे असल्याचे म्हणे. मला वाटते, त्याला व्हेस्पासियन [रोमन सम्राट] सारखे असल्याचे म्हणायचे असावे. बोझो विचित्र पद्धतीने बोले. लंडनच्या निम्न स्तरातील लोकांच्या बोलीत तो बोले. जसे काही त्याने चांगली पुस्तके वाचली असावीत, असे ते स्पष्ट व भावना व्यक्त करणारे असे. पण त्याने स्वतःचे व्याकरण सुधारण्याचे कष्ट कधी घेतले नसावेत. मी व पॅडी थोडा वेळ तिथे त्याच्याशी बोलत उभे राहिलो. बोझोने आम्हाला त्याच्या फूटपाथवरील चित्रकलेच्या व्यापाराबद्दल सांगत राहिला. मी त्याच्याच शब्दात, ते तुम्हाला सांगतोः

मी गंभीर फूटपाथ कलाकार आहे, असे ते म्हणतात. मी दुसऱ्यांसारखे फळयावरील खडूने चित्र रंगवत नाही. मी खरेखुरे, चित्रकार वापरतात, तसे रंग

वापरतो. ते लाल रंग तर फार महाग असतात. मी पाच बॉब [पाच शिलिंग] एका लांबलचक दिवशी वापरतो आणि दोन बॉबपेक्षा कमी किमतीचे कधीच वापरत नाही. तुम्हाला माहिती आहे --- मी व्यंगचित्रकार आहे. राजकारण, क्रिकेट आणि अजून काही. इकडे बघा." त्याने त्याची वही दाखवली. इथे राजकीय माणसांचे व्यंगचित्र काढलेले आहे. ते मी वर्तमानपत्रावरून घेतले आहे. मी रोज वेगवेगळी व्यंगचित्रे काढतो. उदाहरणार्थ, जेव्हा बजेट चालू होते, तेव्हा मी असे चित्र काढले, की विन्स्टन चर्चिल कर्ज नावाच्या हत्तीला ढकलतो आहे. त्याखाली मी लिहिले, "तो हे करू शकेल का?"

"असे बघ, आपण कुठल्याही पक्षाचे व्यंगचित्र काढू शकतो. पण तुम्ही समाजवादाच्या बाजूने काही काढले नाही पाहिजे. कारण पोलीस ते सहन करू शकणार नाहीत. एकदा मी भांडवलशाहीला वेढा घालणाऱ्या सापाचे व्यंगचित्र काढले. तो कामगार नावाच्या सशाला गिळत असल्याचे दाखवले. पोलीस आला व त्याने ते बघितले. तो म्हणाला, "हे पुसून टाक आणि परत असले काही काढू नकोस." मला ते पुसावे लागले. आपण कुठे रेंगाळू लागलो, तर आपल्याला चालायला सांगायचा अधिकार त्यांना आहे आणि  त्याना उलटे उत्तर दिल्याचे परिणाम चांगले होत नाहीत.

[फूटपाथ कलाकार त्यांचे रंग पावडरीच्या स्वरूपात विकत घेतात आणि ती भुकटी दुधात कालवून त्याचे घट्ट रंग तयार करतात.]

मी बोझोला विचारले, हे करून तुला काय प्राप्ती होते. तर तो म्हणाला, "वर्षातील यावेळी जेव्हा पाऊस नसतो, तेव्हा शुक्रवार आणि रविवार यामध्ये मला साधारण तीन पौंड मिळतात. लोकांना शुक्रवारी पगार मिळतो. पावसात मी काम करू शकत नाही. कारण रंग सरळ धुतले जातात. वर्षभरात,

आठवड्याला साधारण एक पौंड मिळतो. थंडीत पण फारसे काम करता येत नाही.

बोटींच्या शर्यतीच्या दिवशी व खेळांची अंतिम स्पर्धा असेल,

तेव्हा मला एकदा जास्तीत जास्त चार पौंड मिळाले होते. पण तुम्हाला ते त्यांच्याकडून मिळवावे लागतात. जर तुम्ही नुसतेच बसलात, तर तुम्हाला एक शिलिंगही मिळणार नाही. नेहमी मला अर्धी पेनी मिळते. सर्वात चांगले म्हणजे तुमची चित्रे बदलत रहाणे. कारण जेव्हा ते तुम्हाला चित्र काढतांना बघतात, तेव्हा ते थांबून तुमच्याकडे बघत रहातात. आपण पैशांसाठी टोपी फिरवू लागलो, की भिकारी पळून जातात. तुम्हाला खरे तर एका मदतनीसाची गरज असते. तुम्ही चित्र काढत असता. गर्दी जमत असते. त्यांच्यातीलच कोणीतरी तिथे मागे असतो. त्याना तो माझा मदतनीस असल्याचे माहिती नसते. मग अचानक तो त्याची टोपी काढतो आणि त्यांच्यावर एकदम जणू हल्ला होतो. तुम्हाला कधीच खरी किंमत मिळत नाही. तुमच्या भोवतालची गर्दी म्हणजे ओंगळ लोक आणि परदेशी लोक असतात. मला काही जपानी व काही निग्रो लोकही गर्दीत दिसतात. ते इंग्लिश लोकांइतके कृपण नाहीत. टोपीमधील एखादी पेनी सोडली, तर लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे पैसे नेहमी झाकून ठेवायचे. जर तुमच्याकडे आधीच एक दोन शिलिंग असलेले लोकांना दिसले, तर ते तुम्हाला काहीही देत नाहीत.”

नदीकाठावरील इतर फूटपाथ कलाकारांच्याबद्दल बोझोला खूप राग होता. तो त्यांना ‘साल्मनची मोठी ताटली’ म्हणे.

त्या काळी तिथे नदीकिनारी प्रत्येक पंचवीस यार्डावर, एक तरी फूटपाथ कलाकार असे. बोझो दुःखाने पन्नास यार्ड लांब असलेल्या व पांढरी दाढी असलेल्या एका, म्हाताऱ्याकडे निर्देश करत म्हणाला, “तुम्ही तो मूर्ख

म्हातारा पाहिला का? गेली दहा वर्षे तो एकच चित्र रोज काढतो. तो त्याला नाव देतो 'विश्वासू साथीदार' ते चित्र पाण्याबाहेर एका मुलाला खेचून काढणाऱ्या कुत्र्याचे आहे. तो मूर्ख दहा वर्षाच्या मुलापेक्षा वेगळे काही चित्र काढू शकत नाही. जसे, 'कोड्यातील तुकडे जोडून सलग चित्र तयार करता, तसेच तो केवळ सवयीने तेवढेच चित्र काढायला शिकला आहे.

असले इथे खूप काही आहे.

कधीकधी माझ्या कल्पनेला चिमटे बसतात. पण मी काही काळजी करत नाही. त्या मूर्खांना त्यांचा त्याना काही विचार करता येत नाही. त्यामुळे मी नेहमी त्यांच्यापुढे असतो. व्यंगचित्रे नेहमी काळाबरोबर असतात. एकदा एका मुलाचे डोके चेल्सी पुलाच्या कठड्याच्या जाळीत अडकले. मी त्याबद्दल ऐकले. आणि त्यांनी मुलाचे डोके जाळीबाहेर काढण्यापूर्वी माझे व्यंगचित्र तिथे लटकत होते. मी झटपट काम करतो."

बोझो एक रुचीपूर्ण मनुष्य होता. मला त्याच्याबद्दल अधिक जाणून घ्यावेसे वाटू लागले. त्या संध्याकाळी मी त्याला भेटायला नदीकिनारी गेलो. नदीच्या दक्षिणेला असलेल्या एका बेघरांच्या लॉजमध्ये तो मला व पॅडीला घेऊन जाणार होता. बोझोने त्याची चित्रे फूटपाथवरून पुसली व त्याचे पैसे मोजले. ते साधारण सोळा शिलिंग होते. त्यापैकी बारा तेरा त्याचा फायदा होता. आम्ही लँबेथकडे चालत निघालो. बोझो सावकाश लंगडत, विचित्रपणे एखाद्या खेकड्यासारखा, एका कडेला त्याचा लंगडा पाय त्याच्यामागे ओढत, चालत होता. त्याच्या प्रत्येक हातात एक काठी होती आणि रंगपेटी खांद्यावरच्या झोळीत लटकवली होती.

आम्ही पूल ओलांडत असतांना तो एका भिंतीच्या खबदाडात विसावा घेण्यासाठी थांबला. तो दोन मिनिटे स्तब्ध झाला. आणि आश्चर्य

म्हणजे तो ताऱ्यांकडे बघत होता. त्याने माझ्या हाताला स्पर्श केला आणि काठीने आकाशाकडे दाखवले. तू त्या तारापुंजाकडे बघ. ते मोठ्या शेंदरी रक्तासारखे दिसते आहे." त्याच्या बोलण्यावरून, तो चित्रांच्या गॅलरीतील कलाटीकाकार असावा, असे वाटत होते.

मला नवल वाटले. मी कबूल केले की तो कुठला तारापुंज आहे, हे मला माहिती नव्हते. खरेच माझ्या कधी हे लक्षातही आले नव्हते, की तारे वेगवेगळ्या प्रकारचे, रंगाचे असतात. बोझोने मला काही प्रमुख नक्षत्रे दाखवत, खगोलशास्त्रावर काही प्राथमिक माहिती द्यायला सुरवात केली. त्याला माझे अज्ञान बघून, मला शहाणे करावेसे वाटले असणार. मी त्याला आश्चर्याने म्हणालो, "तुला ताऱ्यांबद्दल बरीच माहिती दिसते."

"फारशी नाही. तरी थोडीफार माहिती आहे. मी अशनींबद्दल लिहिल्याने आभार मानणारी खगोल शास्त्रज्ञ रॉयलची मला दोन पत्रे आली होती. आता अनेक वेळा रात्री मी बाहेर जाऊन, उल्कापात दिसतो का, ते बघतो. तारे बघायचा सिनेमा फुकट असतो. आपले डोळे वापरण्याशिवाय त्याला काही खर्च येत नाही."

"किती छान कल्पना आहे. मला कधी ती सुचली नव्हती."

"चला, तुला कशात तरी रुची वाटू लागली. जरी मनुष्य बेघर असला, तरी त्याला चहा आणि पावाच्या दोन तुकड्यांव्यतिरिक्त काही सुचू नये असे नाही."

"पण एखाद्या गोष्टीत रस घेणे फार कठीण नसावे ---

अशा आयुष्यातही --- ताऱ्यांसारख्या गोष्टी, नाही का?"

"म्हणजे फूटपाथ चित्रकार असे तुला म्हणायचे आहे का? असे काही नसते. त्यासाठी तुम्ही भिकार सशात रुपांतरीत व्हायला पाहिजे असे नाही.

म्हणजे तुम्ही एकदा ठरवलेत की काहीही करू शकता. अनेक लोकांवर याचा परिणाम होत असावा.”

“अर्थात. पॅडीकडे बघ --- सारखा चहा पिणारा आणि कुणाला काही न देणारा, दुसऱ्याकडून सतत घ्यायला तयार असणारा व त्यामुळे अर्थात गरीब शेवट होणारा! बहुतेक सगळे असेच असतात. मी त्यांना ओळखून असतो. पण तू तसे असलेच पाहिजेस, असे नाही. जर तुझे काही शिक्षण झाले असते, तर तू आयुष्यभर बेघर असलास, तरी काही बिघडत नाही.”

मी म्हणालो, मला उलटे सापडले आहे. मला वाटते, की जेव्हा तुम्ही एखाद्याकडून पैसे घेता, त्या क्षणापासून तुम्ही काहीही करायला लायक नसता.”

“नाही, असेच काही नाही. जर तुम्ही असे करायचा प्रयत्न केला, तरी तुम्ही तसेच जीवन जगता --- गरीब किंवा श्रीमंत! तरीही तुम्ही तुमची पुस्तके आणि तुमच्या कल्पना तुमच्याकडे ठेऊ शकता. फक्त तुम्ही स्वतःशी म्हणावे लागते, “मी स्वतंत्र मनुष्य आहे आणि मी ठीक आहे.” इथे त्याने कपाळावर हात नेऊन दाखवला.

पुढेही बोझो त्याच कळकळीने बोलत राहिला आणि मी लक्ष देऊन, ऐकत राहिलो. तो फार वेगळा फूटपाथ चित्रकार होता. शिवाय तो गरिबी असली तर असली, असे म्हणणारा पहिला मनुष्य होता. मी पुढचे काही दिवस त्याला बघत राहिलो. त्यात बरेच वेळा पाऊस पडल्याने त्याला काम करता आले नाही. त्याने त्याची जीवनकहाणी मला सांगितली आणि ती मोठी चौकस स्वरूपाची होती.

तो बँकेचे कर्ज बुडवलेल्या एका पुस्तक विक्रेत्याचा मुलगा होता. तो अठरा वर्षांचा असतांना घरे रंगवायची कामे करू लागला. मग लढाईच्या

काळात तीन वर्षे फ्रान्समध्ये व भारतात नोकरी केली. त्यानंतर त्याला पॅरीसमध्ये घरे रंगवायचे काम मिळाले. ते त्याने खूप वर्षे केले. त्याला इंग्लंडपेक्षा फ्रान्स मानवले. [ तो इंग्लिश असल्याचे लपवे.] त्याचे पॅरीसमध्ये चांगले चालले होते. तो पैशांची बचत करत होता. एका फ्रेंच मुलीबरोबर त्याचे लग्नही ठरले. एक दिवस ती मुलगी एका बसखाली सापडून ठार झाली.

आठवडाभर बोझो दारू पित सुटला व मग कामाला लागला. तसा तो हादरलेलाच होता. त्याच दिवशी सकाळी तो रंगवत असलेल्या मंचावरून चाळीस फूट खाली फूटपाथवर पडला आणि त्याचे उजवे पाऊल चिरडले गेले. काही कारणाने त्याला फक्त साठ पौंड नुकसानभरपाई मिळाली. तो इंग्लंडला परतला आणि ते पैसे त्याने काम शोधण्यात खर्च केले. मिडलसेक्स बाजारात त्याने पुस्तके विकायचा प्रयत्न केला. मग खेळणी विकून बघितली आणि शेवटी फूटपाथ चित्रकार म्हणून स्थिर झाला. तेव्हापासून तो पैशांची तोंडमिळवणी करतच जगत आलेला आहे. हिवाळाभर त्याने उपास काढले. तो सतत बेघर लॉजमध्ये किंवा नदीकिनारी झोपत आलेला आहे.

जेव्हा मला समजले, की अंगावरच्या कपड्यांशिवाय व काही पुस्तके आणि रंगवायच्या सामानाशिवाय त्याच्याकडे काही नाही आणि कपडे म्हणजे चिंध्या आहेत, पण तो कॉलर आणि टाय घालत असे आणि त्याबद्दल त्याला गर्व होता. सुमारे वर्षभर तीच कॉलर त्याच्या गळयाभोवती होती. तिला शर्टाच्या आतील कापडाची ठिगळे तो लावत राहिला. त्याचा जखमी पाय दिवसेंदिवस जास्त त्रासदायक होऊ लागला होता आणि बहुधा तो कापायचीच पाळी येणार होती. फूटपाथवर वाकून, त्याचे गुडघे बुटांमधील सोलसारखे कडक झाले होते. त्याला भीक मागण्याशिवाय आणि बेघरांच्या लॉजमधील मरणाशिवाय नक्कीच काही भविष्य नव्हते.

या सगळ्यासकट त्याला भीती, लाज, स्वतःची दया वा खंत वाटत नसे. तो त्याचे काय नशीब होते ते आनंदाने स्वीकारत होता. त्याने स्वतःचे तत्वज्ञान बनवले होते. भिकारी असणे, हा त्याचा दोष नव्हता, असे तो बोलला. त्याबद्दल त्याला काही अपराधी वाटत नव्हते किंवा त्याचा त्रासदेखील होत नव्हता. तो समाजाचा शत्रू होता. तशी संधी मिळाल्यास तो गुन्हा करायलाही तयार होता. तो काटकसरीच्या तत्वाचे पालन करायला तयार नव्हता. उन्हाळ्यात तो काही बचत करत नसे. त्याचे जादा पैसे तो पेयपानावर खर्च करे. त्याला बायकांची काही पर्वा नव्हती. हिवाळा आल्यावर, जर तो कफल्लक असला, तर समाजाने त्याच्याकडे पहायला हवे, असे तो म्हणे. जर आभार मानायचे नसतील तरच तो धर्मादाय मिळत असलेली पै अन पै वसूल करायला तयार असे. खायला मिळाल्याबद्दल गाण्याऐवजी त्याचा घसा सुकून बसत असे. त्याला इतरही बरेच मानपान होते. उदाहरणार्थ, तो बाता मारी, की त्याने आयुष्यात उपासमार होत असतानाही कधीच सिगरेटचे थोटुकदेखील उचलले नाही. तो सर्वसामान्य भिकाऱ्यांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत असे. त्याना तो काही स्वाभिमान नसलेली गर्दी समजत असे. त्याना साधे ऋणाइतपणा वाटून न घेणेही जमणे शक्य नव्हते. तो फ्रेंच बऱ्यापैकी चांगले बोले. त्याने झोलाच्या काही कादंबऱ्या, शेक्सपिअरची सगळी नाटके, गलिव्हर ट्रॅव्हल्स आणि खूपसे निबंध वाचले होते. त्याला आठवेल तसे त्यातील साहसे तो शब्दात वर्णन करू शके. उदाहरणार्थ, मरणाच्या उत्तरक्रियेसंबधी बोलतांना तो मला म्हणाला, "तू कधी प्रेत जाळतांना पाहिले आहेस का? मी भारतात ते पाहिले आहे. त्यांनी ते प्रेत पेटलेल्या लाकडात ठेवले आणि दुसऱ्याच क्षणी ते प्रेत उडी मारेल म्हणून, मी घाबरून आश्चर्यचकित झालो, कारण फक्त त्याचे स्नायू आगीने आक्रसून जात होते. मी चक्रावून गेलो. हेरिंग माशाला पेटत्या कोळशांवर ठेवल्यासारखे ते

प्रेत तडफडले आणि त्याचे पोट फुटून, तुम्ही पन्नास यार्डांवरून ऐकू शकाल, एवढा मोठा आवाज झाला. हे बघून मी जाळण्याच्या विरुद्ध गेलो.

किंवा परत त्याच्या अपघातासंबंधीः

डॉक्टर म्हणाले, “अरे तू एका पायावर पडलास. तू नशीबवान आहेस की दोन पायांवर पडला नाहीस. कारण तसे झाले असते, तर तू त्या भिकार ॲकॉर्डीयनसारखा बंद झाला असतास आणि तुझी मांडीची हाडे कानाला जाऊन चिकटली असती!”

अर्थात हा शब्दप्रयोग काही डॉक्टरांचा नव्हता, ते स्वतः बोझोचा होता. त्याला नेहमी वेगवेगळे शब्दप्रयोग करण्याचे डोके होते. तो त्याचा मेंदू जागरूक आणि तल्लख ठेवत असे. त्यामुळे कोणीही त्याला गरिबीत ढकलू शकत नसे. तो गारठलेला व चिंध्या पांघरलेला व भुकेलेला का असेना, पण जोपर्यंत तो वाचू शकत होता, तारे निरीक्षण करू शकत होता व विचार करू शकत होता, तोपर्यंत तो म्हणाला तसा तो स्वतंत्र व्यक्ती होता.

तो पश्चात्तापदग्ध खेळाडू होता. [असा खेळाडू ज्याला व्यक्तीशः जरी देव आवडत नसला, तरी तो त्याच्यावर थोडा तरी विश्वास ठेवे.] मानवी कारभार कधीच सुधारणार नाही, असा विचार करण्यात त्याला आनंद मिळे. कधीकधी तो म्हणे, नदीकिनारी झोपल्यावर, गुरु अथवा मंगळाकडे बघून, त्याला दिलासा मिळत असे. त्याला असे वाटे की बहुधा, नदीकिनारी झोपून त्याला चौकस असे काही सुचत असे. तो म्हणे, पृथ्वीवरचे आयुष्य हे कठीण आहे, कारण जगण्याच्या गरजांसाठी हा ग्रह गरीब आहे. थंड हवा आणि पाण्याची दुर्भिक्षता याबरोबर मंगळ तर अजून फारच गरीब आहे आणि तिथे जगणे कठीण आहे.

पृथ्वीवर पैसे मिळवण्यासाठी तुम्ही जखडले जाता आणि मंगळावर बहुधा तुम्ही जिवंत भाजले जाता. यामुळे बोझो खूश झाला का ते मला कळले नाही. तो वेगळाच माणूस होता.

## XXXI

बोझोने नेलेल्या लॉजचे भाडे एका रात्रीला नऊ पेन्स होते. ती मोठी गर्दीची पाचशे लोक मावतील, अशी जागा होती. ती भटक्या, भिकारी आणि बारीकसारीक गुन्हे केलेल्यांची ठरलेली भेटायची जागा होती. काळे, गोरे व सावळे सर्व जातींचे लोक सलोख्याने एकत्र रहात. तिथे असलेल्या एका भारतीयाबरोबर मी वाईट उर्दूमध्ये बोललो, तेव्हा तो बाटलेला काफीर मला म्हणाला --- भारतात एखाद्याने शहारावे, असा तो शब्द होता. इथे रंगाला फार महत्व दिले जाते. एखाद्याला जीवनाच्या चौकस छटा दिसतात. भटके असणाऱ्या सत्तरीच्या म्हाताऱ्या आजोबांनी त्यांचे बरेचसे आयुष्य सिगरेटची थोटके वेचून, त्यातील तंबाखू एका औंसाला तीन पेनी अशा भावाने विकण्यात घालवले. डॉक्टर हा खरा डॉक्टर होता. त्याला काही किरकोळ गुन्हा केल्याबद्दल डॉक्टरीमधून हद्दपार करण्यात आले होते. तो वर्तमानपत्रे विकण्याव्यतिरिक्त, कधीकधी काही पेन्सच्या बदल्यात वैद्यकीय सल्ला देत असे. बांगलादेशातील चितगॉन्ग येथील मूळ रहिवासी असलेल्या, या छोटाश्या, अनवाणी चालणाऱ्या, भुकेलेल्या खलाशाचे जहाज चुकल्यामुळे, तो अनेक दिवस लंडनमध्ये फिरत होता. तो इतका दयनीय व बिचारा होता, की त्याला तो ज्या शहरात फिरत आहे, त्याचे नावदेखील माहिती नव्हते --- मी सांगेपर्यंत त्याला वाटत होते, की ते लिव्हरपूल आहे. बोझोचा मित्र

असलेला, तो पत्रे लिहून देणारा भिकारी होता. त्याला बायकोच्या क्रियाकर्मासाठी मदत मिळावी म्हणून करुणामय पत्रे लिहावी लागली आणि जेव्हा त्या पत्रांचा परिणाम दिसला, तेव्हा तो पाव आणि मार्गारीनचा मोठा साठा घेऊन बेपत्ता झाला. तो हैना सारखा फार वाईट प्राणी होता. मला त्याच्याशी बोलतांना असे आढळले, की तो थापा मारून पैसे काढणारा होता आणि त्याच्या थापा त्याला खऱ्याच वाटत.

अशा लोकांसाठीचे बेघर लोकांचे लॉज अल्साटीयाला होते. मी बोझोबरोबर असतांना, त्याने मला लंडनमध्ये भीक मागायच्या काही युक्त्या सांगितल्या. एखाद्याच्या कल्पनेपेक्षा त्या फार वेगळ्या होत्या. भिकारी वेगवेगळ्या प्रकारचे असत. लायकी नसतांना भीक मिळवणारे व काही उपयुक्तता सिद्ध करून पैसे मागणारे, अशी ठळक सामाजिक रेषा असणारे भिकारी होते. वेगवेगळ्या प्रकारे आर्जव करून वेगवेगळी रक्कम मिळवणारे भिकारी होते. त्यांच्या पँटच्या खिशात दोन हजार पौंड सापडलेल्या भिकाऱ्याबद्दल रविवारच्या वर्तमानपत्रात छापून आलेल्या गोष्टी अर्थात खोट्या होत्या. पण काही वरच्या दर्जाचे भिकारी चांगल्या नशीबाचे असत. त्याना आठवड्याभराचा खर्च भागेल एवढे पैसे एका वेळेसच मिळत असत. सर्वात धनाढ्य भिकारी म्हणजे रस्त्यावर कसरतींचे खेळ करणारे डोंबारी व फोटोग्राफर्स असत. उदाहरणार्थ, चित्रपटगृहाच्या रांगेत, डोंबारी किंवा फोटोग्राफर्स नेहमी आठवड्याला पाच पौंड मिळवत असत. पण हवा चांगली असेल तरच फोटोग्राफर्सना पैसे मिळत. त्यांना लबाडीने हातचलाखी करून, धंदा करावा लागे. जेव्हा त्यांना गळाला लागेल असे गिऱ्हाईक मिळे, तेव्हा ते फोटो काढण्याचे ढोंग करत त्याच्यामागे धावत. मग तो मनुष्य जवळ आल्यावर ते म्हणत, “हा बघा सर, हलताना काढूनही, तुमचा फोटो किती छान आला आहे!”

तो मनुष्य म्हणे, "पण मी तुम्हाला माझा फोटो काढायला सांगितलेच नव्हते."

"काय तुम्हाला फोटो काढून नको होता? मला वाटले तुम्ही मला खूण केलीत. ठीक आहे. माझा एक फोटो वाया गेला. माझे सहा पेन्स गेले."

यावर दया येऊन तो माणूस म्हणे की शेवटी तो फोटो घेईल. मग लबाड माणूस काही पाहिल्याचे सोंग करून म्हणे, की तो फोटो खराब झाला आहे व त्याच पैशात तो नवीन फोटो काढून देईल. खरे तर त्याने पहिला फोटो घेतलेलाच नसे आणि त्यामुळे जरी गिऱ्हाईक फसले नाही, तरी त्याचा तोटा काहीच नसे.

डोंबारी व पेटीवादक भिकाऱ्यांपेक्षा कलाकार समजले जात. बोझोचा मित्र असलेल्या शॉर्टी नावाच्या पेटीवादकाने मला त्याच्या धंद्याबद्दल सर्व काही सांगितले. तो आणि त्याचा मित्र व्हाईट चर्चजवळील व्यापारी रस्त्यावरील कॉफीच्या दुकानाबाहेर वा लोकगृहा [public houses] बाहेर थांबायचे. त्यांचा बहुतेक पैसा त्यांना स्वस्त कॉफीच्या किंवा दारुच्या दुकानातून मिळायचा. चांगल्या दर्जेदार ठिकाणी त्याना उभे करत नसत. बाहेर उभा राहून तो पेटीवर एखादी धून वाजवे. त्याचा लाकडी पाय असलेला मित्र आत जाऊन लोकांच्या मनात दया उत्पन्न करून, भीक मागून उलट्या टोपीत पैसे गोळा करे. त्यानंतर दुसरी एक धून वाजवणे, शॉर्टीसाठी मोठ्या मानाचे असे. त्यातून तो असे दाखवे, की तो खराखुरा कलाकार आहे व तो पैसे मिळाल्यावर लगेच जाणार नाही. तो आणि त्याचा मित्र आठवड्याला दोन तीन पौंड मिळवत. पण पेटीचे भाडे म्हणून त्यांना आठवड्याला पंधरा शिलिंग द्यावे लागत. त्यामुळे त्याना आठवड्याला अंदाजे, एक पौंड मिळे. ते सकाळी

आठ वाजल्यापासून पार रात्री दहापर्यंत रस्त्यावर असत. आणि शनिवारी रात्री तर त्यापेक्षाही उशीरापर्यंत!

चित्रे काढून देणारी माणसे असत. त्यांना कधीकधी कलाकार म्हटले जाई, तर कधीकधी नाही. बोझोने मला एका खऱ्या चित्रकाराशी ओळख करून दिली. त्याने पॅरीसमध्ये त्याचे शिक्षण घेतले होते. तो जुन्या प्रसिद्ध नटनट्यांची चित्रे काढत असे आणि ती ब्युटी पार्लर्सना पुरवत असे. तो ती चित्रे छान काढे. तो दगडांवर चित्रे काढे. त्याने हे काम कसे सुरु केले, ते त्याने मला सांगितले.

माझी बायको व मुले भुकेने कळवळत होती. मी रात्री उशीरा घरी चाललो होतो. माझ्याकडे मी काढलेली खूप चित्रे होती. ती कशी विकावीत या चिंतेत मी पडलो होतो.

मग स्ट्रँडला मी एका माणसाला फुटपाथवर गुडघ्यांवर बसून चित्र काढतांना पाहिले. लोक त्याच्याकडे नाणी फेकत होते. मी आल्यावर तो उठून एका दारुच्या दुकानात शिरला. मी विचार केला, "जाऊ दे. जर तो असे पैसे मिळवू शकतो, तर मी का नाही? त्या झटक्यासरशी, मी गुडघ्यात वाकून, त्याच्या खडूने चित्र काढू लागलो. देव जाणे मी हे कसे करू लागलो! भुकेने माझे डोके हलके झाले असावे. नवल म्हणजे मी यापूर्वी कधी पेस्टल रंग वापरले नव्हते. मला काम करता करता तंत्र शिकून घ्यावे लागले. लोक थांबून, माझे चित्र बरे असल्याचे बोलू लागले. त्यांनी मला नऊ पेन्स दिले. तेव्हाच दारुच्या दुकानातून तो पहिला माणूस परत आला. तो म्हणाला, "तू इथे माझ्या जागेवर काय करतो आहेस? मी त्याला स्पष्ट केले, की मी भुकेलेला असून, मला काही पैसे मिळवायची गरज आहे. तो म्हणाला, "ओहो, असे आहे का? मग तू माझ्याबरोबर काम कर. मग त्या दिवसापासून

मी पैशांसाठी चित्रे काढू लागलो. मला आठवड्याला एक पौंड मिळतो. त्यावर माझ्या सहा मुलांचे व आम्हा नवराबायकोचे भागत नाही. पण नशीबाने माझी बायको शिवणकाम करून थोडे पैसे मिळवते.

या आयुष्यातील बेकार भाग म्हणजे थंडी. आणि त्यापुढील म्हणजे तुम्हाला सहन करावा लागणारा कोलाहलाचा त्रास. आधी मला याहून चांगले काही माहिती नसल्याने, मी फूटपाथवर कधी कधी नागडे चित्र काढत असे. शेतात असलेल्या सेंट मार्टीन चर्चच्या बाहेर मी पहिले चित्र काढले. काळ्या कपड्यातील एक माणूस --- मला वाटते तो चर्चची शिस्त राखणारा असावा --- फार चिडलेल्या अवस्थेत बाहेर आला.

तो किंचाळला, "तुला असे वाटते का, की पवित्र चर्चच्या बाहेर आम्ही नीतिमत्तेच्या विरुद्ध असलेले असे लैगिक चित्र खपवून घेऊ?" त्यामुळे मला ते धुवून टाकावे लागले. ते व्हीनसचे चित्र होते. दुसऱ्या वेळी मी तेच चित्र नदीकिनारी असलेल्या भिंतीवर काढले. तिथून जाणाऱ्या पोलिसाने ते पाहिले आणि काही न बोलता, त्याने ते त्याच्या सपाट पायांनी पुसून टाकले."

बोझोने पण अशीच पोलिसाने त्रास दिल्याची गोष्ट सांगितली.

एकदा मी त्याच्याबरोबर असतांना, हाईड पार्कमध्ये अनैतिक वागणुकीची गोष्ट घडली. तिथे पोलीस जरा वाईटच वागले. पोलीस झाडीत लपले आहेत असे हाईड पार्कचे विनोदी चित्र बोझोने काढले. आणि त्याखाली लिहिले, 'कोडे, पोलिसाला शोधा.' मी त्याला सांगण्याचा प्रयत्न केला की हे असे लिहिणे हे असभ्य वर्तन ठरेल. पण त्याने ऐकले नाही. तो म्हणाला, की कुठल्याही पोलिसाने हे पाहिले, तर तो त्याला अटक करेल आणि त्याची चित्र काढायची जागा जाईल.

या चित्रे काढणाऱ्यांच्या खाली गाणारे येत. किंवा काडेपेट्या, बुटांच्या नाड्या किंवा अत्तर म्हणून विकली जाणारी काही सुगंधी द्रव्य असलेली पाकीटे विकणारे येत. हे सगळे लोक खरे तर भिकारी असत. ते चिक्कूपणाचा पुरेपूर देखावा करत. त्यांच्यापैकी कुणालाच दिवसाला अर्धा क्राऊन [अडीच शिलिंग] पेक्षा जास्त पैसे मिळत नसत. त्याना काडेपेट्या विकायचे ढोंग करावे लागे कारण भीक मागणे कायद्यात बसत नाही. कायद्याप्रमाणे, जर तुम्हाला कोणी अनोळखी मनुष्य भेटला आणि तुम्ही त्याच्याकडे दोन पेनी मागितल्या, तर तो पोलिसाला बोलावून तुम्हाला सात दिवस तुरुंगात टाकू शकतो. पण तुम्ही कुरूपपणे खालच्या आवाजात काही गुणगुणत, 'माझ्या देवा, मी तुझ्या जवळ येतो.' असे म्हणालात किंवा काही चिकट पदार्थ अंगारा म्हणून फूटपाथला लावलात, तर किंवा काडेपेट्यांचे तबक घेऊन उभे राहिलात, तर चालते. थोडक्यात, जर तुम्ही स्वतःला त्रास करून घेतलात --- तर तुम्ही कायद्यात बसणारा धंदा करत असता. भीक मागत नसता. काडेपेट्या विकणे आणि रस्त्यावर गाणे हे फक्त कायदेशीर रीत्या गुन्हे आहेत. फायद्याच्या दृष्टीने नव्हे. तरीही लंडनमध्ये असा कोणी काडेपेट्या विकणारा आणि रस्त्यावर गाणारा नाही, जो वर्षाला ५० पौंड मिळवत असेल --- आठवड्याला चौऱ्याऐंशी तास, मागून सतत गाड्या जात असतांना, फूटपाथच्या कडेला उभे राहूनदेखील फारशी प्राप्ती होत नाही.

भिकाऱ्यांच्या सामाजिक दर्जाविषयी बोलणे इथे योग्य ठरेल. जेव्हा एखादा त्यांच्याशी बोलतो आणि त्याना समजते की ती आपल्यासारखीच साधी माणसे आहेत, तेव्हा समाजाचा त्यांच्याविषयीचा दृष्टीकोन बघून, चक्रावून जायला होते. लोकांना असे वाटते, की काम करणारा सामान्य माणूस आणि भिकारी यांच्यात काही महत्वाचा फरक आहे. दोघांची जातच वेगळी आहे. गुन्हेगार व वेश्यांसारखे ते जातीबाहेर काढले गेले आहेत. भिकारी काम

करत नाहीत. मुळातच ते शून्य किमतीचे असतात. असे गृहीत धरले जाते, की गवंडी किंवा सुशिक्षित माणूस जसे पैसे मिळवतो, तसे ते त्यांच्या जगण्यासाठी पैसे मिळवत नाहीत. ते सामाजिक बांडगुळे असतात. पण आपण त्यांच्याविषयी द्वेष वाटत असूनही मानव असल्यामुळे, त्यांना सहन करतो. पण तुम्ही जवळून पाहिलेत, तर भिकाऱ्याचे आयुष्य आणि अनेक माननीय लोकांचे आयुष्य यात महत्वाचा फरक नाही. भिकारी काम करत नाहीत, असे म्हटले जाते. पण काम म्हणजे काय? हिशेबनीस आकड्यांची बेरीज करून काम करतो. बांधकाम मजूर ओळंबा सरळ ठेऊन काम करतो. भिकारी सर्व प्रकारच्या हवेत दाराबाहेर उभा रहातो. व पायांच्या शिरांचे, श्वासनलीकेचा दाह होण्याचे, खोकला होण्याचे, इत्यादी दुखणी ओढवून घेतो. हे इतर कुठल्याही व्यापारासारखेच आहे, पण अर्थात निरुपयोगी. पण कित्येक प्रसिद्ध उद्योगधंदे देखील निरुपयोगी असतात. एक सामाजिक प्रकार, या दृष्टीने विचार केल्यास, भिकारी इतरांसारखाच असतो. दुर्मिळ औषधांचे व्यापारी, रविवारच्या वर्तमानपत्राचा उत्पादक, भाड्याने वस्तू देण्याचा प्रयत्न करणारा, या सर्वांच्या मानाने तो प्रामाणिक असतो. थोडक्यात तो बांडगूळ असतो, पण त्रासिक नसणारे बांडगूळ असतो. तो समाजाला लुटत नाही. फक्त त्याच्या जगण्यापुरते मागतो. आपल्या नैतिक तत्वांना अनुसरून, ते ठीक वाटते. त्यासाठी तो परत परत त्रासही सहन करतो. त्यामुळे मला असे वाटत नाही की भिकाऱ्याला इतरांपासून वेगळ्या वर्गात टाकावे किंवा आधुनिक लोकांनी त्याचा राग करावा.

मग प्रश्न उरतो, की लोक भिकाऱ्याचा राग का करतात? कारण हे जगभर चालते. मला वाटते की याचे कारण एवढेच असावे, की तो नीटनेटका राहू शकत नाही. व्यवहारात याची कोणी पर्वा करत नाही, की हे काम उपयुक्त, काही नवीन उत्पादन करणारे आहे की नाही. फक्त एवढाच विचार केला

जातो, की हे लाभदायक आहे का. ऊर्जेसंबंधीची आधुनिक चर्चा करतांना, तत्परता, सामाजिक सेवा आणि बाकीचे सर्व काही बघितले जाते. पण कायदेशीरपणे खूप पैसे मिळवणे याव्यतिरिक्त, त्याला काही अर्थ नसतो. गुणांची किंमत पैशातच केली जाते. या कसोटीवर भिकारी उतरत नाहीत आणि त्यामुळे त्यांचा राग केला जातो. जरी कुणी आठवड्याला भीक मागून दहा पौंड मिळवले, तर लगेच तो माननीय व्यवसाय होईल. भिकाऱ्याकडे खऱ्या नजरेने पाहिले, तर तो साधा उद्योगधंदा करणारा आहे. तो त्याच्या हातात असेल तेवढे, जरुरीपुरते मिळवतो. बहुतेक आधुनिक लोकांप्रमाणे त्याने त्याचा स्वाभिमान विकलेला नाही. फक्त त्याने व्यवसाय निवडण्यात चूक करून तो असा निवडला आहे, की ज्यात श्रीमंत होणे शक्य नाही.

XXXII

मला कमीत कमी व सोप्या शब्दात लंडनमधील भिकाऱ्यांबद्दलच्या रागावर काही मुद्दे मांडायचे आहेत. [प्रत्येकाला माहिती असलेले सोडून] हे लंडनमध्ये हल्ली उच्चारले जाणारे काही दांभिक शब्द आहेतः

काही करामत करून दाखवणारे, भिकारी, रस्त्यावर खेळ करणारे डोंबारी वगैरे --- केवळ दुसऱ्याच्या दयेवर जगणारे --- काही व्यापार करत असल्याचे ढोंग न करणारे, भिकाऱ्यासाठी पैसे गोळा करणारा भिकाऱ्याचा मदतनीस, रस्त्यावर गाऊन भीक मागणारे, रस्त्यात फोटो काढणारे, रस्त्यात मोटारी बघत उभे रहाणारे, मूर्खपणा करणारे, रस्त्यात नाचणारे, काडेपेटीसारखी फालतू वस्तू विकणारे, कुणी काही विकत घेण्याचे ढोंग करणारे, अर्धवट गुप्तहेर, गरीब पोलीस, भटक्या जिप्सी, पाकिटात सुगंधी द्रव्याचे दाणे घालून विकणारे, दारुच्या गुत्त्यात रमणारे, बोली भाषा बोलणारे,

कुठल्याही फटीत झोपू बघणारे, बेघरांच्या घरात झोपणारे, तात्पुरत्या निवासस्थानी राहू बघणारे, अर्ध्या क्राउनला वा शिलिंगला आपले कपडे विकणारे, एका शिलिंगला डुक्कर विकणारे, सहा पेनीला बायको विकणारे, बोली भाषेत फेरीवाल्याचा परवाना विकणारे, झोपण्यापुरती जागा किंवा रात्रीचा आसरा शोधणारे, सिगरेटच्या थोटकातून तंबाखू जमवणारे, काठीचोर, गाढवासारखा आळशी , भटक्या!

रडणारे, चोखणारे, गिळणारे, काही पळवणारे, चोरणारे ---

यापैकी अर्धे शब्द मोठ्या शब्दकोशात आहेत.

त्यापैकी काहींची व्युत्पत्ती शोधणे रुचीपूर्ण ठरेल. उदाहरणार्थ, fuhkum मजेदार व tosheroon अर्धा क्राउन [दोन शिलिंग आणि सहा पेनी] हे तर्क करण्यापलीकडील आहेत. deaner हा शब्द बहुधा denier पासून येतो. glimmer बहुधा [क्रियापद to glim] चकाकणे/प्रकाश किंवा glimpse [थोडक्यात बघणे] पासून. gee [नवल, सहानुभूती वाटल्याचा उद्गार] हा gee म्हणजे घोडा यापासून आला असावा. screever [फूटपाथवरील चित्रकार] सारखा शब्द गेल्या दीडशे वर्षात इंग्लिशमध्ये आलेला नाही. तो फ्रेंचमधूनही आलेला नाही. कारण फूटपाथवरील कलाकार फ्रान्समध्ये नाहीतच. judy [गे मनुष्य] आणि bawl [मोठ्याने रडणारा/ओरडणारा] हे पूर्वेकडील शब्द आहेत. टॉवर पुलाच्या पश्चिमेला तो सापडत नाही. smoke [सिगरेटची थोटके ओढणारा] हा शब्द फक्त भटक्यानाच लागू होतो. kip [कुठेही झोपणारा] हा डॅनिश शब्द आहे. अलीकडे doss हा शब्द त्याअर्थी वापरला जातो पण आता तो फारसा रूढ नाही

लंडनची बोली भाषा काही कोसांवर झटपट बदलत जाते. जुने उच्चारशास्त्रही बदलत जाते. आता फेस [चेहरा] ला फाईस म्हणणारे अगदी थोडे लोक उरले आहेत. फॅशनप्रमाणे शब्द बदलतात. पूर्वी लंडनमध्ये bloody हा शब्द कामकरी लंडनवासी सर्रास वापरत असत. आता तो पूर्णपणे गेला. पण काही कादंबरीकार तो वापरतात. लंडनमध्ये जन्मलेला [ हा स्कॉटीश किंवा आयरिश लोकांपासून वेगळा असतो.] काहीतरी शिकलेला असल्याशिवाय, आता ब्लडी हा शब्द वापरत नाही.

शिवराळ इंग्लिश भाषा ही एक गूढ आहे. जादूसारखी तर्कहीन आहे. खरे तर ती एक प्रकारे जादुई आहे. पण त्यातही विरोधाभास आहे. तो असाः शिवी देण्यामागील उद्देश धक्का देऊन दुखावणे, हा असतो. सहसा जे गुप्त ठेवायला हवे, ते जाहीर करून आपण हे करतो.

लैंगिक क्रियांपासून काहीतरी करायचे असावे. पण विचित्र गोष्ट अशी आहे, की जेव्हा आपण एखादा शब्द ठामपणे रागाने उच्चारतो, तेव्हा तो त्याचा मूळ अर्थ गमावून बसतो. शब्द म्हणजे शपथ बनतो कारण त्याचा ठराविक अर्थ तयार होतो. आणि तसे झाल्यामुळे, तो शपथ बनतो. उदाहरणार्थ, आता लंडनवासी त्याच्या मूळ अर्थाने ब्लडी शब्द अगदी क़्वचित वापरतात किंवा अजिबातच वापरत नाहीत. तो सकाळपासून रात्रीपर्यंत त्यांच्या ओठांवर असतो. पण तो फक्त रागाने उच्चारलेला असून त्याला काही अर्थ नसतो. मूळ अर्थ त्या शब्दाने गमावलेला असतो.

फ्रेंचमध्येही असेच होते. पॅरीसमध्ये अजून काही शब्द क्वचित वापरले जातात. पण ते उच्चारणाऱ्या बहुतेकांना एके काळी याचा अर्थ काय होता, हे माहिती नसते. अशा शब्दांना जादुई वलय  असते. त्यामुळे ते अलग पडतात व सामान्य संभाषणात वापरले जात नाहीत.

अपमान करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या शब्दांचेही असेच आहे. एखाद्या शब्दाचा अर्थ वाईट असल्याने त्याने अपमान होतो. पण प्रत्यक्ष व्यवहारात, त्याच्या अपमान करायच्या ताकदीला त्याच्या खऱ्या अर्थाशी काही देणे घेणे नसते. उदाहरणार्थ लंडनवासियांसाठी सर्वात अपमानकारक शिवी काय असेल, तर 'बास्टर्ड'. त्याचा अर्थ काहीही असो, पण त्याने क्वचितच अपमान होतो. आणि बाईचा लंडन किंवा पॅरीसमध्ये सर्वात मोठा अपमान म्हणजे, cow [गाय], जे खरे तर भलावण करणारेही असू शकते. कारण गाय हा सर्वात आवडता प्राणी आहे. खरे तर शब्दाने अपमान होतो कारण त्याचा खरा अर्थ न बघता, त्यातून तसे प्रतीत होते. रागीट शब्द म्हणजे त्याचा जो अर्थ लावला जाईल, तो. भारतात भेन्च्योद ही वाईट शिवी आहे. पण इंग्लंडमध्ये तो परदेशी शब्द असल्याने, तो त्याची रागाने अपमान करायची हातोटी घालवून बसला आहे. तो शब्द शाळेच्या क्रमिक पुस्तकात मी जुन्या ग्रीक विनोदी नटाच्या तोंडी घातलेला पाहिला आहे. त्याचा खरा अर्थ काय आहे ते त्यांना माहिती असून, नाटके लिहिणाऱ्या आणि तळटीपा देणाऱ्यांनी असे सुचवले आहे, की पारशी राजदूत वापरतात असा तो बेकार शब्द असल्याने त्याचा वाईट अर्थ निघून गेला आहे.

लंडनमध्ये जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे सहसा कोणी स्त्रियांसमोर शिव्या देत नाही. पण पॅरीसमध्ये सर्व वेगळे आहे. तिथे कोणीही स्त्रियांसमोर शिव्या द्यायला कचरत नाही. पॅरीसचा रहिवासी दक्ष असतो आणि स्त्रिया स्वतःही शिव्या देत असतात. लंडनचे लोक जास्त नम्र आहेत. त्याना असल्या गोष्टी आवडत नाहीत.

तर अशा तऱ्हेने मी या विषयावर थोडी टीकाटीपण्णी केली आहे.

दुर्दैवाने लंडनमध्ये शिव्याशाप कसे बदलत गेले यावर कोणी लिहित नाही. यामुळे खरे तर शब्दांच्या तयार होण्यावर, प्रगतीवर आणि बाद होण्यावर उजेड पडला असता.

## XXXIII

बी ने मला दिलेले दोन पौंड मला दहा दिवस पुरले. हे पॅडीच्या चिक्कू स्वभावामुळे शक्य झाले. दिवसाला एक जेवण घेणे म्हणजे तो रानटी उधळपट्टी समजत असे. त्याच्या दृष्टीने अन्न म्हणजे केवळ पाव आणि मार्गारीन हेच होते --- कायम चहा आणि पावाचे दोन तुकडे. त्यामुळे भुकेला दोन तास फसवले जात असे. अर्ध्या क्राऊनमध्ये अन्न, अंथरूण, तंबाखू आणि सर्व काही कसे बसवायचे, हे त्याने मला शिकवले. त्याने अजून काही शिलिंग संध्याकाळी चोऱ्या करून मिळवले. ते धोकादायक काम होते. कारण ते बेकायदा होते, पण त्यामुळे आमची पुंजी जास्त टिकली.

एका संध्याकाळी आम्ही सँडविच करणारा माणूस म्हणून काम मिळवायचा प्रयत्न केला. पाच वाजता आम्ही काही कार्यालयांमागील एका अरुंद गल्लीत गेलो, पण तिथे आधीच तीस चाळीस लोक रांगेत उभे होते. दोन तासांनी आम्हाला सांगण्यात आले, की आम्हाला तिथे काम मिळणार नाही. आमचे फार काही गेले नाही कारण, ते हेवा न करण्यासारखे काम होते. तिथे दिवसाला तीन शिलिंग मिळत असत आणि दहा तास काम करावे लागत असे --- विशेषतः वादळी हवेत ते मेहनतीचे काम होते. तिथे कामात टंगळमंगळ चालत नसे कारण तिथे सतत पोलीस इन्स्पेक्टरचा फेरा असे. अजून एक त्रास म्हणजे ते कधीच आठवडाभर कामावर नसत. ते एक दिवस

किंवा तीन दिवस कामावर असत. त्यामुळे प्रत्येक सकाळी त्यांना अनेक तास कामाची वाट पहावी लागे. काम नसलेले पण हे काम करायला तयार असलेले लोक शक्तिहीन होत व त्याना चांगले वागवले जाण्यासाठी लढावे लागे. सर्व सँडविच करणाऱ्या माणसांचे एक काम म्हणजे पत्रके वाटणे. त्यासाठी त्यांना पैसे दिले जात. जेव्हा त्याच्याकडील पत्रके संपत, तेव्हा तो निघून जात असे, त्यामुळे आधीच तुम्ही त्याबद्दल पैसे घेतलेले बरे असते.

गरिबी व दुर्लक्षिततेमुळे, भयंकर कंटाळवाणे व अतिशय घाणेरडे असणारे, बेघरांच्या लॉजमधील जिणे बघायला आम्ही गेलो. जमिनीखालील स्वयंपाकघरात कालचे वर्तमानपत्र किंवा ‘युनियन जॅक’ नावाच्या लहान मुलांसाठीच्या मासिकाचा मिळेल तो जुना अंक वाचत बसून रहाण्याव्यतिरिक्त तिथे करण्यासारखे काही नसे. यावेळेस खूप पाऊस पडला. आलेला प्रत्येकजण स्वयंपाकघरात उकडून निघाला. तिथे फार घाण वास येत होता. फक्त तिथे मिळणारा चहा आणि पावाचे दोन तुकडे, हेच काय ते तेथील आकर्षण होते. लंडनमधील किती लोक असे आयुष्य जगतात, मला माहिती नाही. पण ते कमीत कमी हजार तरी असणार. गेल्या दोन वर्षातील हे आयुष्य पॅडीसाठी फारच चांगले होते. त्याच्या भटक्या आयुष्यातील मधला काही काळ, जेव्हा त्याच्या हातात निदान काही शिलिंग पडत होते, तेव्हा नुसतेच भटकणे तुलनात्मक दृष्ट्या, वाईट होते. यावर्षी पाऊस खूप पडला आणि खायला मिळत नसे, तेव्हा नेहमी भीतीचे व दुःखाचे अस्पष्ट आवाज येत. बेकारीमुळे कसा छळ होतो, हे त्याला चांगलेच कळले. लोकांना असे वाटते, की बेकार माणूस फक्त त्याचा पगार गमावतो. पण खरे तर अशिक्षित माणसाला त्याच्या हाडातील कामाच्या सवयीमुळे, त्याला पैशांपेक्षा कामाची जास्त गरज असते. सुशिक्षित मनुष्य लादलेला आळशीपणा सहन करू शकतो. हे गरीबीचे सर्वात कटू सत्य आहे. पण पॅडीसारखा माणूस,

ज्याच्याकडे वेळ घालवायचे काही साधन नाही, तो काम नसल्यामुळे, पाळीव कुत्र्याइतकाच बेचैन असतो.

त्यामुळे असे ढोंग करणे हे बरोबर नाही, की जे जे या जगात आले, त्या सर्वांची इतरांपेक्षा जास्त काळजी करायला पाहिजे. खरी सर्वांपेक्षा जास्त काळजी घेण्यासाठी लायक कोण  असेल, तर जो पहिल्यापासून गरीब आहे, गरिबीचा सामना करतो आहे आणि जवळ काही नसतांना कोऱ्या मनाने करतो आहे.

पदार्थांवर थंडीमुळे बाहेरील बाजूला पाण्याची वाफ साठण्याचा ऋतु सुरु होता. बोझोशी बोलण्याव्यतिरिक्त, तो माझ्या मनात घर करून बसला होता. एकदा बेघरांचे घर झोपडपट्टीतील लोकांनी व्यापून गेले होते. पॅडी आणि मी बाहेर पडलो आणि दुपारी परतल्यावर, आम्ही खालून संगीताचे सूर ऐकले. आम्ही खाली गेलो, तेव्हा आम्हाला तीन मऊसर चकचकीत कपडे केलेले सभ्य लोक स्वयंपाकघरात काही धार्मिक विधी करताना दिसले. ते मोठ्या कोटातील त्या प्रदेशाचे धर्मगुरू असून एक बाई हार्मोनियम वाजवत होती. एक जेमतेम हनुवटी असलेला पोरसवदा तरूण ख्रिस्त लटकलेला क्रूस मंदपणे हलवत होता. मला वाटते, त्याना बोलावले नसतांना, त्यांनी सरळ आत येऊन हे सुरु केले असावे. तेथील लोकांनी त्याचा छान आनंद अनुभवला. त्यांनी त्या गोरगरीबांवर जराही ताठा दाखवला नाही, तर दुर्लक्ष केले. सर्वानुमते, स्वयंपाकघरातील प्रत्येकजण --- कदाचित शंभर माणसे --- जणू झोपडपट्टीतील नव्हतीच. ती गात होती आणि प्रत्येकाला गायचा आग्रह करत होती. धर्मगुरू आणि त्यांचे साथीदार यांनी त्याना पैसे मिळत आहेत की नाही, याचा विचार केला नाही. मोठा कोट घातलेल्या धर्मगुरूने बायबलमधील धार्मिक आणि नैतिक गोष्टींची शिकवण दिली. पण गाण्याच्या

कोलाहलात ते काहीही ऐकू आले नाही. हार्मोनियमपासून तीन फुटांवर माणसे इतर सगळ्याकडे दुर्लक्ष करून, शांतपणे जेवायला आणि पत्ते खेळायला बसली. ती गरीब मंडळी अपमान करून नव्हे पण फक्त दुर्लक्ष करून, ते किती शूर आहेत व कसे मोकळेपणे बेघरांच्या घरात वावरत आहेत असा विचार करू लागली. बोझो म्हणाला, की हे लोक महिन्यातून खूप वेळा इथे येतात. पोलिसांवर त्यांचा प्रभाव आहे आणि पोलीस अधिकारी त्यांना डावलू शकत नाही. तुमचे उत्पन्न ठराविक रकमेच्या खाली गेले की ते समजतात की त्यांचा इथे येऊन प्रार्थना करण्याचा हक्कच आहे.

नऊ दिवसांनतर बी ने दिलेल्या दोन पौंडांपैकी फक्त एक पौंड आणि नऊ पेन्स राहिले. पॅडीने आणि मी आमची रात्री झोपायची सोय म्हणून अठरा पेन्स बाजूला काढून ठेवले. तीन पेन्स आमच्या नेहमीच्या, चहापावाकरता खर्च केले. ते जेवण कसले, तर अधिक भूक लागणारे म्हणून दोघांनी मिळून खाल्ले. दुपारपर्यंत आम्हाला कडकडून भूक लागली. जिथे भटक्या लोकांना आठवड्यातून एकदा चहा मिळत असे, ते किंग क्रॉस स्टेशनजवळील चर्च पॅडीला आठवले. तोच आजचा दिवस होता. पावसाळी दिवस असूनही व बोझोकडे फुटकी कवडी नसूनदेखील, तो आला नाही. कारण चर्च त्याच्या पद्धतीत बसत नव्हते. चर्चबाहेर सुमारे शंभर लोक थांबले होते. फुकट चहा मिळण्याच्या आशेने, ते घाणेरडे लोक लांबलांबून आले होते. आता दार उघडले आणि चर्च कामगार व काही मुलींनी आम्हाला चर्चच्या वर असलेल्या एका गॅलरीत नेले. ते ख्रिश्चन धर्माचे कुरूप, घाणेरडे चर्च होते. भिंतींवर रक्त आणि आगीसंबंधी काही वचने लिहिली होती. बाराशे एकावन्न धार्मिक ऋचा लिहिलेले पुस्तक ठेवलेले होते. त्यातील काही ऋचा वाचल्या जात होत्या. मी निष्कर्ष काढला, की या छापलेल्या ऋचा वाईट असणार. चहानंतर तिथे प्रार्थना होती. खालील चर्चमध्ये नेहमीचे धार्मिक लोक जमले

होते. तो आठवड्यातील मधलाच दिवस होता आणि तिथे फक्त काही डझन लोकच होते. त्यातही बारीक व उंच म्हाताऱ्या बायका होत्या त्यांच्याकडे बघून मला उकडलेल्या चिकनची आठवण झाली. आम्ही गॅलरीतील बाकावर रांगेने बसलो होतो आणि आम्हाला प्रत्येकाला चहा, एक पौंड जॅम, मार्गारीन व पावाचे सहा तुकडे मिळाले. चहा संपल्याबरोबर, दाराजवळचे भटके प्रार्थनेत सहभागी व्हायला नको म्हणून, घाईने बाहेर पडले. बाकीचे थांबले. ऋण म्हणून नव्हे, तर जाता येत नाही, म्हणून.

ऑर्गनवर अधीरतेने काही प्रारंभिक ओळी वाजल्या आणि प्रार्थना सुरु झाली. चर्चमध्ये अशा वागण्याची कुणी कधी अपेक्षा केली नसेल, अशा तऱ्हेने भटके फार गैरवर्तन करू लागले. गॅलरीभर माणसे सुस्तावल्यासारखी फिरत होती, बाकावर बसली होती. एकमेकांच्या अंगावर पावाचे तुकडे फेकत होती. माझ्या शेजारील माणसाला मला जोर लावून, त्याच्या सिगरेट पेटवण्याच्या अपकृत्यापासून परावृत्त करावे लागले. प्रार्थना म्हणजे काही विनोद असल्यासारखे भटके बघत होते. ती खरेच इतकी मूर्खपणाची होती --- त्यात अचानक ‘देवाचा विजय असो’ अशा व आयत्या वेळी सुचतील तशा आरोळ्या मारल्या जात होत्या. त्यांचा गोंधळ मर्यादेबाहेर चालला होता. त्या गर्दीत बूटल की अशाच काही नावाचा एक म्हातारा माणूस होता. त्याला प्रार्थनेसाठी नेहमी अग्रभागी ठेवण्यात येत असे. तो उभा राहिला की भटके सिनेमागृहात असल्यासारखे बाके बडवू लागत. ते म्हणत, की आधीच्या प्रसंगी मंत्र्याने त्याला थांबवेपर्यंत, आयत्या वेळेची प्रार्थना, पंचवीस मिनिटे म्हटली होती. एकदा तो उभा राहिला, तेव्हा एक भटका सगळ्या चर्चला ऐकू जाईल, इतक्या जोराने ओरडला ‘सात मिनिटे पिळू नकोस.’ लवकरच आम्ही मंत्र्यापेक्षा जोरात ओरडू लागलो. काही वेळा खालून कुणी रागाने ‘हश’ असे ओरडले. प्रार्थना म्हणणाऱ्या माणसावर आम्ही लक्ष केंद्रित केले आणि मग

आम्ही थांबलो नाही. ते विचित्र, उबग आणणारे दृष्य होते. खाली साधे, शहाणे, मनापासून प्रार्थना करणारे लोक होते आणि वरती ज्यांना खाऊ घातले व जबरदस्तीने प्रार्थनेसाठी थांबवले, असे शेकडो लोक होते. प्रार्थनेत गोंधळ माजवणाऱ्या शेकडो लोकांविरुद्ध धर्मगुरू आणि एखादी स्त्री काय करणार? ते आम्हाला घाबरून होते आणि आम्ही मुद्दाम त्यांना त्रास देत होतो. चिडवणारी, मोठ्या आवाजातील शेरेबाजी करून, आम्ही त्यांना त्रास देत होतो. आम्हाला खायला घालून खजील केल्याबद्दलचा हा सूड होता. मंत्री मोठा शूर माणूस होता. वरून येणाऱ्या आरोळ्या व शेरेबाजीकडे लक्ष न देता, जोशुआचा पायघोळ झगा घालून, तो सतत मोठ्याने बोलत होता. शेवटी, असह्य झाल्याने त्याने जाहीर केलेः मी शेवटची पाच मिनिटे या पापी माणसाना उद्देशून बोलतो. ते बोलल्यावर तो गॅलरीकडे वळला व पाच मिनीटे तसाच राहिला. नाहीतर त्रास देणारे व न देणारे कोण यांच्यात संशय राहिला असता. पण आम्ही आमचे चालूच ठेवले. मंत्री आग ओकत होता आणि आम्ही आरामात सिगरेटी पीत होतो. आणि प्रार्थनेचा शेवट होतांना, आम्ही जोराने गोंगाट करत, जिन्याने खाली उतरलो. बरेचजण पुढच्या आठवड्यात पुन्हा फुकट चहा प्यायला यायच्या गोष्टी करत होते.

हे दृष्य माझ्यासाठी रुचीपूर्ण होते. भटक्यांच्या नेहमीच्या वागण्यापेक्षा हे इतके वेगळे होते --- क्षुद्र वळवळणाऱ्या किड्यासारखे, एखाद्या ऋणाईतासारखे, ते मुकाट्याने त्यांच्यावर केलेल्या कृपेचा स्वीकार करत. त्यापेक्षा हे फारच वेगळे होते. अर्थात स्पष्टीकरण असे होते, की आम्ही संख्येने खूप जास्त असल्यामुळे, त्यांना घाबरत नव्हतो. दयेची भीक घेणाऱ्याला सहसा दया करणाऱ्याचा द्वेष वाटतो --- हा मानवी स्वभाव आहे आणि त्याच्यासारखे जेव्हा शंभरजण असतात तेव्हा तो तो द्वेष प्रकट करतो.

संध्याकाळच्या फुकट चहानंतर अर्धवट चमकणाऱ्या ठिकाणी अचानक चोरी करून पॅडीने अठरा पेन्स मिळवले. ते दुसऱ्या दिवशीच्या रहाण्यासाठी पुरेसे होते. ते आम्ही बाजूला ठेवले आणि रात्री नऊपर्यंत उपाशी राहिलो. दिवसभर लांब असणाऱ्या बोझोने कदाचित आम्हाला काही अन्न दिले असते. फुटपाथ ओले होते आणि तो हत्तीचे चित्र असलेल्या राजवाड्याकडे गेला होता. तिथे छत असलेली एक मोठी सपाट जागा असल्याचे त्याला माहिती होते. नशीबाने माझ्याकडे थोडीशी तंबाखू होती. नाहीतर दिवस फार वाईट ठरला असता.

साडेआठला पॅडीने मला नदीशेजारील भिंतीजवळ नेले. तिथे आठवड्यातून एकदा चर्चमधील एक माणूस जेवणाची कुपने वाटत असे. चेरिंग क्रॉस पुलाखाली पन्नास माणसे थांबली होती. रस्त्यावर साठलेल्या हलणाऱ्या पाण्यात त्यांची प्रतिबिंबे पडली होती. त्यांच्यापैकी काहीजण खरोखर धक्कादायक नमुने होते --- ते तिथे झोपणारे होते. बेघरांच्या लॉजपेक्षा ती गवत, चिखल व घाण बाजूला करून केलेली जागा फारच वाईट होती. तेथील एकाने बटणे नसलेला, मोठा कोट घातला होता. त्याला लेस लावलेली होती. चिंध्या झालेली पँट त्याने घातली होती व पाऊलाचा पुढील भाग दिसणारे बूट त्याने घातले होते. फकीरासारखी त्याची दाढी होती. त्याची छाती व खांदे कुठल्यातरी गाडीच्या मशीनच्या तेलाच्या भयंकर काळ्या घाणीने माखले होते. केसांखाली त्याच्या चेहऱ्यावर पांढरे डाग दिसत होते. तो काही भयानक रोग असावा. मी त्याला बोलतांना ऐकले. मोठ्या सुपरमार्केट मधील सुपरवायझरसारखे, त्याचे उच्चार चांगले होते.

आता चर्चचा माणूस आला आणि माणसांनी ते जसे आले, तशी रांग लावली. चर्चचा माणूस चांगला तरुण व गोबऱ्या गालांचा होता. तो

पॅरीसमधील माझा मित्र चार्लीसारखा दिसत होता. तो लाजाळू होता आणि शुभ संध्याकाळ सोडून काही बोलत नव्हता. तो माणसांच्या ओळीतून घाईने फक्त पुढे सरकत होता. प्रत्येकाला कुपन दाखवायची घाई होती. कुणी त्याचे आभार मानण्यासाठी, तो थांबत नव्हता. याचा परिणाम म्हणून, एकदा तिथे निखळ उपकाराची भावना होती आणि प्रत्येकजण म्हणत होता, की तो चर्चचा माणूस फार चांगला माणूस होता. कोणीतरी [मला वाटते, कोणाचे तरी ऐकून] ओरडला, "ठीक आहे, पण तो कधीच --- धर्मगुरू होणार नाही. हे अर्थात सद्भावनेने म्हटले गेले.

ती कूपन्स सहा पेन्स किमतीची होती आणि ती तेथून फार लांब नसलेल्या खाद्यपदार्थगृहाची होती. जेव्हा आम्ही तिथे पोचलो, तेव्हा आम्हाला असे आढळले, की मालकाला माहिती असून, की भटके लोक इतरत्र जाऊ शकणार नाहीत, फक्त चार पेनी किमतीचे अन्न एका कुपनवर देत होता. बहुतेक कॉफीच्या दुकानात सात किंवा आठ पेन्सला मिळणारे अन्न पॅडीला व मला एकत्र कूपन दिल्यावर मिळाले. चर्चच्या माणसाने कूपन्सवर एक पौंड खर्च केला होता आणि मालक भटक्यांना आठवड्याला साधारण सात शिलींगला फसवत होता. असे बळी पडणे, हे भटक्यांच्या आयुष्याचा नेहमीचाच भाग होता आणि लोक जोपर्यंत पैशांऐवजी कूपन्स देणार, तोपर्यंत तो असाच चालू रहाणार.

अजूनही भूक असलेले पॅडी व मी परत बेघरांच्या लॉजमध्ये गेलो. स्वयंपाकघरात फिरलो आणि अन्नाऐवजी शेगडीची उब मिळवली. साडेदहा वाजता, दमलेला भागलेला बोझो आला, कारण त्याचा दुखरा पाय ठणकत होता. त्याला चित्रे काढून काहीच प्राप्ती झाली नव्हती. आडोशाच्या सर्व जागा भरल्या होत्या आणि त्याने एक डोळा पोलिसांवर ठेऊन, खूप तास भीक

मागितली होती, तेव्हा त्याला आठ पेन्स मिळाल्या --- झोपायचे पैसे भरायला एक पेनी कमी होती. दारावरच्या अधिकाऱ्याचे लक्ष नसतांना, तो आत आला. कुठल्याही क्षणी त्याला पकडून बाहेर काढले गेले असते आणि मग त्याला नदीकाठी झोपावे लागले असते. बोझोने त्याच्या खिशातून सामान बाहेर काढले आणि त्यातील काय विकावे अशा दृष्टीने त्याकडे पाहिले. त्याने रेझर विकायचा ठरवून, तो स्वयंपाकघरात नेला आणि काही मिनिटात, तो तीन पेन्सला  विकून, तो त्याच्या झोपायच्या जागेचे पैसे जेमतेम देण्यापुरते मिळवून व चहाचा एक कप भरून घेऊन, अर्धी पेनी उरवून परत आला. तो शेगडीशेजारी चहा घेऊन त्याचे कपडे सुकवायला बसला. तो चहा पित असतांना मी पाहिले, की तो छान विनोद ऐकल्याच्या थाटात स्वतःशी हसत होता. नवल वाटून मी त्याला विचारले, की तो का हसतो आहे.

तो म्हणाला, “हे फारच विनोदी आहे. तुला काय वाटते, मी काय केले असेल?”

“काय?”

“मी माझा रेझर दाढी करण्यापूर्वी विकला. सगळे मूर्ख आहेत.”

त्याने सकाळपासून काही खाल्ले नव्हते. तो दुखरा पाय घेऊन, अनेक मैल चालला होता. त्याचे कपडे ओले झाले होते. त्याच्याकडे फक्त अर्धी पेनी होती. या सगळ्यासह तो रेझर गेल्यावरही हसू शकत होता. त्याचे कौतुक करायलाच हवे होते.

## XXXIV

दुसऱ्या दिवशी सकाळी आमचे पैसे संपत आल्याने, पॅडी आणि मी बेघरांच्या लॉजकडे चालू लागलो. आम्ही जुन्या केंट रस्त्याने दक्षिणेकडून

क्रोमलेवरून, लंडनच्या बेघरांच्या लॉजमध्ये जाऊ शकत नव्हतो. कारण पॅडी तिथे नुकताच राहून आला होता. त्यामुळे परत तिथे जाण्याचा धोका घेऊ शकत नव्हता. ते अस्फाल्टपासून सोळा मैलांवर होते. टाचा झिजवणारे होते. आणि खरे तर आम्हाला भूक लागली होती.

पॅडी सावकाशीने फुटपाथवर काही विकण्यायोग्य वस्तू दिसते का, ते बघत होता. त्याला बेघरांच्या लॉजमध्ये विकण्यासाठी सिगरेटची थोटके सापडली. शेवटी त्याची चिकाटी कामी येऊन, त्याला एक पेनीचे नाणे सापडले. आम्ही एक मोठा शिळा पाव विकत घेतला आणि चालता चालता, तो भरभर खाल्ला.

जेव्हा आम्ही क्रोमलेला पोचलो, तेव्हा बेघरांच्या लॉजमध्ये जाण्या साठी फारच लवकर होत होते. मग आम्ही अनेक मैल पुढे एका कुरणाशेजारील शेतात चालत गेलो. तिथे बसायला जागा होती. ते भटक्यांचे नेहमीचे तात्पुरते निवासस्थान होते. तिथे पडलेल्या गंजके डबे, ओली वर्तमानपत्रे आणि सुकलेल्या गवतावरून ते कळत होते. इतर भटके गटागटाने येत होते. ती सुखावह पानगळतीची हवा होती. तिथे तात्पुरत्या टिकणाऱ्या फुलांचा वाफा उमलला होता. मला वाटत होते, आताही मला भटक्यांच्या नकोशा वासाबरोबर त्या फुलांचा वास येतो आहे.

तिथे इतर पण अनेक रंगीबेरंगी फुले उमललेली होती. घामाने निथळणारे व दमलेले आम्ही तिथे जमिनीवर लोळत होतो. कोणीतरी सुक्या काठ्या शोधून आणल्या व आग पेटवली. टीनचा डबा फिरवण्यात आला. आम्ही सर्वांनी त्यातील दूध विरहीत चहा घेतला.

काही भटके गोष्टी सांगायला लागले. त्यांच्यापैकी एकजण बिल रुचीपूर्ण होता. खराखुरा तब्येतीने ठणठणीत भिकारी होता. ते जुने खोड होते.

तो हर्क्युलीससारखा बळकट होता. मोकळेपणे कामाचा शत्रू होता. तो बढाई मारत होता, की त्याच्या शक्तीनिशी तो कधीही कुठलेही काम मिळवू शकतो. पण त्याला पहिल्या आठवड्याचा पगार मिळाल्याबरोबर तो भयंकर दारू पितो व त्याला नोकरीतून गचांडी मिळते. ‘मधील काळात, मुख्यतः दुकानदारांकडून, तो फुकट काही मिळवायचा प्रयत्न करतो.’ तो असे बोलतोः

“मी केन्टमध्ये फार पुढे गेलो नव्हतो --- केन्ट हा संकुचित मानसिकतेचा देश आहे. तिथे फारच हट्टी मुले आहेत. तेथील बेकरीवाले पाव फेकून देत. तो आम्हाला मिळे. तर आता ऑक्सफर्ड! ती तर भीक मागायची जागाच आहे. मी तिथे असतांना पाव, डुकराचे मास व गाईचे मास भीक मागून, फुकट मिळवले. रोज रात्री विद्यार्थ्यांकडे मी माझ्या झोपेसाठी अंथरूणदेखील मागितले. मागील रात्री माझ्या रात्रीच्या आश्रयासाठी माझ्याकडे दोन पेन्स कमी होते. म्हणून मी चर्चच्या माणसाकडे गेलो व त्याने मला तीन पेनी दिल्या आणि दुसऱ्याच क्षणी वळून, मला भीक मागितल्याबद्दल पकडले. तो म्हणाला, “तू भीक मागत होतास. मी म्हणालो, “नाही. मी भीक मागत नव्हतो. मी त्या सभ्य माणसाला वेळ विचारत होतो.” त्याने माझ्या कोटाच्या आत हात घालून पौंडभर मास व पावाचे दोन तुकडे काढले. ”मग हे काय आहे? पोलीस स्टेशनवर चल.” मला सात दिवसाची कस्टडी दिली. आता मी कधीही चर्चच्या माणसाकडे भीक मागत नाही. ख्रिस्ता रे! पण सात दिवसांच्या कस्टडीला मी घाबरतो की काय?” इत्यादी इत्यादी.

असे दिसत होते, की त्याचे सगळे आयुष्य असेच फुकट गोष्टी मिळवण्यात, पिण्यात आणि आराम करण्यात गेलेले होते. हे सांगतांना हा मोठा विनोद असल्यासारखे, तो हसे. त्याने भीक मागून जणू काही गरीब गोष्टी

मिळवल्यासारखे तो हसे, टिकाऊ सुती कोट, मफलर, व टोपी --- मोजे नाही. तरी तो जाडा व आनंदी होता. हल्ली भटक्यांच्या बाबतीत सहसा न येणारा बिअरचा वास त्याला येत असे.

दोन भटके नुकतेच क्रोमलेच्या भटक्यांच्या लॉजमध्ये राहून आले होते. त्यांनी त्यासंबंधी एक भुताची गोष्ट सांगितली. खूप वर्षांपूर्वी, ते म्हणत की एक आत्महत्या झाली होती. एका भटक्याने रेझरने गळा चिरून घेतला होता. सकाळी जेव्हा भटक्यांचा प्रमुख आला, तेव्हा प्रेत दारामागे अडकले होते. दार उघडण्यासाठी मृत मनुष्याचा हात कापावा लागला. याचा सूड म्हणून, त्या मेलेल्या माणसाने ते घर शापित केले. तिथे जो कुणी झोपेल, तो वर्षाच्या आत मरायची खात्री होती. अर्थात असे खूप प्रसंग घडले. जर तुम्ही दार उघडायचा प्रयत्न केलात, आणि ते अडकून बसले, तर तुम्ही ती खोली प्लेग झाल्यासारखी सोडली पाहिजे, कारण ती झपाटलेली होती. दोन निवृत्त खलाशांनी दुसरी उबग येईल अशी गोष्ट सांगितली. एका मनुष्याने [ते शपथेवर सांगत होते, की तो त्यांच्या माहितीतला होता.] चिलीला जाणाऱ्या बोटीवर चढायचे ठरवले. त्यात मोठ्या लाकडी पेटाऱ्यात माल भरलेला होता. माल ठेवणाऱ्या हमालाच्या मदतीने त्याने त्यापैकी एका पेटाऱ्यात स्वतःला लपवले. पण त्याहमालाने पेटारे ठेवण्याच्या क्रमात चूक करून, तो माणूस असलेला पेटारा खूप खाली शेकडो पेटाऱ्यात ठेवला. प्रवासाच्या शेवटपर्यंत, काय झाले ते कुणालाच कळले नाही. घाण वास सुटल्याने, तो माणूस गुदमरून मेल्याचे समजले.

अजून एका भटक्याने ‘सोनेरी राजा’ असा अर्थ असलेल्या एका मुलाची, गिल्डेरॉयची गोष्ट सांगितली. गिल्डेरॉय नावाच्या माणसाला लंडन आणि पॅरीसमधून हद्दपार करण्यात आले. त्याने त्याला शिक्षा देणाऱ्या

जज्जला गाठून, फाशी दिले आणि सटकला. भटक्यांना ही गोष्ट अर्थात आवडली. पण रुचीपूर्ण बाब म्हणजे ती चुकीची होती. ती अशी होती, की गिल्डेरॉय अमेरिकेला पळून गेला. पण तसे नव्हते. त्याला परत पकडून, मारण्यात आले. मुले जशी सॅमसन आणि रॉबिन हूडच्या गोष्टी काल्पनिकतेने बदलून त्या सुखांत करतात, तशी ही गोष्ट मुद्दाम सुधारण्यात आली. हा गोष्टीवेल्हाळ भटक्यांचा गट मागील गोष्टी बोलत असतांना, एक खूप म्हाताऱ्या माणसाने जाहीर केले, की 'एका चाव्याचा नियम' हा उमराव लोक हरणाऐवजी माणसांची शिकार करायचे त्या दिवसात बचावासाठी अस्तित्वात आला. काहीजण त्याला हसले, पण त्याच्या डोक्यात ती कल्पना पक्की बसली होती. त्याने कॉर्न कायद्याबद्दल [देशी शेतकऱ्यांना  वाचवण्यासाठी, धान्य विकणाऱ्यांना परदेशी शेतकऱ्यांना जादा कर भरायला लावायचा कायदा] ऐकले होते.

PRIMAE NOCTIS [राजा व उमरावांना त्यांच्या राज्यातील कोणत्याही स्त्रीशी त्या रात्रीपुरती लैगिक संबंध ठेवायची मुभा होती.] ती अजूनही चालू असल्याचे ऐकीवात होते. याबद्दल गरिबांच्या मनात श्रीमंतांच्या विरुद्ध बंड करायचे होते. कदाचित ते शेतकऱ्यांच्या बंडाबरोबर एकत्र केले गेले असावे.

मला शंका होती, की त्या म्हाताऱ्याला वाचता येते की नाही

आणि तो नक्कीच वर्तमानपत्रातील स्फुट वाचून परत सांगत नव्हता. त्याचे इतिहासातील दाखले भटक्यांमधील पिढ्यानपिढ्या चालत आलेले होते. काही ठिकाणी शतकानुशतके --- मध्ययुगीन काळातील अस्पष्ट प्रतिध्वनीप्रमाणे, ती मौखिक परंपरा अजून सुरु होती.

पॅडी व मी संध्याकाळी सहा वाजता बेघरांच्या लॉजमध्ये गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी दहाला तेथून बाहेर पडलो. ते बरेचसे रोमटॉन व एडबरीसारखेच होते आणि आम्हाला भूत वगैरे काही दिसले नाही. विलियम आणि फ्रेड नावाचे दोन पूर्वी कोळी असलेले तरुण त्यात होते. ते उत्साही असून गाण्याची आवड असणारे होते. त्यांचे 'दुःखी बेला' नावाचे एक गाणे होते. ते पुढील दोन दिवसात मी निदान डझनभर वेळा ऐकले. त्यामुळे माझे ते एक दोन ओळी सोडून, पाठ झाले. ते असे होतेः

बेला तरुण व सुंदर होती. तिचे डोळे तेजस्वी, निळे होते. तिचे केस सोनेरी होते.

पण ती दुःखी होती. तिची पाऊले हलकी होती. तिचे हृदय आनंदी होते.

पण तिला जाणीव नव्हती. एक दिवस ती एका हृदयशून्य, फसव्या, दुष्ट माणसामुळे एका कुटुंबाच्या हातात पडली. बिचारी बेला तरुण होती. तिचा विश्वास नव्हता की जग कठीण असून माणसे फसवी आहेत. ओहो, दुःखी बेला!

ती म्हणाली, माझा माणूस योग्य तेच करेल. तो आता नक्कीच माझ्याशी लग्न करेल. तिचे हृदय फसव्या, हृदयशून्य, दुष्ट माणसाच्या प्रेमाने व विश्वासाने भरले गेले होते. ती त्याच्या घरी गेली.

त्या घाणेरड्या, वाईट वास येणाऱ्या माणसाने त्याच्या बॅगा भरल्या आणि पळून गेला. बिचारी बेला! तिची घरमालकीण म्हणाली, "अग सटवे, बाहेर हो. तुझ्यासारख्या बाईने माझे दार काळे करायला नको."

बिचारी बेला! हृदयशून्य, फसव्या, दुष्ट माणसाने बिचाऱ्या बेलाला दुःख दिले.

रात्रभर ती बर्फाळ रस्त्याने भटकत राहिली. तिला किती त्रास झाला, ते कुणालाच समजले नाही.

ओहो, बिचारी बेला!

जेव्हा तांबडे फुटले, तेव्हा बिचारी बेला मरून पडली.

त्या हृदयशून्य, फसव्या, दुष्ट माणसाने त्या तरुण बेलाला एकाकी मरणशय्येवर पाठवून दिले.

तेव्हा तुम्ही समजून घ्या, तुम्ही काही केले तरी पापाची फळे तुम्हाला भोगावीच लागतात.

ओहो, बिचारी बेला!

स्मशानात तिला खाली ठेवले आणि माणसे म्हणाली, “अरेरे! आयुष्य असेच असते.”

पण स्त्रिया हळूवारपणे म्हणाल्या, “हे सगळे पुरुष असेच घाणेरडे आणि वाईट!

ही कविता कदाचित एका बाईने लिहिली असावी.

हे गाणे म्हणणारे विलियम आणि फ्रेड खोड्या काढणाऱ्या मुलासारखे होते. भटक्या लोकांच्या नावाला धब्बा होते. त्यांना माहिती होते, की क्रोमले येथील बेघरांच्या लॉजमध्ये विकायचे भरपूर जुने कपडे व इतर वस्तू आहेत. त्या दोघांनी लॉजमध्ये जाण्यापूर्वी, बूट काढले. सोल काढून ते फाडून त्याचे तुकडेतुकडे केले. नंतर त्यांनी बुटांच्या दोन जोड्यांसाठी मागणी नोंदवली. त्यांचे अतिशय खराब बूट बघून, त्यांना जवळजवळ नवीन बुटांच्या जोड्या दिल्या गेल्या. सकाळी ते लॉजमधून बाहेर जात नसत, पण त्या दिवशी गेले व

एक शिलिंग नऊ पेन्सना ते बूट विकून आले. हा व्यवहार त्यांना योग्य वाटला. त्यासाठी त्यांचे बूट न घालण्याजोगे करणे, त्याना योग्य वाटले.

लॉजमधून बाहेर पडून आम्ही सगळे दक्षिणेकडे चालू लागलो. ती बिन्फिल्ड व इडे टेकडीकडे जाणारी लांब मिरवणूक होती. वाटेत दोन भटक्यांची मारामारी झाली. ते रात्रभर भांडत होते. [त्यांच्यापैकी एकजण दुसऱ्याला गाढव म्हणाला. तो भयंकर अपमान समजून,] ते भांडत सुटले. ते माझ्या मनात एका कारणाने घर करून बसले. ज्याला मारले गेले तो मनुष्य खाली पडला. त्याची टोपी निघाली व आतील पांढरे केस उघडे पडले. त्यानंतर आमच्यापैकी काहीजण मध्ये पडले व त्यांनी मारामारी थांबवली. पॅडी त्याबद्दल चौकशी करत होता आणि त्याला असे आढळले, की नेहमीप्रमाणे त्याचे खरे कारण काही पेनीचे अन्न असे होते.

आम्ही बिन्फिल्डला लवकर पोचलो. पॅडीने वेळ घालवण्यासाठी मागील दाराने कामासाठी चौकशी करायला सुरवात केली. एका घरी त्याला जळणासाठी पेटीभर लाकडे फोडायला देण्यात आली. बाहेर त्याचा एक मित्र आहे असे सांगत, त्याने मला आत नेले व आम्ही दोघांनी मिळून ते काम केले. जेव्हा ते करून झाले, तेव्हा मालकाने त्याच्या नोकराणीला आम्हाला कपभर चहा देण्यास सांगितले. तिने तो ज्या भयानक पद्धतीने बाहेर आणला, ते मला अजून आठवते. मग तिचा धीर गळून पडला आणि तिने ते कप जमिनीवर ठेवले व घरात निघून गेली. स्वयंपाकघरात स्वतःला कोंडून घेतले. भटक्यांचे नाव इतके वाईट आहे. त्यांनी आम्हाला प्रत्येकाला सहा पेन्स दिल्या आम्ही त्यातून व अर्धा औंस तंबाखू आणली व पाच पेन्स शिल्लक ठेवले. पाच पेनी पुरून ठेवणे पॅडीला शहाणपणाचे वाटले. कारण बिन्फिल्डचा मुख्य दुष्ट असल्याचे आम्ही ऐकून होतो. आमच्याकडे पैसे असलेले त्याला

दिसले असते, तर त्याने आम्हाला तिथे आत घ्यायला नकार दिला असता. भटके लोक नेहमी त्यांचे पैसे असे पुरून ठेवत असत.

जर भटक्यांकडे बरेच पैसे सापडले, तर ते ते पैसे अंगावरील कपड्यात शिवून टाकत. जर ते सापडलेच तर त्याना अर्थात तुरुंगवास होई. पॅडी आणि बोझो याबद्दल एक छान गोष्ट सांगत. एक भटक्या नसलेला व जवळ तीस पौंड असलेला आयरिश माणूस [ बोझो आयरिश म्हणाला आणि पॅडी इंग्लिश म्हणाला.] एका लहानशा गावात उभा होता. त्याला झोपायला कुठे जागा मिळेना. त्याने एका भटक्याला विचारले. त्याने त्याला कामाच्या घरी [workhouse] जाण्याचा सल्ला दिला. जर कुठे झोपायची सोय होत नसेल, तर काही पैसे भरून त्या ठिकाणी लोक नेहमी जात असत. पण त्या आयरिश माणसाने फुकट ही गोष्ट मिळवायचा विचार केला. त्यामुळे तो तिथे गेला. त्याने तीस पौंड त्याच्या कपड्याला शिवून टाकले होते. मधल्या काळात त्याला इथे येण्याचा सल्ला देणाऱ्या भटक्याने त्याला संधी असलेली पाहिली. एक काम मिळवण्यासाठी लवकर जायचे आहे अशी थाप मारून त्याने लॉजच्या अधिकाऱ्याची परवानगी काढून ठेवली. दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता तो त्या आयरिश माणसाचे कपडे घालून बाहेर पडला. आयरिश माणसाने चोरीची तक्रार केली आणि त्याला ढोंग करून, महिनाभर साध्या खोलीत रहायची परवानगी मिळाली.

## XXXV

बिन्फिल्डला आम्ही पोचल्यावर खूप वेळ हिरवळीवर रेंगाळत राहिलो. त्यांच्या पुढच्या दारातील खोल्यांमधून आमच्यावर लक्ष ठेवण्यात येत होते.

चर्चमध्ये काम करणारा एक माणूस व त्याची मुलगी आले आणि आम्ही जसे काही मत्स्यालयातील मासे असल्यासारखे, गुपचूप काही वेळ आमच्याकडे निरखून पहात बसले व मग निघून गेले. आमच्यासारखे डझनावारी लोक थांबलेले होते. तिथे अजूनही गाणारे विलियम आणि फ्रेड होते. भांडणारे दोघे होते. दुसऱ्याच्या दानशूरपणाचा फायदा घेणारा बिल होता. तो बेकरीवाल्याला लुटत होता. शिळा पाव त्याच्या कोटाच्या आत लपवत होता. त्याने तो वाटला आणि आम्ही सर्वजण आनंदित झालो. आमच्यात एक बाई होती. मी पहिलीच भटकी बाई पाहिली. ती जाड व खराब झालेली असून फार घाणेरडी दिसत होती. ती साठीची असून, तिने लांब काळा स्कर्ट घातला होता. ती फार भापत होती. जर कुणी तिच्याजवळ बसले, तर ती नाक शिंकरुन बाजूला सरके. एका भटक्याने तिला विचारले, "बाईजी आपण कुठून आलात?

ती म्हणाली, "आनंदी रहा आपण सगळे सगळे सहप्रवासी आहोत. आभारी आहे. मला जेव्हा सगळया भटक्या लोकांमध्ये मिसळायचे असेल, तेव्हा मी तुम्हाला सांगेन."

ती ज्या तऱ्हेने भटके म्हणाली, ते मला आवडले. अनेक वर्षे रस्त्यावर काढूनही काही न शिकलेला एक लहानसा, कमी समज असलेला, बायकी माणूस तिच्याशी बोलत होता. ती नक्कीच कुणा माननीय माणसाची विधवा होती. काही अपघातामुळे ती कुरूप, भणंग, भटकी झाली असावी.

भटक्यांचे लॉज सहाला उघडले. आज शनिवार होता का ते मला माहिती नाही, पण नेहमीप्रमाणे रविवारचा काही दुमत असलेला फायदा घेण्याची पुसटशी भावना होती. जेव्हा आम्ही तिथे आमचे नाव सांगितले, तेव्हा मी माझा व्यवसाय पत्रकाराचा असल्याचे सांगितले. रंग देणारा असे

सांगण्यापेक्षा, ते खरे होते. कारण मी काही वेळा वर्तमानपत्रात लेख लिहून पैसे मिळवले होते. पण असे सांगणे मूर्खपणाचे होते, कारण कोणी काही प्रश्न विचारले असते, तर मला उत्तर देता आले नसते. आम्ही आत शिरल्याबरोबर ओळ करून तेथील अधिकाऱ्याकडून होणाऱ्या तपासणीसाठी उभे राहिलो. माझे नाव पुकारले गेले.

तो साधारण चाळीशीचा, कडक सैनिकासारखा, खर्जातल्या

आवाजाचा माणूस होता. पण त्रासदायक वाटत नव्हता. तो कडकपणे बोलला, "तुमच्यापैकी कोण --- आहे? [मी माझे काय नाव लिहिले होते, ते विसरलो होतो.] मी, सर."

"म्हणजे तू पत्रकार आहेत तर?"

मी सोंग करत बोललो, "हो, सर."

काही प्रश्न विचारून माझे बिंग फुटले, तर मला तुरुंगवास अटळ होता. पण त्या अधिकाऱ्याने माझ्याकडे फक्त वरपासून खालपर्यंत पाहिले आणि म्हणाला, "म्हणजे तू सभ्य माणूस आहेस?"

"मला असे वाटते."

परत बराच वेळ त्याने माझ्याकडे पाहिले. "हे दुर्दैव आहे. फारच दुर्दैव आहे. त्यानंतर त्याने मला नको इतक्या प्रेमाने व वेगळेपणे वागवले. त्याने माझी तपासणी केली नाही. बाथरूममध्ये त्याने मला स्वच्छ टॉवेल दिला --- कधी न ऐकलेली चैन! सभ्य माणूस हा शब्द इतका शक्तिशाली आहे.

हे काही भलतेच होत होते.

सात वाजता आम्हाला चहा आणि पाव मिळाला. आम्ही तो अधाशीपणे खाऊन आपापल्या खोलीत गेलो. तिथे पलंगांच्या चौकटी होत्या

आणि चटया होत्या, जेणेकरून प्रत्येकाला छान झोप लागावी. पण कुठलेच बेघरांचे लॉज परिपूर्ण असत नाही आणि बिन्फिल्डच्या लॉजमधील हवा फार गार होती. गरम हवेच्या झोताचे पाइप बंद होते. आम्हाला देण्यात आलेले दोन रग पातळ सुती होते. त्याचा काही उपयोग नव्हता. आता फक्त पानगळीचा ऋतु होता. पण प्रचंड थंडी होती. सगळे या कुशीवरून त्या कुशीवर वळत लांब बारा तासांची रात्र काढत असत. काही मिनिटे झोपत आणि कुडकुडत उठत. तुम्ही सिगरेट ओढू शकत नव्हता, कारण आमच्याजवळील चोरलेली तंबाखू आमच्या कपड्यात होती आणि कपडे तर आम्हाला सकाळपर्यंत मिळणार नव्हते.

खालून सुस्कारे व उसासे टाकल्याचे आणि शेतकऱ्यांना काही वेळा ओरडून त्यांनी शपथा घेतल्याचे, आवाज येत होते. मला वाटते, कोणालाच एक दोन तासांपेक्षा जास्त झोप मिळाली नसावी.

सकाळी न्याहारीनंतर, डॉक्टरांनी आमची तपासणी केली. तेथील अधिकाऱ्याने आम्हाला जेवायच्या खोलीत जमवले आणि दार कुलुपबंद केले. तिथे दगडांची जमीन होती. अंधार होता आणि गार होते. तिथे बाके होती आणि तुरुंगासारखा वास येत होता. गजवाल्या खिडक्या खूप उंच होत्या. तिथे एक घड्याळ सोडून काहीही वस्तू नव्हत्या. फक्त नियमावली लावलेली होती.

जरी फक्त सकाळचे आठ वाजले असले तरी, अंगाला अंग खेटून आम्ही आधीच कंटाळलो होतो. करण्यासारखे, बोलण्यासारखे काहीच नव्हते. हलायलाही जागा नव्हती. दिलासा एवढाच होता, की सिगरेट ओढायला बंदी नव्हती. घाणेरडे उच्चार असलेला, छोटासा केसाळ भटक्या, स्कॉटीचा सिगरेटच्या थोटकांचा डबा त्याच्या बुटातून बाहेर पडून सांडला

होता आणि तो शोधतांना, ग्लासगो येथील त्याच्या पूर्वजांच्या त्याला मिळालेल्या वारशाने तो फुकट गेला होता. त्याला सिगरेटचे व्यसन असूनही त्याला त्यावर संयम ठेवायला मी सांगितले. आम्ही ती चोरून ओढत असू. जेव्हा आम्ही लॉजच्या अधिकाऱ्याला येतांना पाहत असू, तेव्हा शाळेतील मुलांसारख्या त्या आमच्या खिशात कोंबत असू. बहुतेक भटके या बिन आरामाच्या, वाईट खोलीत दहा तास काढत. ते हे कसे काय जमवत, कोणास ठाऊक! मी इतरांपेक्षा नशीबवान होतो. कारण तेथील अधिकाऱ्याने काहीजणांना काही नको ते केल्यामुळे बाहेर काढले. त्याने मला स्वयंपाकघरात काम करायला सांगितले. जसा त्याने मला स्वच्छ टॉवेल दिला तसेच, हे सर्वात चांगले काम दिले.

स्वयंपाकघरात करायला काही काम नव्हते. मी बटाटे साठवण्याच्या ठिकाणी एका लहानशा निवाऱ्याखाली हळूच गेलो. रविवार सकाळची प्रार्थना चुकवण्यासाठी तेथील काही गरीब लोकदेखील तिथे लपतछपत आले होते. तिथे बसायला सामान भरलेली आरामशीर खोकी होती. ते लोक तेथील आयुष्याबद्दल बोलत होते. त्यांनी मला दुसऱ्या गोष्टीही सांगितल्या, जसे की ज्याबद्दल तिथे खरोखर द्वेष होता. गोरगरिबांना दाखवण्यात येणाऱ्या दयेची चीड, त्यांना घालावा लागणारा गणवेष. जर माणसांना त्यांचे स्वतःचे कपडे घालता आले, किंवा निदान टोप्या आणि मफलर तरी घालता आले, तरी त्यांना ते ऋणाईत असल्यासारखे वाटले नसते. मला तेथील टेबलावर जेवण मिळाले आणि ते अजगरासाठी योग्य होते --- भले मोठे जेवण! असे मी x हॉटलमध्ये काम करतांना पहिल्या दिवशी खाल्ले होते. ते लोक म्हणाले की ते रविवारी पोटाला तडस लागेपर्यंत जेऊन घेतात. कारण नंतर आठवडाभर त्याना जेमतेम खायला मिळत असे. जेवणानंतर स्वयंपाक्याने मला उरलेले अन्न फेकून द्यायला सांगितले. ते आश्चर्यकारक होते. ही भयंकर दुःखद

परिस्थिती होती. अर्धवट खाल्लेले मासाचे तुकडे आणि बादल्या भरून, तुटका पाव व भाज्या, असे खूपसे खरकटे, व केलेल्या चहाची पत्ती. पाच केराचे मोठे डबे गच्च भरले. त्यात काही खाण्यासारखे अन्नही होते. मी हे करत असतांना त्यांचे पोट पाव आणि चीजने अर्धवट भरलेले पन्नास भटके तिथे बसलेले होते. कदाचित रविवार म्हणून त्यांना दोन उकडलेले बटाटे देण्यात आले. त्यामुळे ते आनंदित झाले. तेथील लोकांच्या म्हणण्याप्रमाणे, उरलेले अन्न भटक्यांना न देता, असे मुद्दाम केले जाते. तीन वाजता मी परत लॉजवर गेलो. तिथे आठपासून भटके बसलेले होते. भयंकर गर्दी झाली होती. ते करायला काही नसल्याने अर्धवट वेडे झाले होते. तंबाखूही ओढता येत नव्हती. भटक्यांची तंबाखू म्हणजे सिगरेटची थोटके. ते फुटपाथपासून काही तास दूर असतील, तर ते अस्वस्थ होतात. लोक इतके कंटाळले होते, की ते बोलतही नव्हते. ते बाकावर नुसते दाटीवाटी करून शून्यात नजर लाऊन बसले होते. त्यांचे पडलेले चेहरे सतत जांभया देत होते. सगळीकडे असमाधान भरून राहिले होते. कडक बाकावर बसून, पॅडीची पाठ भरून आली. तो तक्रारीच्या मनस्थितीत होता. वेळ घालवण्यासाठी मी एका चांगल्या भटक्याशी बोलणे सुरु केले. तो तरुण सुतार होता. त्याने कॉलर व टाय घातला होता. त्याच्याकडे साधने/ हत्यारे नसल्यामुळे त्याला काही काम करता येत नव्हते. तो इतर भटक्यांपासून थोडा अलग होता. तो स्वतःला स्वतंत्र माणूस समजत होता. त्याला साहित्यरुची सुद्धा होती. त्याच्या खिशात वॉल्टर स्कॉटची ऐतिहासिक कादंबरी होती. तो मला म्हणाला, की तो भुकेने बेजार झाल्याशिवाय कधीच बेकारांच्या लॉजमध्ये जात नाही. तो पिकाच्या ढिगाऱ्याजवळील कुंपणाशी झोपणे पसंत करे. दक्षिण किनाऱ्याशी तो दिवसभर भीक मागे आणि अनेक आठवडे झोपड्यांसारख्या बाथरुममध्ये झोपे. आम्ही रस्त्यावरील आयुष्यावर बोललो. भटक्याला चौदा तास रहाव्या

लागणाऱ्या बेकारांच्या लॉजवर, उरलेले दहा तास चालावे लागण्यावर व पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यावर त्याने तोंडसुख घेतले. तो स्वतःबद्दलच बोलला --- सुतारकामाची हत्यारे खरेदी करण्यासाठी, काही पौंडांची गरज असल्यामुळे चोरी केल्याबद्दल त्याला तुरुंगवास झाला होता. तो म्हणाला तो वेडेपणा होता.

मग मी त्याला अन्न फेकून दिल्याचे सांगितल्यावर मला काय वाटले, ते मी सांगितले. तेव्हा त्याचा आवाज एकदम बदलला. मी पाहिले, की प्रत्येक इंग्लिश कामगारात असणारी चर्चमध्ये बसण्याची उर्मी मी जागी केली. तो बोलला, "त्यांना ते करावे लागते. जर त्यांनी या जागा फार आरामशीर केल्या, तर देशातील सर्व भटके इथे येण्यासाठी धडपडतील. येथील वाईट अन्नामुळे इथे जास्त गर्दी होत नाही. इथे येणारे भटके फार आळशी असतात. एवढाच दुर्गुण त्यांच्यात असतो. त्याना भटक्यांना उत्तेजन द्यायचे नसते. ते कवडी किमतीचे असतात. मी तो चूक असल्याचे सिद्ध करण्यासाठी वाद घालू लागलो. पण तो काही ऐकेना. तो तेच परत बोलत राहिला, "तुम्ही या भटक्यांना काही दया दाखवायला नको --- ते नालायक असतात. आपल्यासारख्या माणसांच्या बाबतीतील मोजपट्ट्या त्याला लाऊ नका. ते नालायक असतात. फारच नालायक असतात." तो इतर भटक्यांपासून स्वतःला ज्या प्रकारे वेगळे काढत होता, ते बघणे रुचीपूर्ण होते. तो गेले सहा महिने कामाशिवाय होता. पण देवाला बघितल्यावर तो स्वतःला भटक्या समजत नव्हता. माझ्या कल्पनेप्रमाणे खूप भटके देवाचे आभार मानून, स्वतःला भटके समजत नाहीत. ते प्रवासी असतात.

असे तीन तास गेले. सहा वाजता रात्रीचे जेवण आले. ते अगदी अजिबात खाण्याजोगे नव्हते. कडक पाव [तो शनिवारी रात्री कापून ठेवला

होता.] भाजलेल्या मासातून चरबी ओघळत होती. आम्ही ती काढून टाकली व तो नुसता खाल्ला. काहीच न खाण्यापेक्षा, ते बरे होते. पावणेसातला आम्हाला झोपायला पाठवण्यात आले. नवीन भटके येत होते. त्यांच्यात न मिसळण्यासाठी [संसर्गाच्या भीतीने] नवीन लोकांना खोल्यांमध्ये ठेवण्यात आले आणि आम्हाला मोठ्या हॉलमध्ये. त्यात जवळजवळ चिकटून तीस पलंग होते आणि एक सामाईक नळी मूत्रविसर्जनासाठी होती. ती उबग आणणारी होती. म्हातारे लोक रात्रभर थुकण्यासाठी उठत होते. पण हॉल गच्च भरलेला असल्याने तिथे उबदार होते आणि त्यामुळे आम्हाला थोडी तरी झोप मिळाली.

सकाळी दहा वाजता, वैद्यकीय तपासणीनंतर आम्ही दुपारच्या जेवणासाठी, मोठा पाव व चीज घेऊन बाहेर पडलो. विलियम आणि फ्रेड यांच्याकडे पुरेसे शिलिंग असल्याने, ते निषेध म्हणून, त्यांचा पाव लॉजच्या कुंपणावर टोचून ठेऊन गेले, असे ते म्हणाले. हे केंटमधील दुसरे बेघरांचे लॉज होते. तिथे रहायला, ते फार गरम होते, असे ते म्हणाले. त्याना तो मोठा विनोद वाटला. भटक्यांसाठी ते आनंदी प्राणी होते. तो मूर्ख [भटक्यांच्या प्रत्येक गटात एक तरी मूर्ख असतोच.] म्हणाला की तो चालण्यासाठी फारच दमला होता व लॉजच्या अधिकाऱ्याने येऊन त्याला हुसकून लाथ मारेपर्यंत तो कुंपणाला टेकून उभा राहिला. पॅडी आणि मी लंडनला जाण्यासाठी, उत्तरेला वळलो. बरेचजण इडे टेकडीकडे निघाले होते. तिथे इंग्लंडमधील सर्वात वाईट बेघरांचे लॉज होते.

[ मी तिथे होतो आणि ते इतके काही वाईट नव्हते.]

परत एकदा पानगळतीची मस्त आनंदी हवा पडली होती. फक्त काही गाड्या जाणारा रस्ता शांत होता. बेघरांच्या लॉजशी तुलना करता, हवा गोड

गुलाबासारखी होती. लॉजमध्ये घाम, साबण व मूत्राचा दर्प भरून राहिला होता. रस्त्यावर बहुधा आम्ही दोघेच भटके होतो. मग मला आमच्यामागे कुणी घाईघाईने पाऊले टाकत येत असल्यासारखे व हाका मारत असल्यासारखे वाटले. तो लहानसा स्कॉटी होता. ग्लासगोचा भटक्या. तो धापा टाकत आमच्यामागे येत होता. त्याने खिशातून एक गंजका डबा काढला. कायदेशीरपणे काही परत करत असल्यासारखा तो मित्रत्वाने हसला व नम्रपणे म्हणाला, "अरे मित्रानो, मी तुम्हाला सिगरेटची काही थोटके देणे लागतो. तुम्ही काल मला ती ओढतांना सहन केलेत.

आपण आज लॉजमधून बाहेर पडलो, तेव्हा तेथील अधिकाऱ्याने मला माझा हा डबा परत केला. एकजण चांगले वागला म्हणून मीही तुम्हाला हे देतो आहे."

त्याने चार अर्धवट जळलेली, बेकार थोटके कशीबशी आमच्या हातात ठेवली.

## XXXVI

मला भटक्यांबद्दलची काही सर्वसामान्य मते नोंदवायची आहेत. जेव्हा एखादा यावर विचार करू लागतो, तेव्हा भटके हे एक विचित्र प्राणी असल्याचे व त्यांच्यावर विचार करणे योग्य असल्याचे लक्षात येते. ही माणसाची विचित्र जात संख्येने लाखभर तरी असावी. भटक्या ज्यू लोकांसारखेच ते इंग्लंडमध्ये इतस्ततः फिरत असतात. पण काही पूर्वग्रह बाजूला ठेवल्याशिवाय असा विचार करणे शक्य नाही. प्रत्येक भटक्या हा शिवीगाळी करणारा, चढेल, हलकी कामे करणारा माणूस आहे, ही समजूत बाजूला ठेवणे गरजेचे आहे. आपल्याला लहानपणी शिकवले जाते, की ते

तसे आहेत. धोकादायक आहेत. त्यांच्या पासून जपून रहा. ते अस्वच्छ असतात. काम करत नाहीत. भीक मागतात. दारू पितात व किरकोळ चोऱ्या करतात. पूर्व आशियातील किंवा चीनमधील मासिकात आपण गोष्टी वाचतो, तसले ते पापी लोक आहेत. पण त्यांना टाळणे कठीण आहे. भटक्या हा शब्द उच्चारल्याबरोबर, असेच चित्र डोळयांसमोर येते. पण तो असा का झाला, हे समजून घेणे अवघड आहे.

मुळात असे लोक अस्तित्वात का असतात? त्यांची काळी प्रतिमा मनात धरून, यासाठी वेगवेगळी नवलपूर्ण उत्तरे सुचवली जातात. उदाहरणार्थ, काम टाळण्यासाठी, सहज भीक मागता यावी म्हणून, चोरीसाठी संधी मिळावी म्हणून किंवा त्यांना भटकायला आवडते म्हणून, ते भटकत बसतात. मी गुन्हेगारशास्त्राच्या पुस्तकात असेही वाचले की आदिमानव जसा भटकून आपला उदरनिर्वाह करत असे तशी मानवातील उर्मि ‘जग गोल आहे’ या न्यायाने पुन्हा एकदा डोके वर काढते आहे. अर्थात भटक्या हा काही आदिमानवाचा नवा अवतार नाही. व्यापारासाठी हिंडणारा कदाचित तसा असू शकेल. त्याला भटकायला आवडते, म्हणून काही भटक्या भटकत नाही. पण मोटार डावीकडून चालते कारण तसा नियम आहे. पण भटक्याकडे जगण्यासाठी पैशाचे म्हणा, कुटुंबाचे म्हणा, जमिनीच्या तुकड्याचे म्हणा किंवा काम करण्याच्या सुदृढतेचे म्हणा पाठबळ असत नाही. त्यामुळे तो लॉजमध्ये आसरा शोधतो. पण तिथे एक दिवसापेक्षा जास्त राहू देत नाहीत, म्हणून मग भटकत वेगवेगळी बेघरांची लॉजेस शोधत हिंडतो.

कायद्याप्रमाणे त्याला भटकावेच लागते. नाहीतर तो उपाशी मरेल. पण लोकांचा असा समज आहे की काही दुष्ट हेतू मनात बाळगून, ते भटकतात. हा गैरसमज दूर करण्यासाठी, थोडा अभ्यास होणे गरजेचे आहे.

खरे तर भटके काही भयंकर नसतात. ते तसे असते, तर त्यांना तशीच वागणूक मिळाली असती. पण लॉजमध्ये एक रात्र रहाणाऱ्या शंभर भटक्यांना दोन/तीन माणसे सांभाळू शकतात, त्याअर्थी ते धोकादायक नसतात. उलट ते मोडून पडलेले व मवाळ असतात म्हणूनच लॉजमधील अधिकाऱ्यांचे मुकाट्याने ऐकतात. ते दारूबाज असतात, हादेखील असाच एक गैरसमज आहे. त्याना संधी मिळाली, तर ते पितात. पण इंग्लडमध्ये बिअरचे भाव बघता, त्यांना ती परवडणे शक्यच नसते. ते कफल्लक असतात. ते आगाऊ आणि बेपर्वा असतात असे म्हणण्यालादेखील काही अर्थ नाही. ते समाजाला चिकटलेले बांडगुळ आहे, हेदेखील असेच एक बिनबुडाचे विधान आहे. काही बाबतीत हे खरे असेलही, पण आपण जॅक लँडॉनच्या अमेरिकन भटक्यांवरील पुस्तकात वाचतो, तसे इंग्लंडमध्ये नाही. गरिबीतील तथाकथित पापाची जाणीव त्याना चांगलीच असते. कोणीही सामान्य इंग्रज आपण होऊन, बांडगुळ होणार नाही. माणसाकडून काम काढून घेतले जाते किंवा काही अपरिहार्य कारणाने तो ते सोडतो आणि मग भटक्या बनतो. सगळे भटके आदर्श असतात, असे माझे म्हणणे नाही, मी फक्त म्हणतो आहे की ती चारचौघांसारखीच माणसे असतात. ते भटके झाले तर तो परिणाम असतो. त्यांच्या तशा जीवनाचे कारण नसते. लंगडे किंवा अपंगांच्या बाबतीत जो दृष्टीकोन असतो, तसा भटक्यांच्या बाबतीत नसावा. जेव्हा त्यांच्या बाबतीत काही वाईट घडते, तेव्हा तो त्यांचाच दोष आहे असे म्हणणे बरोबर नाही. एखाद्याने स्वतःला त्यांच्याजागी कल्पून पहावे. मग तुम्हाला त्यांच्या आयुष्याची कल्पना येईल. हे वेगळयाच प्रकारचे फार वाईट व निरर्थक आयुष्य आहे. मी त्यांच्या रोजच्या आयुष्याचे वर्णन केले आहे. तीन मुख्य शत्रू आहेत. पहिला म्हणजे भूक. त्यांना लॉजतर्फे एक दिवसाचे अन्न दिले जाते. पण ते किती पुरणार?

शिधा देऊन काही उपयोग नसतो कारण ते शिजवायला त्यांना घरच नसते. मग भीक मागणे क्रमप्राप्त ठरते. त्यांची उपासमार होते. दुसरे म्हणजे ते स्त्रीपासून एकदम तोडलेले असतात. कारण रस्त्यावर रहाणाऱ्या व त्यांच्यासारख्या सामाजिक स्तरातील बायका सहसा नसतात. तुम्ही असे म्हणू शकता, की एका ठराविक पातळीखाली रहाणारे फक्त पुरुषच असतात. १९३१ साली झालेल्या संशोधनाप्रमाणे, रात्री बाहेर भटकणारे पुरुष व बायका यांचे प्रमाण ६० ला १८ होते तर बेघरांच्या लॉजमधील प्रमाण १०५७ ला १३७ एवढे होते. याचा अर्थ बेकारी ही समस्या पुरुषांइतकी बायकांमध्ये नसावी. जवळ पैसा नसल्याने भटक्यांच्या लग्नाची शक्यताच नसते. त्याच्याकडे काही शिलिंग जमा झाल्यास तो एखाद्या वेश्येकडे जाऊ शकतो. याचा परिणाम होमोसेक्शुॲलिटी वाढण्यात होतो. आणि क्वचित बलात्काराची प्रकरणे होतात. लैंगिक गरज ही मूलभूत गरजांपैकी एक आहे आणि ती पूर्ण न झाल्याने भटक्यांचे नैतिक अधःपतन होऊ शकते. तो आत्मसन्मान गमावून बसतो. गरिबीमुळे शारीरिक व आत्मिक अधःपतन झाले, तरी ते काही ना काही उपायाने त्यावर मात करू शकतात.

तिसरे म्हणजे लादलेले रिकामपण. भटकण्याच्या नियमांमुळे, तो जेव्हा भटकत नसतो, तेव्हा तो बेघरांच्या लॉजमधील त्याच्या खोलीत असतो. किंवा लॉजच्या बाहेर उभा राहून, ते उघडायची वाट बघत असतो. हे सहज शक्य असते की हे अंधःकारमय आयुष्य, विशेषतः अडाणी माणसाला नैतिक अधिष्ठानापासून  ढळवू शकते.

याशिवाय आणखी बारीक सारीक पापे घडवणारे बरेच स्त्रोत आहेत. त्यातील एक म्हणजे बेचैनी किंवा आराम न वाटणे. रस्त्यावर राहून असे वाटणारच. हे लक्षात ठेवले पाहिजे की भटक्यांकडे त्यांच्या अंगावरचे सोडून

कपडे नसतात. त्याचे बूट जुनेपाने त्याला नीट न बसणारे असतात. तो कैक महिन्यात खुर्चीत बसलेला नसतो. पण त्याचे हे सगळे वाटणे निरर्थक असते. तो आपण कल्पनाही करू शकणार नाही, असे ध्येयहीन आयुष्य जगत असतो. या तुरुंगातून, त्या तुरुंगात फिरत बसणे, कदाचित दिवसातील अठरा तास बेघरांच्या लॉजमधील खोलीत काढणे, असे त्याचे आयुष्य असते. इंग्लंडमध्ये हजारो भटके असतील. रोज ते अनेक मैल चालून त्यांची उर्जा खर्च करतात. अनेक रस्ते तुडवतात. अनेक घरे [फक्त बाहेरून] पालथी घालतात. दहा वर्षांचा काळ लॉजची दारे कधी उघडतील याची वाट बघण्यात घालवतात. या नुसत्या फुकट गेलेल्या वेळाचा त्यांना व कोणालाच काही उपयोग नसतो. कायदा पाळून त्याना असेच आयुष्य जगावे लागते. त्याना याची सवय होऊन जाते. पण हे मूर्खपणाचे आहे. त्यांच्या आयुष्याचे हे रितेपण घालवण्यासाठी, त्यात काही सुधारणा करणे शक्य आहे का, हा खरा प्रश्न आहे. अर्थातच हे शक्य आहे. उदाहरणार्थ, त्यांची रहाण्याची लॉज जरा रहाण्यायोग्य करणे आणि काही ठिकाणी हे आधीच केले गेलेले आहे. तर सर्व ठिकाणांनीच असे करायची गरज आहे. पण तरी एवढेच करणे, म्हणजे या प्रश्नाच्या मुळाशी जाणे नव्हे. तर कंटाळलेल्या, अर्धवट जगणाऱ्या, भटक्याला माणूस म्हणून आत्मसन्मानाने कसे जगवता येईल, हे बघणे महत्वाचे आहे. सर्व लॉजेस जरी आरामदायक व अगदी चैनबाज झाली, [तशी ती कधीच होणार नाहीत] तरी त्यांचे आयुष्य फुकटच जाईल. तरी तो भणंगच राहील. घरगुती आयुष्य व लग्न हे त्याला कधीच मिळणार नाही. हे फक्त त्याला काही काम देऊनच मिळवता येईल. फक्त कामासाठी काम नव्हे तर त्याला रुची वाटेल, फायदा होईल असे काम. आता लॉजमध्ये त्यांना काहीच काम नसते. एके काळी त्यांना जेवण मिळण्यासाठी पाथरवटाचे काम करावे लागे. पण ते नंतर थांबले. कारण त्यांना करण्यासारखे काम दिसेना. पण  हो, त्याना

कामासाठी उपयुक्त बनवण्याचा असा मार्ग काढता येईल. प्रत्येक लॉजचे शेत, निदान लहानसा बगीचा असेल व प्रत्येक सुदृढ भटक्या तिथे दिवसभर काम करू शकेल. तिथे पिकवल्या जाणाऱ्या भाज्या इत्यादी त्यांच्या जेवणात वापरता येतील. पाव, मार्गारीन आणि चहापेक्षा ते जेवण अर्थात सकस असेल. पण लॉजच्या खर्चाचा ताळमेळ बसवावा लागेल. सध्याच्या परिस्थितीत भटके हे देशाला भारभूत झालेले दिसतात. कारण ते काही काम करत नाहीत एवढेच नव्हे, तर त्यांना असे खाणे दिले जाते की त्यामुळे त्यांची तब्येत हमखास बिघडेल. त्यामुळे माणसे व पैसे दोन्हीचा तोटा होतो. त्याना जरा बरे जेवण मिळेल व काही कामाने त्यांचा आत्मसन्मानही राखला जाईल, असे होणे जरुरीचे आहे. लॉजमधील झोपायची व्यवस्थाही सुधारणे भाग आहे. खरे तर त्याना फक्त एक रात्रच रहायला परवानगी देणे क्रूरपणाचे आहे. त्याना निदान महिनाभर तरी ठेऊन घेतले पाहिजे. यासाठी त्याना कामाला लावणे करायला हवे. सतत त्यांनी येणेजाणे हे काही खरे नाही. आता असे होते, की लॉजला त्याना जास्त दिवस ठेऊन घेणे परवडत नाही. पण काम निर्माण केल्यास, ते परवडू शकेल. म्हणजेच लॉज ही अर्धवेळ काम देणारी संस्था झाली पाहिजे. त्यामुळे त्यांची उपयुक्तता वाढून, भटकेगिरी कमी होईल. त्याना त्यांच्यायोग्य काम मिळाले पाहिजे, सकस अन्न मिळाले पाहिजे आणि निदान महिनाभर तरी एका ठिकाणी रहाता आले पाहिजे. तर मग त्यांना समाजात बरे स्थानही मिळेल. ही फक्त सुचवलेली एक कल्पना आहे. पण ती प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्याना त्यांचे अन्न पिकवायला लावणे किंवा तत्सम काही काम देणे, हाच यावरचा उपाय दिसतो आहे.

## XXXVII

आम्ही बिन्फिल्ड येथील लॉज सोडल्यावर, पॅडी आणि मी एका लग्नाच्या ठिकाणी काम करून व कुणाची बाग झाडून, अर्धा क्राउन मिळवला. क्रॉमलेला एक रात्र राहिलो आणि मग लंडनला गेलो. एक दोन दिवसांनी पॅडी आणि मी वेगळे झालो. बी ने मला शेवटचे दोन पौंड दिले. कारण माझ्याकडे आता त्रासाचे शेवटचे आठ दिवस उरले होते. माझा मूर्खपणा माझ्या अपेक्षेपेक्षा फारच वाढला. पण परत बेघरांच्या लॉजमध्ये जाण्याइतका नाही.

पॅडी पोर्ट्समाऊथला निघाला. तिथे त्याचा एक मित्र होता. तो कदाचित त्याच्यासाठी एखादे काम शोधू शकला असता आणि तेव्हापासून मी त्याला कधीच भेटलो नाही. काही दिवसांपूर्वी मला सांगण्यात आले, की तो पळाला व मारला गेला. पण बहुधा हे सांगणारा त्याला फारसा ओळखत नसावा व दुसऱ्याच कुणाला तरी पॅडी समजत असावा. तीन दिवसांपूर्वीच मला बोझोबद्दल समजले. तो चौदा दिवस वँड्सवर्थमध्ये भीक मागत होता. मला नाही वाटत की तुरुंगात त्याला फार वाईट वाटले असेल. माझी गोष्ट इथे संपते. ही काही फारशी महत्वाची गोष्ट नाही. पण प्रवासाची रोजनिशी जशी रुचीपूर्ण असते, तशीच ही असेल. तुम्ही जर कफल्लक असाल तर तुम्हाला या जगाची ओळख होईल. कधीतरी मला या जगाची, मारियो व पॅडीसारख्या लोकांची अजून खोलवर ओळख करून घ्यायची आहे. गरिबीच्या पाण्यातील पाणबुडे, भटके व नदीकाठी झोपणारे यांच्या आत्म्यात काय चालू असते, हे जाणून घ्यायचे आहे. अजून तर मी फक्त वरवरची गरिबी पाहिली आहे.

मी अजून एकदोन गोष्टी अशा सांगेन की मी आता असा विचार कधीच करणार नाही, की सगळे भटके दारूबाज व अप्रामाणिक चोर

असतात. शिवाय मी त्याला पैसे दिले, तर त्याने माझे ऋणाईत व्हावे असेही मी समजणार नाही. या काम नसलेल्या माणसांमध्ये ऊर्जा नसेल, त्यांनी कुठल्या जेवायच्या चांगल्या ठिकाणचे जेवण आवडीने खाल्ले असेल, त्याने कुठले परिपत्रक घ्यायला संमती दर्शवली असेल, माझ्याकडून कपडे घेऊन मला तुटपुंजे का होईना पण पैसे दिले असतील, तर मी काही नवल वाटून घेणार नाही. ही सुरवात आहे..

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे त्रेचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


## वृषाली जोशी यांची बेचाळीस पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल


ते पुस्तक उघडेल

(नेट आवश्यक)
















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Antan Chekhov



कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी
"Personally, I think it's...right under our noses."



वृषाली जोशी
मार्क ट्वेन


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३


वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
The SOUND OF MUSIC
संगीताचा नाद



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे त्रेचाळीसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही

अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल

जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।